म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ७३
ठाणें सन १८९

# गलिव्हरचा वृत्तांत

## भाग चवथा.

## 'हुं हुं हूं' यांच्या देशाची सफर.

---

हें पुस्तक इंग्रजींतील स्विफ्ट्‌कृत 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स्' ह्या पुस्तकाच्या चवथ्या भागा वरून हरि कृष्ण दामले ह्यांनीं मराठींत लिहिलें.

---

[ सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून ह्या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपणा कडे ठेविले आहेत. ]

---

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर.

शनिवार पेठ, खबुतरखाना, घर नंबर ३१,

पुणें सिटी.

सन १८९०.

मेहेरबान

# साम्युअल इसाक जावलीकर

सुभेदार मेजर आणि सरदार बहादूर पेन्शनर

मुक्काम ठाणें

ह्या इस्त्राएल जातीच्या वृद्ध गृहस्थांच्या अंगच्या सौजन्य व वाचनाची अभिरुचि ह्या गुणांच्या अभिनंदनार्थ व त्यांच्या मजवरील अत्यंत लोभाच्या परिपूरणार्थ

हें पुस्तक

त्यांच्या परवानगीनें त्यांस परम नम्रतेनें अर्पण केलें आहे.

ब० ग० दाभोळकर.

# भाषांतरकाराची प्रस्तावना.

ऐर्लंड देशांत स्विफ्ट् नामेंकरून एक मोठा विख्यात ग्रंथकार गेल्या शतकांत होऊन गेला. त्याचा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथ 'गलिव्हर्स् ट्राव्हल्स्' हा होय. या ग्रंथाचे एकंदर चार भाग आहेत; त्यांपैकीं चवथ्या म्हणजे शेवटच्या भागाचें हें भाषांतर मराठी वाचकांकरितां तयार केलें आहे.

सदरील ग्रंथाचा मुख्य उद्देश मनोरंजन हा तर आहेच; पण मूळ ग्रंथकाराचा उद्देश याहूनही खोल होता. तो हा कीं, त्या वेळेस जें मंत्रिमंडळ होतें, जीं राजकारस्थानें चालत असत, जे विख्यात विद्वान् लोक होते, आणि एकंदर जी राज्यव्यवस्था व लोकस्थिति होती, त्यांविषयीं उपरोधोक्तीनें लिहून त्यांचा उपहास करावा, हा त्याचा गुप्त हेतु त्या वेळेसही सामान्य वाचकांस प्रथमतः कळून आला नाहीं;व हल्लीं तर त्या काळाला सुमारें दीडशेंच्या वर वर्षें लोटून गेल्या कारणानें वरील उपरोधोक्तीचा रोंख स्पष्टपणें ध्यानांत येण्यास फारसा मार्गही उरला नाहीं. तरी ग्रंथकारानें आपल्या पात्रांच्या तोंडून जे अभिप्राय वदवले आहेत, त्यांवरून मार्मिक वाचकांस सदरील प्रकार जागोजाग आढळल्यावांचून राहणार नाहीं.

हें भाषांतर केवळ शब्दशः केलें नसून मराठी भाषेला जसें गोड दिसेल तसें उतरलेलें आहे. कांहीं ठिकाणीं बीभत्स गोष्टी होत्या त्या गाळून टाकून, एकंदरीनें कोठचेंही वर्णन सभ्यतेस सोडून आहे असें न दिसेल अशी होईल तितकी तजवीज केली आहे.

'गलिव्हर्स ट्राव्हल्स' हा ग्रंथ लिहिण्यांत मूळ ग्रंथकार डा० स्विफ्ट् याचा काय हेतु होता हें जरी सामान्यतः एकंदर ग्रंथाचे संबंधानें वर सांगण्यांत आलें आहे, तरी विशेषतः या भागाचे संबंधानें त्याच्या लिहिण्याचा रोंख पूर्णपणें लक्षांत यावा ह्मणून या ग्रंथाचे पहिले भागास जोडलेल्या त्याच्या चरित्रांतील एक उतारा खालीं दिला आहे.

"इ० स० १७२७ मध्यें स्विफ्ट् यानें 'गलिव्हर्स ट्राव्हल्स्' हा आपला नामांकित ग्रंथ प्रसिद्ध केला....या ग्रंथा संबंधानें लोक इतके आश्चर्यसागरांत निमग्न झाले कीं, त्यावर टीका करण्याचें कांहीं वेळ कोणाच्या मनांत देखील आलें नाहीं! या ग्रंथांत स्विफ्ट् यानें आपल्याला जन्मापासून अनेक बऱ्या वाईट लोकांशीं पडलेल्या सहवासावरून एकंदर मानवी प्राण्याविषयीं आपलें झालेलें मत प्रदर्शित केलें आहे. अशा प्रकारचा ग्रंथ अर्थातच एखाद्या शास्त्रीय ग्रंथाप्रमाणें लिहिला असता तर तो कदापि मनोरंजक झाला नसता. यास्तव स्विफ्ट् यानें मोठ्या चातुर्यानें त्या वेळचे विद्वान् ह्मणविणारे लोक, राजे व राजकारणी पुरुष, आणि दुसरे हलके सलके लोक यांचा संबंध आणून त्यांच्या कृतींवर उपरोधोक्तीनें भरपूर टीका केली आहे. यापूर्वींच्या त्याच्या लेखांत असा प्रकार चोहोंकडे थोडा बहुत दृष्टीस पडतो; परंतु या ग्रंथांत त्यानें त्याचा केवळ कळस करून सोडिला आहे;—जणू काय, आजपर्यंत गडबडीमुळें त्याला या आपल्या आवडत्या विषयावर मनाप्रमाणें लिहिण्यास हवा तितका अवकाश न सांपडल्या कारणानें त्यानें पूर्वींच्या सर्व गोष्टी यथाक्रम लक्षांत आणून व त्यांचा पूर्ण विचार करून, ज्यांच्याविषयीं त्याच्या मनांत डाचत होतें त्या सर्व लोकांचा यथेच्छ समाचार घेण्याकरितांच शेवटीं हा अप्रतिम ग्रंथ उत्पन्न केला असें वाटतें! असो; हा वर

सांगितलेल्या लोकांचा संबंध ज्या कारणाकरितां स्विफ्ट् यानें या ग्रंथांत आणिला आहे, त्या कारणांचा बोध होण्यास, त्या काळाला आज पुष्कळ वर्षें लोटून गेल्यामुळें, फारसें साधन नाहीं, व तो करून घेण्याच्या खटपटीपासून फायदाही होण्यासारखा नाहीं. शिवाय स्विफ्ट् याचा लिहिण्याचा रोंख कशावर आहे हें बिलकूल जरी न समजलें तरी त्याचा ग्रंथ वाचण्याची अभिरुचि कमी होत नाहीं, असा विलक्षण गुण त्यांत आहे. त्यांतील तत्त्वें इतकीं खरीं आहेत कीं, सामान्य वाचकास ह्मटलें ह्मणजे हा संबंध कशाकडे आहे हें समजण्याची मुळींच गरज पडत नाहीं. ह्या ग्रंथांत स्विफ्ट् यानें त्या काळच्या एकंदर स्थितीचा उपहास मोठ्या गमतीनें केला आहे. तथापि त्याच मानानें त्याचें लिहिणें इतकें गंभीर आहे कीं, कित्येक लोक तर त्यानें लिहिलेल्या गोष्टी खऱ्याच आहेत असें समजून फसून गेले! एकाची तर अशी गंमत उडाली कीं, तो, 'गलिव्हर्स ट्राव्हल्स' सर्व वाचून झाल्यावर लिलिपट् वगैरे देश नकाशांत कोठें आहेत ह्मणून शोधावयाला लागला!!"

असो; याप्रमाणें हा समग्र ग्रंथ इंग्रजीवरून मराठींत पुरा झाला याबद्दल भाषांतरकर्त्यास आनंद होत आहे. तथापि याच संधीस त्याजवर कांहीं घरगुती संबंधानें मोठा दुःखकारक प्रसंग गुदरल्यामुळें, त्याच्या मनाची अस्थिरता झाली होती; यास्तव या पुस्तकांत कदाचित् नजरचुकीनें कांहीं दोष राहिले असल्यास सुज्ञांनीं त्याबद्दल त्यास क्षमा करावी अशी त्याची विनंति आहे.

# प्रकाशकाची प्रस्तावना.

पहिले तीन भाग पूर्वी झाले असून प्रस्तुतचा चवथा झाल्यामुळें गलिव्हर्स ट्राव्हल्स् हा इंग्रजी ग्रंथ मराठींत पूर्ण भाषांतर झाला ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. तथापि येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं, सदरहू चारी भागांची सांखळी नसून त्या प्रत्येकांतील वर्णन अगदीं निरनिराळें आहे; आणि यामुळें एकंदर ग्रंथ लिहिण्याचा त्याच्या कर्त्याचा उद्देश जरी एकच आहे, तरी प्रत्येक भाग ह्मणजेच तो स्वतंत्र ग्रंथ आहे.

प्रस्तुतचा चवथा भाग ह्मणजे ही ग्रंथकर्त्याची काल्पनिक ' हुं हुं हूं ' यांच्या देशाची सफर असून हें काय गौडबंगाल असावें हें जाणण्याची वाचकांस सहज उत्कंठा होणार आहे; व तसेंच ' हुं हुं हूं ' हा घोड्याच्या खिकाळण्याच्या अर्थी शब्द असून त्यांच्या देशाची सफर त्यानें केलेली जेव्हां त्यांस समजेल, तेव्हां तर त्याजवर ते भ्रमिष्टपणाचा जबरदस्त आरोप खास आणणार आहेत; परंतु हें पुस्तक जेव्हां एक-दोन-तीन वेळां वाचून होईल व त्यांतील लिहिणाराचें हृदय वाचकांस कळेल, तेव्हां ग्रंथकर्त्याप्रमाणें काल्पनिक ' हुं हुं हूं ' च्या देशाची सफर आपणही एकवार करावी असें त्यांस वाटेल; इतकेंच नव्हे, तर त्या देशांत सदासर्वकाळ रहाण्याची त्यांना इच्छा उत्पन्न होईल.

ह्या भागाचीं पहिलीं चार प्रकरणें कथेकऱ्याच्या अनुसंधानासारखीं आहेत. व त्यांत जरी प्रसंगविशेषीं रंगाची झांक आली आहे, तथापि तेथून दहाव्या प्रकरणापर्यंत मुख्य रंग आहे. आणि दहाव्या व अकराव्या प्रकरणांत एकंदर



कथाभागाची आरती केली असून बाराव्यांत चारीही भागांची समाप्ति झाली आहे. मात्र विशेष इतकाच आहे कीं, कथेकऱ्याचें कीर्तन आटपलें ह्मणजे जशी बत्तासे खाण्याची वेळ येते तशी यांत बिलकूल आली नसून शेवटपर्यंत उत्तरोत्तर रंगच चढत गेला आहे.

ह्या भागाचें भाषांतर प्रथमतः रा० रा० परशुराम नारायण पाटणकर बी. ए. हे करीत होते व तें आह्मी छापविणारही होतों, परंतु रा० पाटणकर यांच्यामागील कार्यबाहुल्यामुळें त्यांस तें पुरें करण्यास सवड नव्हती, ह्मणून रा० रा० हरि कृष्ण दामले यांजकडून हा भाग मूळापासूनच भाषांतर करून तो आम्हीं छापिला आहे. रा० दामले यांची भाषासरणी उत्तम असून दक्षिणाप्राईज कमिटीस तर ती सर्वथैव पसंत असल्याचें लोकांत महशूरच आहे. यास्तव पहिले तीन भाग रा० दामले यांनीं केले असून हा चवथाही भाग त्यांच्याच हातून झाला, व एकंदर चारी भागांतील भाषा-सरणीस एकरूप आलें हें पाहून सर्वांस आनंद होईल अशी खात्री आहे.

व० ग० दाभोळकर.



# ‘ हुं हुं हूं ’ यांच्या देशाची सफर.

## प्रकरण १.

गलिव्हर हा एका जहाजाचा कप्तान होऊन प्रवासास निघतो.—त्याच्या हाताखालचे लोक त्याच्या विरुद्ध कट करून त्याला त्याच्या खोलींत प्रतिबंधांत ठेवितात.—ते त्याला एका गैरमाहीत देशाच्या किनाऱ्यावर सोडून देतात.—तो त्या देशांत जातो व तेथें त्यास ‘ याहू ’ नांवाचे चमत्कारिक प्राणी आढळतात.—त्या ‘ याहू ’ चें वर्णन.—गलिव्हर याची आणि दोघां ‘ हुं हुं हूं ’ ची गांठ पडते.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें मी घरीं आल्यावर सुमारें पांच महिनेपर्यंत आपल्या मुलांमाणसांत मोठ्या आनंदानें राहिलों. त्या वेळेस तरी मीं आपल्या मनाशीं उमजून पुढें आणखी प्रवासास जाण्याची हाव धरली नसती तर बरें झालें असतें. पण तशी मला बुद्धि होणार कोठून? कां कीं, माझ्या दैवाचा योगच मोठा विचित्र होता! असो, तेव्हां सांगायाचें काय कीं, लागलीच प्रवासास निघण्याची

मला इतकी उत्कट इच्छा झाली कीं, बिचारी बायको घरांत गरोदर असतां तशीच तिला टाकून, अडव्हेंचर नांवाच्या एका मोठ्या व्यापारी जहाजावर कप्तानाची चांगली बरीच फायद्याची जागा मला आली ती पतकरून मी प्रवासास निघालों. मला नौकानयनाची माहिती चांगली असून वैद्यगिरीच्याही कामाचा कंटाळा आलेला होता; यास्तव तें काम जरी मी प्रसंगविशेषीं करीत असें, तरी त्याकरितां रॉबर्ट् प्यूरफाय या नांवाचा निराळाच एक हुशार तरुण मनुष्य मीं आपल्याबरोबर घेतला, व स्वतःकडे विशेष जबाबदारीचें असें जहाजाच्या मुख्याचेंच काम ठेविलें.

आह्मी पोर्ट्स्मथ् बंदराहून इ० स० १७१० च्या सप्तंबर महिन्याच्या ७ व्या तारखेस निघालों, व त्याच महिन्याच्या १४ व्या तारखेस कप्तान पोकाक याची व आमची टेनेरिफ् येथें गांठ पडली. हा गृहस्थ ब्रिस्टल् येथील राहणारा असून, पतंगाचीं लांकडें तोडून आणण्याकरितां तो क्यांपेची उपसागराकडे चालला होता. परंतु पुढें १६ व्या तारखेस वादळ होऊन त्याची आमची चुकामूक पडली; व पुढें या प्रवासाहून घरीं परत आल्यावर मला कळलें कीं, त्याचें जहाज बुडून जाऊन, एक केबिनवर काम करणारा नोकर शिवाय करून बाकी त्या जहाजावरचीं सर्व माणसें बुडालीं. कप्तान पोकाक हा मोठा प्रामाणिक मनुष्य असून खलाशी कामांत मोठा वाकबगार होता; तथापि त्याचा स्वभाव फार हेकेखोर होता, व या हेकेखोरपणामुळें जसा आजपर्यंत अनेक लोकांचा नाश झालेला आहे, त्याप्रमाणेंच याही बिचाऱ्याचा नाश झाला. तो माझ्या सांगण्याप्रमाणें जर चालला असता, तर मी खचीत सांगतों कीं, माझ्या

सारखाच तो आजमितीस आपल्या घरीं मुलांमाणसांमध्यें खुशाल आनंदांत असता.

असो; समुद्रावरील उष्णतेच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या एके प्रकारच्या आजारानें माझ्या जहाजांतील पुष्कळ लोक मरण पावले. यासाठीं मला नवीन लोकांची भरती करणें भाग पडलें. ही भरती करून घेण्याकरितां, मला ज्यांनीं ह्या गलबतावर नेमिलें होतें त्या व्यापाऱ्यांच्या हुकुमानें मीं बारबेडोज् आणि लीवर्ड ह्या बेटांकडे गलबत नेलें. ह्या गोष्टीचा मला लवकरच पश्चात्ताप झाला. कारण वरील ठिकाणाहून जे लोक मीं जहाजावर घेतले, त्यांपैकीं बहुतेक चांचे होते. माझ्या जहाजावर एकंदर पन्नास असामी होते, व दक्षिण समुद्रांतील इंदियन लोकांशीं व्यापार करून नवीन ठिकाणांचा जितका शोध लाववेल तेवढा लावावा असा मला जहाजाच्या मालकांचा हुकूम होता. परंतु वर सांगितलेले लुटारू लोक जे मीं नुकतेच आपल्या जहाजावर घेतले होते त्यांनीं माझ्या बाकीच्या लोकांस फितविलें, व त्या सर्वांनीं माझ्या विरुद्ध कट करून मला कैदी करण्याचा व जहाज बळकावण्याचा बेत केला. त्याप्रमाणें ते एके दिवशीं सकाळीं एकदम माझ्या खोलींत घुसले, आणि, 'खबरदार! गडबड करशील तर समुद्रांत फेकून देऊं!' असें ह्मणून माझ्या त्यांनीं मुसक्या बांधिल्या. मीं कांहींएक हालचाल न करितां त्यांस शांतपणें सांगितलें कीं, 'मी तुमचा बंदीवान आहें. वाटेल तें तुह्मी माझें करण्यास मुखत्यार आहां.' पण हेंच तूं शपथेवर सांगितलें पाहिजे असें त्यांनीं मला सांगितल्यावरून त्याप्रमाणें मीं केलें. नंतर त्यांनीं माझ्या मुसक्या सोडिल्या; तथापि माझ्या एका पायांत बिडी घालून त्यांनीं मला खोलींत कोंडून ठेविलें, व दाराशीं एका संत्र्याचा खडा पहारा ठेविला. त्या संत्र्याजवळ बंदूक भरलेली

असून, यानें जरा कांहीं इकडे तिकडे केलें कीं एकदम याला गोळी घालून ठार कर, असा त्यांचा त्यास सक्त हुकूम होता. ते मला खाण्यापिण्याचे जिन्नस तेवढे आंत आणून टाकीत. याप्रमाणें सर्व जहाजाचे ते मालक बनले. त्यांचा विचार चांचेपणा आरंभण्याचा असून, प्रथमतः स्पानिअर्ड लोकांवर घाला घालण्याचा त्यांचा बेत होता. परंतु हा हेतु साधण्यास त्यांना आणखी लोक मदतीस पाहिजे होते. परंतु ते मिळण्याचे एकीकडेच राहून, मला त्यांनीं बंदींत टाकल्यापासून त्यांच्यांतलेच उलटे कित्येक लोक आजारानें मरण पावले होते. तेव्हां प्रथमतः जहाजांतील माल विकून टाकून नंतर मादागास्कर येथें जाण्याचा त्यांनीं विचार केला. याप्रमाणें कित्येक आठवडेपर्यंत त्यांनीं गलबत चालविलें, व मधून मधून इंदियन लोकांबरोबर कांहीं देवघेव केली. पण पुढें त्यांनीं कोणता मार्ग धरिला तें मला मुळींच कळलें नाहीं; कांकीं, मला त्यांनीं आपल्या खोलीच्या बाहेर कधींही येऊं दिलें नाहीं; व कित्येक वेळां तर त्यांनीं मला ठार मारण्याचीही भीति घातली.

शेवटीं १७११ च्या मे महिन्याच्या ९ व्या तारखेस जेम्स वेल्श या नांवाचा मनुष्य माझ्या खोलींत येऊन मला ह्मणाला, 'तुला किनाऱ्यावर सोडून देण्याचा कप्तानसाहेबांचा हुकूम झालेला आहे.' असें न करण्याविषयीं त्याची मीं पुष्कळ रदबदली केली, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं; इतकेंच नव्हे, तर तुमचा हा नवीन कप्तान तरी कोण तें मला सांग, असें मीं त्यास विनयपूर्वक ह्मटलें, पण तेंही त्यानें ऐकिलें नाहीं. सारांश, लागलेंच त्या लोकांपैकीं कांहींनीं मला एका होडींत जबरदस्ती करून घातलें, व ती सुमारें दोन कोस वल्हवीत नेऊन किनाऱ्यानजीक उभी केली. त्यांनीं एवढी मेहेरबानी केली कीं,

मला आपले चांगले नवे कपडे होते ते घालूं दिले; तसेंच, तागाच्या कापडाचा एक मजजवळ लहानसा बस्ता होता तो-ही घेऊं दिला; पण कमरेच्या छोट्या तरवारीखेरीज दुसरें कांहीं हत्यारपात्यार घेऊं दिलें नाहीं. शिवाय त्यांनीं मजवर आणखीही एक मोठी दया केली कीं, माझी झाडाझडती कांहींएक घेतली नाहीं; नाहींपेक्षां माझ्या खिशांत जे कांहीं थोडे पैसे व अवश्य लागणाऱ्या जिनसा होत्या त्याही सर्व जात्या. असो, मीं त्यांस विचारिलें, 'हा देश कोणता, एवढें तरी कृपा करून मला सांगा.' पण त्यांनीं शपथपूर्वक सांगितलें कीं, तुझ्याप्रमाणेंच आह्मांलाही याविषयीं बिलकूल माहिती नाहीं. परंतु तुला एवढें सांगतों कीं, जहाजावरचा माल विकून गेल्यावर जेथें ह्मणून जमिन लागेल तेथें तुला सोडून देण्याचा कप्तानसाहेबांचा निश्चय झालेला होता, त्याप्रमाणें आह्मी आतां तुला सोडून देणार. असें ह्मणून त्यांनीं होडी किनाऱ्याच्या अगदीं जवळ ढकलली, आणि मला ह्मणाले, 'हूं, आतां जलदी करून उतरून जा; नाहींतर भरती येऊन ती तुला समुद्रांत घेऊन जाईल.' तेव्हां निरुपायास्तव त्यांना शेवटचा सलाम करून, सांगितल्याप्रमाणें मी उतरून किनाऱ्यावर निघून गेलों.

याप्रमाणें या कोणीकडच्या अगदीं गैरमाहीत ठिकाणीं मी अगदीं निराश्रित असा येऊन पडल्यामुळें पराकाष्ठेचा चिंताक्रांत होऊन तसाच किनाऱ्यावरून निघून पक्क्या जमिनीवर गेलों. त्या ठिकाणीं एका बांधावर बसून, पुढें आतां कसें करावें याचा मीं कांहीं वेळ विचार केला. मग जरा विश्रांति घेतल्यावर मीं त्या देशांत प्रवेश केला, व या ठिकाणीं जे कोणी रानटी लोक भेटतील त्यांस आपल्या जवळच्या कडीं, आंगठ्या, आणखी दुसऱ्या कांहीं बारीकसारिक चिजा देऊन आपलेंसें करून घ्यावें असा नि-

श्रम केला. बहुतेक प्रवासी लोक ह्या कारणाकरितां अशा प्रकारच्या जिनसा आपल्याबरोबर घेत असतात, व त्याप्रमाणें मींही त्या घेतल्या होत्या. असो, त्या देशांत झाडांच्या मोठमोठ्या राया माझ्या दृष्टीस पडल्या. हीं झाडें कोणीं शिस्तवार रीतीनें लाविलेलीं नसून आपोआपच उगवून वाढलेलीं दिसत होतीं. त्या ठिकाणीं गवत पुष्कळ असून 'ओट्' धान्याचीं शेतें जिकडे तिकडे दिसत होतीं. आपल्यावर कोणी एकदम येऊन घाला घालील, अथवा पाठीमागून अगर बाजूनें एकाएकीं कोणी बाण सोडील, या भीतीनें मी मोठ्या सावधगिरीनें चाललों होतों. पुढें मला मळलेला रस्ता लागला, व त्यावर मनुष्यांचीं पावलें उमटलेलीं दिसत असून जनावरांच्याही पावलांच्या खुणा दिसत होत्या. त्यांपैकीं कांहीं गाईच्या व बहुतेक घोड्यांच्या होत्या.

शेवटीं एका शेतांत कांहींएका प्रकारचे प्राणी मला आढळले. त्यांपैकीं एक दोन झाडांवर बसलेले होते. त्यांचीं शरीरें फारच चमत्कारिक व विद्रूप होतीं, यामुळें त्यांना पाहून मला थोडें भय वाटलें. यास्तव मी एका झुडपाच्या आड बसून त्यांजकडे लक्षपूर्वक पाहूं लागलों. इतक्यांत त्यांपैकीं कित्येक मी बसलों होतों त्या जागेच्या जवळ आले, यामुळें त्यांचा शरीराकार माझ्या स्पष्ट नजरेस पडला. त्यांना शेपट्या नसून त्यांच्या डोक्यावर व छातीवर दाट केंस होते. त्यांपैकीं कांहीं अतिशय रांठ व एकांत एक वळलेले, आणि कांहीं पातळ व मोकळे होते. त्यांना बोकडाप्रमाणें दाढी असून त्यांच्या पाठीवर व पायांच्या पुढच्या बाजूवर आणि पश्चिमद्वारावरही दाट केंस होते. ह्याखेरीज त्यांच्या शरीराच्या बाकीच्या भागांवर कोठेंही केंस नव्हते, यामुळें त्यांची कातडी माझ्या चांगली नजरेस पडली. तिचा रंग पिंगट असा होता.

वर सांगितलेले पश्चिमद्धारावरचे केंस सृष्टिकर्त्यानें त्यांस देण्याचें कारण असें दिसतें कीं, त्यांना खालीं बसतांना जमिनीवरचे खडे वगैरे बोंचून इजा होऊं नये. कारण ते जमिनीवर आडवे पडलेले, व मनुष्याप्रमाणें मागील पायांवर उभे राहिलेले, व खेरीज ढुंगण टेंकून बसलेले असे माझ्या दृष्टीस पडले. ते मोठमोठ्या झाडांवरही खारीप्रमाणें जलद चढत. कारण त्यांच्या मागच्या व पुढच्या दोन्ही पायांना बळकट व लांबलांब अशीं नखें असून तीं शेवटीं अणीदार व वळलेलीं अशीं होतीं. ते खूब इकडे तिकडे बागडत होते, व उड्या मारण्यांत तर त्यांची विलक्षण चपलता माझ्या दृष्टीस पडली. त्यांच्या माद्या नरांएवढ्या मोठाल्या नसून त्यांच्या डोक्यांवर लांब व पातळ केंस होते. परंतु त्यांच्या तोंडावर मुळींच केंस नव्हते, व शरीराच्या बाकीच्या भागांवर थोडथोडी बारीक लव मात्र होती. त्यांचे आंचळ त्यांच्या पुढील पायांच्या मध्यें असून त्या चालत असतांना बहुतेकींचे जमिनीला लागत असत. या जातीच्या प्राण्यांपैकीं नर व मादी ह्या दोहोंच्या केंसांचे रंग निरनिराळ्या प्रकारचे—ह्मणजे पिंगट, लाल, काळा व पिंवळा असे होते. सारांश, मी आजपर्यंत अनेक देश हिंडलों, पण त्यांपैकीं एकाही ठिकाणीं मला इतके कुरूप व मनाला तिटकारा आणणारे प्राणी आढळले नाहींत. असो; तेव्हां या प्राण्यांना पाहून मला अगदीं शिसारी येऊन गेली, सबब मी उठलों आणि तसाच पुढें रस्त्यानें चाललों. मला वाटलें होतें कीं, आपल्याला एखाद्या इंदियनाची झोंपडी वगैरे कोठें आढळेल, पण तसें कांहीं न होतां थोड्या वेळानें वर सांगितलेल्या पिशाच्चवत् प्राण्यांपैकीं एक प्राणी समोरून रस्त्यानें येतांना मला आढळला. त्यानें मला पाहिल्याबरोबर, एखा-

दा कधीं नजरेस न पडलेला पदार्थ पाहून जसे आपण पुनः पुनः त्याच्याकडे न्यहाळून पहातों, त्याप्रमाणें पुष्कळ वेळां त्यानें मजकडे पाहिलें, व कित्येक वेळां आपलें तोंड वांकडें तिकडें केलें. मग माझ्याजवळ येऊन, गमतीखातर ह्मणा, कीं माझी कांहीं खोडी करण्याच्या हेतूनें ह्मणा, त्यानें आपले पुढले पाय वर उचलले. पण मीं आपली तरवार हातांत घेतली, आणि तिच्या बुडानें त्याला एक चांगला ठोंसा लगावला. तरवारीनें मीं त्याचें अंग भोंसकलें नाहीं याचें कारण, मला भय पडलें कीं, न जाणों याचा जो कोणी धनी असेल त्याला हें कळल्यावर तो कदाचित् आपला सूड घेईल, व बाकीच्याही लोकांचा एकंदरीनें आपल्याविषयीं वाईट ग्रह होऊन बसेल. असो; त्या प्राण्याला ठोंसा मिळाल्याबरोबर तो मागें सरला, व इतका मोठ्यानें ओरडला कीं, शेजारच्या शेतांतून तसले आणखी तीस चाळीस प्राणी खूब मोठ्यानें ओरडत व वेडींविद्रीं तोंडें करीत आले, आणि माझ्या भोंवतीं जमले. परंतु मी एका झाडापाशीं गेलों, आणि त्याच्या खोडाशीं पाठ टेंकून उभा राहून, त्यांनीं आपल्या अंगाला स्पर्श करूं नये ह्मणून आपली तरवार परजूं लागलों. तेव्हां त्या ओंगळ प्राण्यांपैकीं कांहीं माझ्या मागून झाडाच्या फांद्यांना लोंबकळून वर चढले, आणि त्यांनीं वरतून बहिर्दिशेचें काम चालविलें! त्या घाणीच्या योगानें मला अतिशय त्रास झाला खरा, परंतु दुसरी कसली इजा मला त्यांजकडून झाली नाहीं.

अशा अवस्थेंत मी असतां ते सर्व प्राणी एकाएकीं फार जलदी करून पळून गेले. हें पाहून मला फारच चमत्कार वाटला. ते निघून गेल्यावर माझें भय कमी झालें, व मी त्या झाडापासून निघून पूर्ववत् रस्त्यानें जाऊं लागलों. पण डावे बाजूकडे सहज पाहिलें तों एक घोडा शेतांतून मजकडे ह-



Charles Darwin

Karl Marx

Abdul Rahman

Chanel

[illegible]

Wear

[illegible]

[illegible]

कूहकू येतांना माझ्या दृष्टीस पडला. त्याला पाहूनच पूर्वी सांगितलेल्या त्या गलिच्छ व त्रासदायक प्राण्यांनीं पळ काढला असावा असें आतां माझ्या लक्षांत आलें. वर सांगितलेला तो घोडा मजजवळ आल्यावर किंचित् दचकल्यासारखा झाला, परंतु लवकरच तो शांतपणें मजकडे लक्षपूर्वक व आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहूं लागला. तो माझ्या भोंवतीं दोनतीनदां फिरला, व माझे हात आणि पाय त्यानें फार निरखून पाहिले. मी तसाच आपल्या रस्त्यानें गेलों असतों, परंतु मला न जाऊं देण्याच्या उद्देशानें तो रस्त्यांत आडवा झाला. तथापि त्यानें मला इजा करण्याचें कांहींच चिन्ह दाखविलें नाहीं, तर उलटा मजकडे तो दयार्द्र दृष्टीनें पाहूं लागला. याप्रमाणें कांहीं वेळपावेतों आह्मी एकमेकांकडे पहात उभे राहिलों. शेवटीं, ज्याप्रमाणें चाबूकस्वार हे, एखादा नवीन घोडा आपल्या संवयीचा करावयाचा असला ह्मणजे प्रथमतः शीळ घालून त्याला अंजारतातगोंजारतात, त्याप्रमाणें मीं त्या घोड्याच्या मानेवर थाप मारण्याकरितां आपला हात पुढें सरसावला. परंतु त्यानें आपलें डोकें हालवून व भुंवया चढवून, हें माझें करणें आपल्याला अगदीं पसंत नाहीं असें दर्शविलें, व माझा हात पलीकडे करण्यासाठीं हळूच आपला उजवा पाय वर उचलला. नंतर तो दोन तीन वेळां खिकाळला. पण तिन्ही वेळां त्याचा स्वर इतका निरनिराळा मला भासला कीं, तो आपल्या भाषेंत कांहीं बोलत आहे असें माझ्या मनांत आलें.

याप्रमाणें तो घोडा व मी असे दोघे उभे असतां दुसरा एक घोडा तेथें आला. तो पहिल्या घोड्यापाशीं मोठ्या सभ्य रीतीनें आला, व त्या दोघांनीं आपापले उजवे खूर हळूच एकमेकांस लाविले. नंतर ते आळीपाळीनें कित्येक वेळां खिकाळले. प्रत्येक वेळीं त्यांनीं असा कांहीं निरनिरा-

ळा आवाज काढिला कीं, त्यांत कांहीं शब्दांचा उच्चार त्यांनीं केला असावा असें मला भासलें. ते कांहीं पावलें दूर गेले, व त्यावरून जणू काय यांना कांहीं विचार करावयाचा आहे असें दिसलें. तसेंच, ज्याप्रमाणें दोघां मनुष्यांची उभ्या उभ्या कांहीं महत्वाच्या गोष्टीसंबंधानें मसलत चालली असतां ते इकडून तिकडे व तिकडून इकडे खेपा घालीत असतात, त्याप्रमाणेंच पुढें या दोन्ही घोड्यांची कृति मला दिसली; व मीं त्यांची नजर चुकवून जाऊं नये ह्मणूनच कीं काय, ते मधून मधून मजकडे पहात होते. अशी त्या पशूंची समजूतदार प्राण्यासारखी कृति पाहून मला मोठा अचंबा वाटला, व त्यावरून मीं अनुमान केलें कीं, याच मानानें या देशांतील लोक जर बुद्धिमान् असतील, तर पृथ्वीवरचें कोणतेंही राष्ट्र त्यांची बरोबरी करूं शकणार नाहीं. हा विचार माझ्या मनांत आल्यावरून मला मोठें समाधान वाटलें, व या घोड्यांना काय विचार करावयाचा असेल तो खुशाल करीत राहून देऊन आपण आपलें पुढें निघून जावें व एखादें घर किंवा खेडें आढळेल तर पहावें असा मीं निश्चय केला. पण पहिला घोडा—ज्याचा रंग करडा होता—तो मी चाललों असें पाहून माझ्या मागून अशा कांहीं स्वरानें खिकाळला कीं, तें आपल्यालाच उद्देशून आहे असें मला वाटलें. त्यावरून तुझें काय ह्मणणें आहे तें कळूं दे असें त्यास दर्शविण्याकरितां मी मागें परतलों. तथापि हें प्रकरण काय असावें व याचा परिणाम कसा होणार याची मला कांहींच कल्पना होईना, यामुळें माझ्या मनाला धास्ती तर बसली. पण ती मीं बाह्यात्कारीं अगदीं दाखविली नाहीं.

ते दोन्ही घोडे माझ्या अगदीं जवळ आले, व माझा चेहरा आणि हात फार लक्षपूर्वक पाहूं लागले. करड्या

घोड्यानें आपल्या पुढच्या उजव्या पायानें माझी टोपी दाबून-दाबून इतकी कांहीं वांकडी तिकडी करून टाकिली कीं, ती काढून मला पुनः नीट घालावी लागली. त्यावरून त्या दोन्ही घोड्यांस फार चमत्कार वाटला असें दिसलें. यांच्यापैकीं दुसरा घोडा—ज्याचा रंग पिंगट होता—त्यानें माझ्या आंगरख्याचा झोळ चांचपून पाहिला, व तो माझ्या अंगापासून सुटा आहे असें दिसून आल्यावरून त्या दोघांही घोड्यांना जास्तच आश्चर्य वाटलेंसें दिसलें. पिंगट रंगाच्या घोड्यानें माझ्या उजव्या हाताला आपल्या खुरानें स्पर्श केला, तेव्हां त्याचा मऊपणा व गोरेपणा पाहून त्याला फार नवल वाटलेंसें दिसलें. परंतु पुढें त्यानें आपल्या खुराच्या व नेवराच्यामध्यें माझा हात इतका जोरानें दाबला कीं, त्या वेदनेनें मीं मोठ्यानें किंकाळी फोडली. त्यावरून पुढें ते दोघेही घोडे फार जपून मला स्पर्श करूं लागले. माझे बूट व पायमोजे यांच्याविषयीं त्यांना मोठें गूढ पडलेंसें मला दिसलें; कारण त्यांस त्यांनीं कित्येक वेळां स्पर्श केला; व ज्याप्रमाणें एखादा तत्त्वज्ञानी कांहीं नवीन व कठिण अशा चमत्काराची उपपत्ति काढीत असतां त्याचे हावभाव चाललेले असतात, त्याप्रमाणें यांचेही हावभाव व खिंकाळणें चाललेलें होतें. सारांश, त्या प्राण्यांचें एकंदर व्यवस्थित वर्तन, त्यांचा समज, चलाखी व शहाणपण हीं पाहून माझा असा तर्क झाला कीं, हे कोणी जादूगार असावे, व यांनीं कांहीं कारणाकरितां हें रूप धारण केलें असून, इतक्यांत त्यांना मी हा परका मनुष्य रस्त्यांत आढळल्यामुळें माझ्याशीं दोन घटका गंमत करावी; अथवा असेंही कदाचित् असेलसें मला वाटलें कीं, इतक्या दूरस्थ पैलपार देशावर राहणारे जे लोक असतील त्यांच्या संवयी, तोंडावळे आणि वर्ण यांहून अत्यंत भिन्न प्रकारचा असा मी यांस दिस-

त्यामुळें, यांना खरोखरच मोठें आश्चर्य वाटून यांचा माझ्या संबंधानें कांहीं विचार चाललेला असावा. या माझ्या तर्कावरून त्यांना उद्देशून मीं पुढीलप्रमाणें बोलण्याचें धैर्य केलें. मीं ह्मटलें, 'सद्गृहस्थहो, जर तुह्मी जादूगार असाल—व असालच अशी माझी अनेक कारणांवरून समजूत झाली आहे—तर तुह्मांस कोणतीही भाषा समजत असली पाहिजे. यास्तव मीं तुह्मांस नम्रतापूर्वक असें सांगतों कीं, मीं संकटांत पडलेला असा गरीब इंग्लिश मनुष्य असून दुर्दैवानें या तुमच्या देशांत येऊन पडलों आहें. तर तुह्मांस माझी अशी विनंति आहे कीं, तुह्मीं घोड्याचें रूप घेतलेंच आहे, त्याअर्थीं कृपा करून तुह्मी मला आपल्या पाठीवर घेऊन चला, व जेथें माझी सोय लागून माझें संकट निवारण होईल अशा एखाद्या घरात किंवा गांवांत मला नेऊन ठेवा. या तुमच्या उपकाराबद्दल मी तुह्मांला आपल्याजवळचा हा चाकू आणि हें कडें देईन.' असें ह्मणून मीं आपल्या खिशांतून त्या दोन्ही जिनसा काढल्या. माझें बोलणें चाललें असतां ते दोघे घोडे तें लक्षपूर्वक ऐकत स्तब्ध उभे राहिले होते. बोलणें संपतांच ते पुनः पुनः खिकाळूं लागले, व त्यावरून जणूं काय ते मोठ्या गहन विचारांत गुंतले आहेत, असें दिसलें. त्यांचें खिकाळणें ऐकून मला स्पष्ट दिसून आलें कीं, त्यांनीं आपलें मनोगत एकमेकांस उत्तम रीतीनें कळविलें; व थोडी मेहनत घेतली असतां त्यांच्या भाषेची वर्णमालाही तयार करितां येण्यास हरकत नाहीं; फार काय, पण चिंनी भाषेच्या वर्णमालेपेक्षां हिला जास्त आयास पडतील, असें देखील मला वाटलें नाहीं.

त्यांच्या बोलण्यांत 'याहू' असा शब्द वारंवार येत असे. त्याचा अर्थ समजण्यास मला जरी कांहींच साधन नव्हतें, तरी त्या दोघां घोड्यांचें संभाषण चाललें असतां तो



शब्द उच्चारण्याचा मीं यत्न करून पाहिला. आणि त्यांचें बोलणें संपल्यावर त्यांच्याच आवाजाप्रमाणें बहुतेक हुबेहूब आवाज काढून मीं तो शब्द मोठ्यानें उच्चारिला. त्यावरून त्या दोघांसही मोठा चमत्कार वाटला असें त्यांच्या मुद्रेवरून दिसलें. आणि त्या करड्या घोड्यानें, जणूं काय मला त्या शब्दाचा उच्चार बरोबर कसा करावा हें शिकविण्याकरितांच, तो शब्द पुनः दोनदां उच्चारिला. त्यावरून मींही होईल तितका त्याच्यासारखाच तो फिरून फिरून उच्चारण्याचा प्रयत्न केला; व जरी मला तो अगदीं थेट त्याच्यासारखा उच्चारितां आला नाहीं, तरी प्रत्येक वेळीं माझी सुधारणा होत गेली यांत संशय नाहीं. नंतर त्या घोड्यानें दुसरा एक बराच अवघड शब्द मला उच्चारण्यास शिकविण्याची खटपट करून पाहिली. परंतु पहिल्याप्रमाणें हा मला लवकर आला नाहीं. तथापि दोन तीन वेळां यत्न केल्यावर त्यांत मला बरेंच यश आलें. तें पाहून माझ्या बुद्धीविषयीं त्यांना पहिल्याहीपेक्षां फार विस्मय वाटला, असें दिसलें. हा शब्द वास्तविक आपल्या भाषेंत लिहून दाखवितां येणार नाहीं, तथापि तो 'हुं हुं हूं' असा लिहिला असतां जवळ जवळ बरोबर होईल असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नंतर त्या दोघां घोड्यांचा थोडा वेळ संवाद होऊन त्यांनीं एकमेकांचे खूर एकमेकांस लावण्याचा शिष्टाचार पूर्वीप्रमाणें केल्यावर ते निरोप घेऊन निघाले. त्यांचा वर सांगितलेला शेवटचा संवादही माझ्या संबंधाचाच असावा असें मला वाटलें. नंतर करड्या घोड्यानें मला आपल्यापुढें चलण्याविषयीं खूण केली. तेव्हां याहून जास्त चांगला मार्गदर्शक आपणाला भेटेपर्यंत याच्याच तंत्रानें आपण चालावें हें बरें, असें मनांत आणून मीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें

केलें. जेव्हां जेव्हां माझें पाऊल सावकाश पडायला लागे, तेव्हां तेव्हां त्यानें 'हुं हुं हूं' ह्मणावें. याचा अर्थ काय असावा हें माझ्या लक्षांत येऊन मीं त्याला असें दर्शविलें कीं, मीं दमून गेलों असल्यामुळें मला याहून जलद चालतां येणें अशक्य आहे. हें त्याला पूर्णपणें समजल्यासारखें दिसलें. कारण मग तो मला जलदी करण्याविषयीं तसदी देईनासा झाला; इतकेंच नव्हे, तर मला विसांवा मिळण्याकरितां मध्यें कांहीं वेळ थांबूंही लागला.



## प्रकरण २.

एकजण 'हुं हुं हूं' गलिव्हर यास आपल्या घरीं घेऊन जातो.—त्या घराचें वर्णन.—गलिव्हर याचें तेथें आदरातिथ्य झालें तो प्रकार.—त्या लोकांच्या भक्ष्याचें वर्णन.—गलिव्हर यास खाण्यास मांस न मिळाल्यामुळें तो मोठ्या संकटांत पडतो.—त्या संकटाचें निवारण होतें.—त्या देशांत गलिव्हर याचें खाणें पिणें कशा प्रकारें चाले तें.



मी सुमारें दीड कोस चालल्यावर एका लांबच लांब अशा इमारतीपाशीं आलों. तिला मातीच्या भिंती वगैरे कांहीं नसून ती जमिनींत नुसते खांब पुरून त्यांवर उभी केलेली होती, व तिला मधून कूड घालून तिचे निरनिराळे भाग केलेले होते. तिचें छप्पर फार खालपट असून त्यावर गवत घातलेलें होतें. यावेळीं माझ्या मनाला जरा समाधान वाटलें, व या घरांतील लोकांचा

आपल्याविषयीं चांगला ग्रह होऊन आपल्याला ममतेनें वागविण्याविषयीं त्यांच्या मनाची प्रवृत्ति व्हावी या हेतूनें मीं त्यांना नजर करण्याकरितां आपल्या जवळच्या खेळणीं वगैरे काढिलीं. हें मीं प्रवासी लोकांच्या नेहमींच्या रीतीस अनुसरूनच केलें. हे प्रवासी अमेरिकेंतील रानटी इंदियन लोकांत प्रथम जातात तेव्हां त्यांना वश करून घेण्याकरितां अशाच प्रकारच्या उपायांची योजना करितात. असो.

त्या घोड्यानें मला प्रथम आंत शिरण्याविषयीं खुणेनें सुचविलें. मी ज्या दालनांत प्रथम गेलों, तें चांगलें मोठें असून त्याची जमीन गुळगुळीत होती. त्याच्या लांबीचे एके बाजूस गव्हाण होती, व दाणा घालण्याकरितां कोटंबे होते. त्याठिकाणीं तीन घोडे व दोन घोड्या होत्या. यांपैकीं कोणीही कांहीं खात नसून सर्व मांडी घालून बसलेलीं होतीं. हें पाहून मला फारच चमत्कार वाटला. याहीपेक्षां, बाकीचीं जनावरें घरांतील कामधंदा करीत असलेलीं पाहून मला जें नवल वाटलें तें सांगतां पुरवत नाहीं! कां कीं, हीं नेहमीं आपण पहातों तशीं अगदीं साधारण गुरें दिसत होतीं. तथापि हें पाहून माझें जें प्रथम मत झालें होतें तेंच कायम झालें. तें हें कीं, ज्या राष्ट्रांतील लोक अशा मुक्या जनावरांस इतक्या विलक्षण रीतीनें सुधारूं शकतात, त्यांचें शहाणपण इतर कोणत्याही राष्ट्रांतील लोकांपेक्षां फार जास्त असलें पाहिजे. असो; माझ्या मागून लागलाच तो करडा घोडा आंत आला, व इतरांनीं मला कदाचित् त्रास दिला असता तो या योगानें टळला. तो, जसा एखादा अधिकार बजावतो, त्याप्रमाणें पुष्कळ वेळां मोठ्यानें खिकाळला, व त्याचा हुकूम मान्य केल्याबद्दल इतरांकडून त्यास जबाब मिळाले.

या वरील दालनाच्या पलीकडे तितक्याच लांबीचीं आ-

णखी तीन दालनें होतीं, व त्यांतून जाण्याचीं दारें अगदीं एकमेकांसमोर होतीं. मीं व पूर्वीं सांगितलेला करड्या रंगाचा घोडा असे दुसऱ्या दालनांत गेलों, व तेथून लागलींच तिसऱ्यांत चाललों. यावेळीं तो करडा घोडा माझ्या पुढें झाला, व आपल्या मागें येण्याविषयीं मला खुणेनें सुचवूं लागला. तेव्हां मी अंमळसा थांबलों, व घरधनी आणि घरधनीण यांस द्यावयाचा नजराणा काढून हातांत तयार ठेविला. या नजराण्यांतील चिजा इतक्या होत्याः दोन चाकू, खोट्या मोत्यांचे तीन गजरे, एक लहानसा आरसा, आणि एक गळेसर. असो. तो घोडा तीन चार वेळ खिंकाळला, त्यावरून कोणी मनुष्य यास आतां उत्तर देईल ह्मणून मी मार्गप्रतीक्षा करीत राहिलों. परंतु तशा प्रकारचें उत्तर कांहींच न येतां तसा खिंकाळण्याचा आवाजच उत्तराच्या ऐवजीं मला दोन तीन वेळ ऐकूं आला. मात्र तो त्या घोड्याच्यापेक्षां जरा बारीक व कर्कश होता. मला वाटलें कीं, आंत माझा शिरकाव होण्यास बराच पुष्कळ अवधि लागत आहे, त्याअर्थीं हें घर कोणा थोरा मोठ्याचें असावें; परंतु अशा थोर मनुष्याच्या येथें सर्व चाकर वगैरे हीं घोडींच असावीं हें कसें, याचें मला मोठें कोडें येऊन पडलें. एकदां मला वाटलें कीं, मीं हाल व दुःखें फार सोसल्यामुळें माझ्या मेंदूंत कांहीं विकार झाला कीं काय नकळे. तेव्हां मी चांगला शुद्धीवर आहें अशी आपली खात्री करून घेऊन, पुनः उभा होतों त्या ठिकाणीं चोहोंकडे नीट पाहिलें. परंतु पहिल्या दालनाप्रमाणेंच या जागेंतील सर्व प्रकार असून, ही अंमळ तिच्यापेक्षां जास्त नीटनेटकी व खुलवलेली आहे, दुसरें कांहीं नाहीं, असें मला दिसलें. त्यावरून मीं आपले डोळेबिळे चांगले पुसून पुनः नीट लक्षपूर्वक पाहिलें. तरी पण तोच प्रकार दृष्टीस पडला. तेव्हां अजूनही मी शुद्धीवर नसून स्व-

मांतच आहे कीं काय हें पहाण्याकरितां आपल्या दंडाला व कुशीला चिमटे घेतले. तरीही पण सर्व पूर्ववतच स्पष्ट रीतीनें मला दिसल्यावरून मीं अनुमान केलें कीं, हें कांहीं तरी गौडबंगाल असावें यांत संशय नाहीं. परंतु माझ्या मनांतले हे तरंग जास्त चालण्यास मला वेळच मिळाला नाहीं. कारण तितक्यांत तो करड्या रंगाचा घोडा दारापाशीं आला, आणि तिसऱ्या दालनांत चलण्याविषयीं त्यानें मला खूण केली. त्याठिकाणीं मी गेलों तों तेथें मला एक फार सुंदर घोडी व तिजपाशीं असलेलीं एक शिंगी व शिंगा हीं दिसलीं. हीं तिघेंही मांड्या घालून गवताच्या चटयांवर बसलेलीं होतीं. त्या चटया सुरेख रीतीनें विणलेल्या, चांगल्या नीटनेटक्या, व स्वच्छ अशा होत्या.

वर सांगितलेली घोडी मला पहातांच उठली, आणि मजजवळ येऊन तिनें माझा हात व तोंड लक्षपूर्वक पाहिलें. त्याबरोबर तिनें धिक्कारयुक्त मुद्रा केली, आणि घोड्याकडे वळून ‘याहू’ असा शब्द उच्चारिला. तो शब्द मी उच्चारावयास शिकलों होतों मात्र, परंतु त्याचा अर्थ मला मुळींच माहीत नव्हता. तथापि तो पुढें लवकरच मला कळला, व त्या योगानें माझी जी मानखंडना झाली ती मी जन्मांत विसरणार नाहीं! तिचें कारण पुढील मजकुरावरून ध्यानांत येईल. असो; मग त्या घोड्यानें ‘हुं हुं हूं’ शब्द केला, व डोक्यानें खुणवून मला आपल्यामागें येण्याविषयीं सुचविलें. थोडक्याच वेळानें आह्मी त्या घरापासून कांहीं अंतरावरच्या पटांगणांत दुसरें एक घर होतें तेथें गेलों. त्या ठिकाणीं, प्रथमतः मीं या देशांत प्रथम पाऊल टाकल्याबरोबर जसे अत्यंत तिरस्करणीय असे प्राणी मला भेटले होते, तशाच प्रकारचे तीन प्राणी आढळले. ते, कंद आणि मांस गपागप खात होते. हें मांस गाढवें, कुत्रीं,



[illegible]

यांचें, व रोगानें अथवा इतर कारणानें मेलेल्या गाईबैलांचें होतें असें मला मागाहून कळलें. वर सांगितलेल्या प्राण्यांच्या मानेला दांवीं अडकाविलेलीं असून तीं दांवीं एका तुळईला बांधलेलीं होतीं, व अशा रीतीनें त्यांना तेथें जखडून टाकिलें होतें. हे प्राणी आपलें भक्ष्य आपल्या पुढील पायांच्या पंजांत धरून दांतांनीं तोडून खात होते.

माझ्या धन्यानें ( यावेळेपासून मी त्या करड्या घोड्यास 'धनी' अशी संज्ञा देतों. ) आपल्या एका तांबूस रंगाच्या चाकर घोड्यास वरील हिडिस प्राण्यांपैकीं सर्वांत मोठ्या प्राण्याला सोडून पटांगणांत आणण्याविषयीं सांगितलें. तो आल्यावर त्याला आणि मला शेजारीं उभें केलें. नंतर माझ्या धन्यानें आणि त्याच्या चाकरानें आमचे दोघांचे चेहरे नीट निरखून पाहिले, व नंतर कित्येक वेळां 'याहू' असा शब्द उच्चारिला. दृष्टीस पडल्याबरोबर किळस येणारा तो प्राणी बघतांच मला जेव्हां आढळून आलें कीं त्याचे सर्व अवयव अगदीं मनुष्यासारखे आहेत, तेव्हां मी किती आश्चर्यचकित झालों व मला किती वाईट वाटलें त्याचें शब्दांनीं वर्णन करणें कठिण आहे ! आतां, त्याचें तोंड चपटें व रुंद, तसेंच नाक तर अगदींच बसलेलें, ओंठ भारीच मोठे, आणि तोंडही तसेंच विलक्षण रीतीचें पसरट होतें हें खरें; परंतु हा फरक सर्व रानटी राष्ट्रांतल्या लोकांत नजरेस पडतोच; कां कीं, त्यांचीं मुलें लहान असतांना ते भुईवर त्यांस पालथीं लोळूं देतात, किंवा पाठीशीं बांधितात, त्यामुळें त्यांचें नाक तोंड वगैरेंची अशी अवस्था होते. त्या 'याहूचे' पुढले पाय व माझे हात यांत फरक काय तो एवढाच होता कीं, त्याचीं नखें लांब लांब होतीं, तळहात खरबरीत असून त्यांचा रंग पिंगट होता, व त्याच्या मागल्या बाजूस पुष्कळ केंस आलेले होते. पण मीं पायांत

बूट आणि पायमोजे घातले असल्यामुळें दोहोंच्यांतील भेद त्या घोड्यास कळला नाहीं. सारांश, त्या 'याहू' च्या व माझ्या शरीराच्या सर्व भागांत साधारणपणें ह्मटला ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें केसांच्या व रंगाच्या संबंधानेंच कायतो फरक होता. तथापि पायांप्रमाणेंच माझ्या शरीराच्या इतर भागांच्या संबंधानेंही त्या घोड्यांना 'याहू' त व माझ्यांत फारच फरक दिसला, व असा प्रकार कां असावा याविषयीं ते मोठे बुचकळ्यांत पडले. हा फरक दिसण्याचें कारण दुसरें कांहीं नाहीं, तर माझ्या अंगांत पोषाख होता, हेंच काय तें. कांकीं, पोषाकाची कल्पना अर्थातच त्या घोड्यांना मुळींच नव्हती. त्या तांबूस रंगाच्या घोड्यानें मला खाण्याकरितां एके प्रकारचा कंद माझ्या हातांत दिला तो मीं घेतला, आणि हुंगून पाहून मोठ्या सभ्यपणानें व नम्रपणानें परत दिला. तेव्हां त्या 'याहू' च्या घरांतून गाढवाचे मांसाचा एक तुकडा आणून तो मला तो देऊं लागला. पण त्याची इतकी वाईट घाण मला आली कीं, मीं लागलेंच आपलें तोंड फिरविलें. तेव्हां त्यानें तोच तुकडा त्या 'याहू' पुढें टाकून दिला, व त्यानें तो मोठ्या आवडीनें खाल्ला. नंतर त्या घोड्यानें एक गवताची पेंढी व कांहीं ओट धान्य आणून माझ्यापुढें ठेविलें. परंतु मीं आपलें डोकें हालवून, हें माझें भक्ष्य नव्हे असें त्यांस दर्शविलें. यावेळीं मला असें भय पडलें कीं, माझ्या जातीचा प्राणी जर कोणी मला या ठिकाणीं आढळणार नाहीं, तर उपाशी मरण्याची पाळी मजवर खास येणार ! आतां कोणी ह्मणेल कीं, ते 'याहू' तर अगदीं माझ्या सारखेच होते; पण मी वास्तविक सांगतों कीं, त्या वेळीं निदान जरी मी मानवी प्राण्यापेक्षां जास्त कोणासही चाहत नव्हतों, तथापि त्या 'याहू' स पाहून, ज्याला

ह्मणून कांहीं बुद्धि आहे असा प्राणी इतका घाणेरडा साऱ्या पृथ्वीवर नसेल असें मला वाटलें. आणि त्या देशांत मी होतों तितक्या वेळांत जितका जितका त्यांचा सहवास मला अधिक झाला, तितका तितका त्यांचा अधिकच तिरस्कार मला वाटूं लागला. असो; त्या 'याहू' चा मी तिटकारा करितों असें माझ्या धन्यास माझ्या चर्येवरून दिसल्यामुळें त्यानें परत त्यास त्याच्या जागीं पाठवून दिलें. मग त्यानें आपला पुढला खूर आपल्या तोंडाला लावला. तो लावण्यास त्याला किंचित्‌ही कठिण पडलें नाहीं.—इतकेंच कीं, तशाच प्रकारें त्याच्या शरीराची रचना केलेली असावी असें मला दिसून आलें. त्यावरून मला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. त्यानें वरीलप्रमाणें खूर तोंडाला लावून व दुसऱ्या कांहीं खुणा करून, मला खावयास काय पाहिजे, तें जाणण्याची इच्छा दर्शविली. पण त्याला समजेल असें उत्तर मला कांहींएक देतां येईना; व कदाचित् त्याला तें समजलेंही, तरी माझी खाण्याची तरतूद त्यास कशी करितां येईल हें मला मुळींच समजेना. याप्रमाणें आह्मी दोघे अगदीं विचारांत गुंतलों असतां एक गाय तिकडून जातांना माझ्या नजरेस पडली. त्यावरून मीं तिजकडे बोट केलें, आणि तिचें दूध काढून पिण्याची इच्छा दर्शविली. याचा चांगला उपयोग झाला; कारण त्या घोड्यानें तत्काळ मला घरांत नेलें, व चाकरांपैकीं एका घोडीला एक खोली उघडण्यास सांगितलें. त्या खोलींत मातीच्या व लांकडी भांड्यांत फार स्वच्छ व व्यवस्थित रीतीनें ठेविलेलें पुष्कळ दूध होतें. तिनें एक मोठा थोरला वाडगा भरून मला दिला. तो मी मोठ्या आनंदानें प्यालों, व त्या योगानें मला फार समाधान वाटलें.

दोन प्रहरच्या सुमारास आमच्या घराकडे गाडीसारखें एक

वाहन येतांना माझ्या दृष्टीस पडलें. तें ओढण्यास चार 'याहू' लाविलेले होते. या गाडींत एक म्हातारा घोडा बसलेला असून तो कोणी मोठ्या योग्यतेचा असावा असें दिसत होतें. त्याच्या पुढल्या डाव्या पायास कांहीं अपघाताच्या योगानें इजा झाली असल्यामुळें तो त्या गाडींतून मागल्या पायांनींच उतरला. हा घोडा माझ्या धन्याचे येथें भोजनाकरिता आला होता. ,माझ्या धन्यानें त्याचा मोठा सत्कार केला. त्या दिवशीं जेवणाचा बेत सर्वांत उत्तम व स्वच्छ अशा जागेंत केलेला होता. त्यांनीं प्रथम गवत खाल्लें व मग ओट धान्याची खीर वाढायला आली. ती त्या म्हाताऱ्या घोड्यानें ऊन असतांनाच खाल्ली, व बाकीच्यांनीं निवाल्यावर खाल्ली. त्यांचे जेवावयाचे कोटंबे त्या जागेच्या मध्यभागीं सारख्या अंतरावर वर्तुळाकृति ठेविलेले असून त्यांच्या भोंवतीं तीं सर्वजण गवताच्या चटयांवर मांडी घालून बसलेलीं होतीं. मध्यभागीं मोठी थोरली गव्हाण होती, व कोटंबे जसजसे मांडलेले होते तसतसे त्या गव्हाणीला कोन होते, यामुळें प्रत्येक घोडा व घोडी मोठ्या व्यवस्थित रीतीनें व मर्यादेनें आपापलें भक्ष्य म्हणजे गवत व ओट धान्याची खीर हीं खात होतीं. धाकटा शिंगा व शिंगी यांची वागणूक फारच मर्यादेची व कित्ता घेण्यासारखी दिसली; आणि घरधनी व धनीण यांच्या चर्या फारच आनंदी असून तीं आपल्या पाहुण्याचा समाचार घेण्यांत फार तत्पर दिसलीं. करड्या रंगाच्या घोड्यानें म्हणजे माझ्या धन्यानें मला आपले शेजारीं उभें राहण्यास सांगितलें. तेव्हां तो व त्याचा मित्र म्हणजे तो आलेला पाहुणा, यांच्यांत माझ्या संबंधानें पुष्कळ संभाषण झालें. हें मी कशावरून म्हणतों, तर त्या पाहुण्यानें मधून मधून पुष्कळ वेळां मजकडे पाहून 'याहू' या शब्दाचा उच्चार केला. मीं हातमोजे घातले होते तें पाहून माझ्या

धन्याला मोठा चमत्कार वाटला; व यावरून मीं आपले हातांस (त्यांच्या मतें पुढील पायांस) कसली इजा करून घेतली आहे कोण जाणें असें त्यास वाटलें. मग त्यानें आपला खूर तीन चार वेळां माझ्या हातांस लावून अशी इच्छा दर्शविली कीं, मला आपले हात मूळस्थितीवर आणतां येतील तर मीं ते आणावे. त्यावरून लागलेच मीं आपले हातमोजे काढून खिशांत टाकले. हें पाहून त्या दोघांमध्यें पुनः बोलणें सुरू झालें, व एकंदरीनें ती मंडळी माझें वर्तन पाहून फार खूष झाली. त्यांनीं मला जे काय थोडेसे शब्द येत होते ते बोलावयास सांगितलें, व जेवण चाललें असतां माझ्या धन्यानें मला, ओट धान्य, दूध, विस्तव, पाणी व दुसरे कांहीं पदार्थ यांचीं नांवें शिकविलीं. मला परकी भाषा शिकण्याचा लहानपणापासून सराव फार असल्यामुळें वरील शब्दांचा उच्चार धन्यानें सांगितल्याप्रमाणें हुबेहूब करण्यास मला मुळींच कठिण गेलें नाहीं. मग जेवण झाल्यावर माझा धनी मला एकीकडे घेऊन गेला, आणि माझ्या खाण्याची तजवीज कशी करावी याविषयीं आपल्याला मोठी काळजी पडली आहे असें त्यानें खुणांनीं व शब्दांनीं मला समजाविलें. त्यांच्या भाषेंत ओट या शब्दास 'ल्हन्' असें ह्मणतात. हा शब्द मीं दोन तीन वेळ उच्चारिला; कां कीं, प्रथमतः तें धान्य खाण्याचें जरी मीं नाकारिलें होतें, तरी पुनः विचाराअंतीं मला असें वाटलें कीं, आपल्याला कांहीं युक्तीनें याची भाकर करितां येईल; व ती दुधाशीं खाऊन, या देशांतून सुटका होऊन आपण आपल्या जात बांधवांमध्यें जाऊं तों पर्यंत, कसा तरी आपल्याला जीव वांचवितां येईल. असो; माझ्या धन्यानें लागलेंच आपल्या घरांतील एका घोडीस एका प्रकारच्या लांकडी थाळ्यांत बरेंच पुष्कळ ओट घेऊन येण्यास सांगितलें. त्याला

मीं चांगली आंच दिली, आणि हातांनीं तें चांगलें जोर देऊन चोळलें. तेव्हां त्याचीं फोलें निघालीं. मग मीं कांहीं युक्ति करून तें पाखडलें, व दाणे आणि फोल एकीकडे केलें. नंतर दगडावर ते दाणे वाटले, व त्यांत पाणी घालून व मळून त्यांची भाकर बनविली. ती मीं विस्तवावर भाजली, आणि ऊन ऊन अशी दुधाबरोबर खाल्ली. हें खाणें युरोप खंडाच्या कित्येक भागांतील लोकांत जरी बहुतेक सर्वसाधारण आहे, तरी मला तें पहिल्यानें अगदींच वाईट लागलें. तथापि बरेच दिवस गेल्यावर संवयीनें तें माझ्या अंगवळणीं पडलें. आणि मला आजपर्यंत खाण्यापिण्याच्या संबंधानें पुष्कळ वेळां महत् संकटें भोगावीं लागलीं असल्यामुळें वास्तविक गरज" ही किती थोडक्यानें भागत असते याचा अनुभव मला याच वेळेस नव्हे तर यापूर्वींही अनेक वेळां आलेला होता. शिवाय चमत्काराची गोष्ट ही कीं, या देशांत मी जितके दिवस राहिलों होतों, तितक्या दिवसांत कधींही दुखणें ह्मणून मला कसलें तें ठाऊक नाहीं ! आतां इतकें खरें कीं, कधीं कधीं मीं ' याहू ' च्या केंसाच्या केलेल्या फांसाच्या योगानें एखादा ससा अथवा पक्षी धरीत असें, तसेंच कांहीं चांगला चांगला झाड पाला गोळा करून तो शिजवून भाकरीबरोबर खाण्याकरितां भाजीसारखें कांहीं करीत असें, आणि कधीं कधीं दुधापासून लोणीही काढीत असें. लोणी हा अर्थात् मला तेथें मोठा अपूर्वाईचा पदार्थ असे.

प्रथमतः मला तेथें मिठाच्या उणीवेमुळें मोठी आडचण पडली. पण हळूहळू मला तें न खाण्याची संवय पडतां पडतां त्याच्या वांचून माझें अडेनासें झालें. यावरून मीं असें अनुमान करितों कीं, मिठाचा फार उपयोग करण्याची जी आपल्या लोकांत रीत पडली आहे ती केवळ चैनीखातर

असून, तें आरंभीं ह्मटलें ह्मणजे, पाणी वगैरे पिण्याची वासना व्हावी ह्मणून, पदार्थांत घालण्याची चाल पडली असावी. आतां मोठमोठ्या जलपर्यटनाच्या प्रसंगीं मांस नासूं नये ह्मणून, अथवा ज्या ठिकाणीं बाजार फार दूर असल्यामुळें त्याचा सांठा करून ठेवावा लागतो अशा प्रसंगीं तें खराब होऊं नये ह्मणून त्यांत मीठ अवश्य घालावेंच लागतें, हा प्रकार निराळा. मनुष्यानें केवळ चैनीकरितां तें पदार्थांत घालण्याचा प्रघात पाडला असावा असें जें मीं वर ह्मटलें तें कशावरून तर, मनुष्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास त्याची चटक मुळींच नाहीं, आणि माझ्या स्वतःविषयीं ह्मणाल तर, हा देश मी सोडून गेल्यावर जे जे पदार्थ माझ्या खाण्यापिण्यांत येत त्यांपैकीं मीठ असलेला पदार्थ मला खाण्यास बरेच दिवस अडचण पडत असे.

या देशांतील माझ्या खाण्यापिण्याच्या संबंधानें वर जेवढें मीं सांगितलें तेवढें अगदीं बस् आहे. वास्तविक पहातां इतकें सांगितलें हें सुद्धां फाजीलच आहे. परंतु तें सांगणें मला इतक्याकरितां भाग पडलें कीं, या अशा प्रकारच्या देशांत व तेथल्या विलक्षण रहिवाशांत तीन वर्षें जीं मीं काढिलीं, तीं कशीं याविषयीं लोकांना संशय उत्पन्न होऊं नये ह्मणून. बाकी साधारणतः प्रवासी लोकांचे वृत्तांत जर पाहूं गेलें तर, या प्रकरणाच्या संबंधानें त्यांत रिकामें कंटाळवाणें लांबच लांब चऱ्हाट वळलेलें दृष्टीस पडतें—जणू काय लोकांना यांच्या खाण्यापिण्याच्या संबंधाची हकीकत समजण्याची भारी उत्कंठा असते!

असो; संध्याकाळ होत आली तेव्हां माझ्या धन्यानें मला बिऱ्हाडाकरितां जागा नेमून देण्याविषयीं हुकूम केला. ती माझ्या धन्याच्या घरापासून सुमारें दहा बारा हातां-

च्या अंतरावर असून 'याहू' च्या जागेपासून निराळी होती. या ठिकाणीं मीं खालीं गवत पसरून वर आपले कपडे अंथरले व अशा प्रकारें साधारण मऊ अंथरूण करून निजलों. पण पुढें लवकरच यापेक्षां माझी निजण्याबसण्याची सोय चांगली झाली. या संबंधाची हकिकत पुढें येईल.





## प्रकरण ३.

गलिव्हर हा तिकडील भाषा शिकण्याविषयीं झटून यत्न करितो.—त्याचा धनी या कामीं त्यास साहाय्य करितो.—त्या भाषेचें वर्णन.—गलिव्हर यास पहाण्याकरितां पुष्कळ थोर थोर ‘ हुं हुं हूं ’ येतात.—तो आपल्या जलपर्यटनाची थोडीशी हकीकत आपल्या धन्यास सांगतो.



माझ्या मनांत मुख्यतः या वेळीं त्या ‘ हुं हुं हूं ’ ची भापा शिकण्याचें फार आलें. या कामीं माझा धनी, त्याचीं मुलें, आणि घरांतील सर्व चाकर वगैरे मला मोठ्या उत्सुकतेनें साहाय्य करूं लागलीं; कारण माझ्यासारख्या केवळ पशुवत् प्राण्यास असें बुद्धिसामर्थ्याचें काम कसें यावें याविषयीं त्यांस मोठा अचंबा वाटे. मीं प्रत्येक वस्तूकडे बोट करून तिचें नांव काय हें विचारीं, व एकांतांत असें त्या वेळीं तें नांव आपल्या स्मरणवहींत टिपून ठेवीं. नंतर मीं आपल्या उच्चारांतील दोष काढून टाकण्याकरितां कुटुंबांतील पुष्कळांस

तोच तो शब्द पुनः पुनः उच्चारावयास सांगे. या कामांत विशेषतः चाकरांपैकीं तांबुस रंगाचा जो एक घोडा होता, तो मला मदत करण्यास नेहमीं फार तत्पर असे.

ते लोक बोलतांना नाकांतून व घशांतून ध्वनि काढितात. त्यांची भाषा डच् किंवा जर्मन् या भाषांसारखी बहुतेक आहे. परंतु तिच्यांत सौंदर्य व स्पष्टता अधिक आहे. जर्मनीचा प्रख्यात बादशाह पांचवा चार्लस् हा ह्मणत असे कीं, 'मला आपल्या घोड्याशीं बोलावयाचें असलें ह्मणजे तें डच भाषेंत बोलावें लागतें.'

माझा वृत्तांत समजण्याविषयीं माझ्या धन्याची जिज्ञासा आणि उतावळी इतकी कांहीं होती कीं, तो आपल्या रिकामपणापैकीं पुष्कळ वेळ मला शिकविण्याचे कामीं खर्च करी. मी 'याहू' जातीचा असावा अशी त्याची खात्री झाली होती, तथापि माझी हुशारी, सभ्यपणा व स्वच्छता हीं पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें; कां कीं, 'याहू' ह्मटले ह्मणजे या गुणांचे केवळ शत्रु होत हें त्यास माहीत होतें. माझ्या अंगावरचीं वस्त्रें प्रावरणें पाहून त्याला मोठा चमत्कार वाटे; कारण हीं माझ्या शरीराचा भागच असावीं असें तो समजत असे; कां कीं, मी आपले कपडे कोणाच्याही देखत कधींही काढीत नसें, तर सर्वजण निजलीं ह्मणजे मग काढीत असें, व तीं जागीं होण्यापूर्वींच घालीत असें. असो; माझ्या धन्यास, मी कोठून आलों हें समजण्याची, तसेंच माझ्या चालचलणुकींत बुद्धीचा थोडासा जो कांहीं अंश त्यास दिसे तो मला कसा प्राप्त झाला हें जाणण्याची, आणि माझी सर्व हकीकत माझ्या तोंडानें कळण्याची, फार उत्कंठा लागली. ही शेवटची गोष्ट मजकडून होण्यास फारसा अवधि लागणार नाहीं अशी त्याची खात्री झाली; कां कीं, त्यांच्या भाषेचे शब्द उ-

च्चारण्यांत व वाक्यें बोलून दाखविण्यांत मी भराभर तरबेज होत चाललों असें तेव्हांच त्याला दिसून आलें. मी आपल्या स्मरणशक्तीस साहाय्य होण्यासाठीं असें करूं लागलों कीं, जें काय शिकें तें सर्व इंग्लिश लिपींत लिहीं; आणि त्या त्या शब्दापुढें किंवा वाक्यापुढें त्याचें भाषांतर लागलेंच लिहून टाकीं. व हें मी पुढेंपुढें आपल्या धन्याच्या समक्षही करूं लागलों. मी हें काय करितों हें त्यास समजावून सांगण्यास मला अतिशय प्रयास पडले; कारण त्या देशाच्या रहिवाशांना लेखनकलेची कल्पनाही नाहीं.

सुमारें दहा आठवड्यांत मला आपल्या धन्याचे बहुतेक सवाल समजूं लागले, व तीन महिन्यांनीं मला त्यांचे जबाबही साधारणपणें देतां येऊं लागले. मग त्यानें मला विचारिलें, 'तूं कोणत्या देशाहून आलास, व बुद्धिमान् प्राण्याचें अनुकरण तुला कसें करितां येऊं लागलें ?' कारण तो ह्मणाला, 'याहू' चें आणि तुझें सादृश्य असून त्यांच्या अंगीं शिक्षणाची योग्यता अगदींच नाहीं; उलटे ते कावेबाज असून खोडसाळपणाकडे मात्र त्यांचा कल फार. मीं उत्तर केलें, मीं फार दूर देशाहून समुद्रांतून येथें आलों. येतांना मजबरोबर माझ्या सारखेच आणखी पुष्कळजण असून, आह्मीं सर्व, झाडांच्या (लांकडांच्या) केलेल्या एके प्रकारच्या मोठ्या पात्रांत बसून आलों. माझ्या सोबत्यांनीं मला ह्या किनाऱ्यावर सोडून देऊन, 'तूं आपलें वाटेल तसें आतां कर,' असें मला सांगितलें. हा मजकूर मला आपल्या धन्यास समजावून सांगण्यास बरेंच कठिण पडलें, व तें मीं कांहीं शब्दांनीं व कांहीं खुणांनीं मिळून कसें तरी त्याच्या डोक्यांत भरवून दिलें. मग तो ह्मणाला, तूं जें काय सांगतोस त्यांत कांहीं तरी चूक असावी, अथवा, **जी गोष्ट घडलेली नाहीं ती घडली** असें तूं बोलत अ-

सावास;—(कां कीं, त्यांच्या भाषेंत 'खोटें' बोलण्याला मुळीं शब्दच नाहीं ! ) कारण तो ह्मणाला, ' समुद्राच्या पलीकडे देश असणें, व तुझ्यासारख्या पांचपन्नास पशूंनीं एखाद्या लांकडी पात्रांत बसून समुद्रावरून वाटेल तिकडे जाणें, या गोष्टी अगदीं अशक्य दिसतात. मला खचीत वाटतें कीं, ' हुं हुं हूं ' पैकीं कोणाच्यानेंही अशा प्रकारचें पात्र तयार करवणार नाहीं, अथवा त्याची व्यवस्था 'याहूं' वर टाकण्या इतका त्यांना त्यांचा विश्वासही येणार नाहीं !

' हुं हुं हूं ' या शब्दाचा अर्थ त्यांच्या भाषेंत घोडा असा असून, त्याचा धात्वर्थ, सृष्टीचें पूर्णत्व असा आहे. मीं आपले धन्यास असें सांगितलें कीं, ' मला जें काय तुह्मांला सांगावयाचें आहे, तें अद्यापि चांगलें व्यक्त करून दाखवितां येत नाहीं, पण या बाबतींत मी लवकरच सुधारेन असें मला वाटत असून, मी तुह्मांस थोडक्याच वेळांत आमच्याकडील शेंकडों चमत्कारिक गोष्टी सांगूं शकेन अशी मला उमेद आहे.' यावरून त्यानें खुद्द आपल्या घरधनिणीस, आपला शिंगा व शिंगी यांस, व घरांतील चाकर वगैरेंस मला शिकविण्याच्या कामीं प्रत्येक प्रसंगीं लक्ष ठेवण्याविषयीं ताकीद दिली; आणि तो स्वतःही दररोज दोन तीन तास मेहनत घेऊन मला शिकवूं लागला. तसेंच, असा असा कोणी विलक्षण ' याहू ' येथें आलेला असून त्याला ' हुं हुं हूं ' प्रमाणें बोलतां येतें, व त्याच्या बोलण्यावरून आणि कृतीवरून त्याच्या ठायीं बुद्धीचा थोडा बहुत अंश दिसून येतो, ही बातमी जिकडे तिकडे पसरल्यावरून चोहोंकडचे प्रतिष्ठित घोडे आणि घोड्या आमच्या येथें येऊं लागल्या, व त्यांना माझ्याशीं संभाषण करण्यांत मोठी मजा वाटत असल्यामुळें तीं मला नानाप्रकारचे प्रश्न करीत, व मीही त्यांचीं उत्तरें मला जितकीं देववत तितकीं देत असें.

या एकंदर सर्व कारणामुळें माझी त्या 'हुं हुं हूं' च्या भाषेंत इतकी गति झाली कीं, मीं तेथें गेल्यापासून पांच महिन्यांच्या आंतच जें जें कांहीं तीं सर्व बोलत तें मला उत्तम प्रकारचें समजूं लागलें; इतकेंच नाहीं, तर मलाही त्यांच्याशीं बरेंच चांगल्या प्रकारें बोलतां येऊं लागलें.

माझ्या धन्याच्या येथें जे कोणी असामी वर सांगितल्याप्रमाणें येत, त्यांना, माझ्या शरीरावर इतर 'याहू' पेक्षां निराळ्या प्रकारचें आच्छादन पाहून, मीं 'अस्सल याहू जातीचा' आहे असें वाटेना. त्यांना माझें डोकें, तोंड, आणि हात यांखेरीज शरीराच्या इतर कोणत्याही भागावर केंस न दिसल्यामुळें फारच आश्चर्य वाटे. पण यापूर्वीं सुमारें पंधरा दिवस सहजीं एक गोष्ट घडली, तिवरून मीं आपल्या धन्यास हें गूढ समजावून सांगितलें होतें. त्याचा प्रकार असा: मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, दररोज रात्रीं कुटुंबांतील सर्व मंडळी निजायाला गेली ह्मणजे मी आपले कपडे काढून ते पांघरावयास घेत असें. एके दिवशीं असें झालें कीं, माझ्या धन्यानें आपला चाकर, तांबूस रंगाचा घोडा, यास सकाळच्या प्रहरीं मला बोलावण्यास पाठविलें. तो आला त्यावेळीं मला गाढ झोंप लागली असून माझ्या अंगावरचीं वस्त्रें एकीकडे पडून गेलीं होतीं, व माझा कमीजही कंबरेच्या वरतीं गेलेला होता. त्या बोलावूं आलेल्या घोड्यानें मला गडबडीनें जागें केलें, आणि जो निरोप सांगावयाचा होता तो कसा तरी धांदलीधांदलीनें सांगून तो परत धन्याकडे निघून गेला. तो फार भयभीत होऊन गेला होता, व त्याच्या जें काय दृष्टीस पडलें होतें तें त्यानें धन्यास सांगतां आलें तितकें खुलाशानें सांगितलें. तथापि तें त्यांस अर्थातच नीटसें कळलें नाहीं. तेव्हां मी लागलाच पाठीमा-

गून त्याजकडे गेलों असतां त्यानें मला विचारिलें, ' तूं निजतोस तेव्हां एक प्रकारचा असतोस, व इतर वेळीं निराळ्याच प्रकारचा असतोस, हें कसें? कारण तुझा कांहीं भाग फार गोरा, कांहीं पिंवळट गोरा, आणि कांहीं पिंगट असा आपल्याला दिसला, असें चाकरानें मला खात्रीपूर्वक सांगितलें. ' आतां, ' याहू ' च्या त्या घाणेरड्या जातीहून आपण होईल तितकें निराळें दिसावें याकरितां, आजपर्यंत मीं आपल्या पोषाकाचें इंगित अगदीं गुप्त ठेविलें होतें; परंतु यावेळीं मला कळून आलें कीं, इतःपर तसें करणें अगदीं व्यर्थ आहे. शिवाय हाही विचार माझ्या मनांत आला कीं, माझे कपडे व बूट हीं बहुतेक फाटत आलीं असून कांहीं दिवसांनीं तर तीं अगदीं निरुपयोगी होतील, व त्या प्रसंगीं ' याहू ' च्या अथवा दुसऱ्या पशूंच्या कातड्याचीं तीं मला बनवावीं लागतील; आणि मग आपोआपच सर्व बेंड बाहेर फुटेल, व आपली फजिती होईल, तर तें कांहीं कामाचें नाहीं. यासाठीं मींच होऊन सर्व प्रकार आपल्या धन्यास सांगून दिला. मीं ह्मटलें, ' ज्या देशाहून मी आलों तेथील लोक मर्यादेकरितां व थंडी आणि उष्णता यांच्या निवारणाकरितां, आपलीं शरीरें, कांहीं प्राण्यांचे केंस कौशल्यानें एकांत एक विणून त्यांनीं आच्छादितात. या संबंधानें आपण हुकूम केल्यास आतांच्या आतांच मी आपल्या स्वतःच्या उदाहरणावरून आपली खात्री करून देतों. मात्र इतकेंच कीं, जे अवयव कोणाच्या देखत कधींही उघडे करूं नयेत ह्मणून आह्मांस सृष्टिकर्त्याचा हुकूम आहे, तेवढे उघडे न करण्याविषयीं आपली परवानगी असावी. ' तो ह्मणाला, तूं जें काय ह्मणतोस तें मला फारच चमत्कारिक वाटतें; त्यांतूनही विशेषतः शेवटचें जें काय तूं बोललास, त्याचें तर मला पराकाष्ठेचें नवल वाटतें; कांकीं,

सृष्टिकर्त्यानें जें दिलें आहे तें त्यानेंच लपवून ठेवण्याला कां सांगावें हें मला समजत नाहीं! आमच्यांत तर पुरुषांना किंवा बायकांना आपल्या शरीराचा कोणताही भाग इतरांच्या दृष्टीस पडूं देण्याची बिलकूल शंका वाटत नाहीं. तथापि तुझ्या स्वतःविषयीं माझा कांहीं आग्रह नाहीं.' त्यावरून, प्रथमतः मीं आपल्या कोटाच्या गुंड्या सोडून तो अंगांतून काढला; त्याचप्रमाणें बंडी काढली, आणि मांडचोळणा, पायमोजे व बूट हेही काढले. मात्र अगदीं दिगंबर न होण्यासाठीं तेवढा कमीज कंबरेखालीं येई असा सोडून त्याची गुंडी आवळून घेतली.

माझ्या धन्यानें माझें सर्व कृत्य फार लक्षपूर्वक पाहिलें, व त्याचें त्यास मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें माझा प्रत्येक कपडा आपल्याजवळ घेतला, आणि तो प्रत्येक फार बारीक रीतीनें पाहिला. नंतर त्यानें हळूच माझ्या पाठीवर थाप मारिली, व कित्येक वेळां चोहोंकडून माझें अंग निरखून पाहून ह्मटलें, तूं 'याहू' तर खचित आहेस हें स्पष्ट दिसतें. पण येवढेंच कीं, तुझ्या शरीराचा मृदुपणा, गोरेपणा, आणि तुळतुळीतपणा ह्यांच्या संबंधानें तुझ्यांत आणि त्यांच्यांत फार फरक आहे. त्याचप्रमाणें तुझ्या अंगावर पुष्कळ ठिकाणीं केंस नाहींत, तुझीं नखें फार आंखूड आहेत, व तूं नेहमीं आपल्या मागल्या पायांवर चालण्याची ऐट मारतोस, ह्याही त्यांच्यांत व तुझ्यांत आणखी मोठा भेद आहे. यापलीकडे आणखी कांहीं पहाण्याची त्यानें इच्छा दर्शविली नाहीं, व मी थंडीनें अगदीं कांकडून गेलों असें पाहून त्यानें माझे कपडे माझ्या अंगावर टाकले, व ते घालण्यास मला परवानगी दिली.

'याहू' या प्राण्यांविषयीं मला फारच तिरस्कार असून मी त्यांचा अतिशय द्वेष करीत असें; तेव्हां मला स्वतःला

'याहू' असें अनेक वेळां माझ्या धन्यानें जें ह्मटलें, त्या संबंधानें मला फार वाईट वाटलें असें मीं त्यास दर्शविलें. आणि मीं त्यास मोठ्या काकुळतीनें सांगितलें कीं, 'आपण कृपा करून मला त्या नांवानें हांक मारूं नका; तसेंच, आपल्या कुटुंबांतील सर्वजणांस, आणि ज्या आपल्या इष्टमित्रांस आपण मला दाखवितां, त्या एकंदर साऱ्या मंडळीसही अशीच ताकीद देण्याची मेहरबानी करा.' त्याचप्रमाणें मीं त्यास दुसरी अशी विनंति केली कीं, 'माझ्या शरीरावर जें आच्छादन आहे, व ज्याच्या योगानें माझें शरीर मूळचें आहे त्यापेक्षां निराळें दिसत आहे, त्यासंबंधाची गोष्ट आपण दुसऱ्या कोणापाशींही बोलूं नका. आतां आपला चाकर, तांबूस रंगाचा घोडा, याच्या हा प्रकार नजरेस पडला आहे खरा, पण या गोष्टीची परिस्फुटता न करण्याविषयीं आपण त्यास हुकूम केला ह्मणजे झालें.' निदान माझे हल्लींचे कपडे जोंपर्यंत टिकतील तोंपर्यंत तरी हा प्रकार गुप्त ठेवावा अशी मीं त्याची फार आग्रहपूर्वक विनवणी केली. हें सर्व माझ्या धन्यानें मेहरनजरेनें कबूल केलें, व त्यामुळें माझे कपडे वगैरे निरुपयोगी होऊन जात तोंपर्यंत त्या संबंधाची गोष्ट गुप्त राहिली. त्या कपडे वगैरेची तजवीज नंतर मीं कोणत्या युक्तीनें केली, या विषयींची हकीकत पुढें येईल.

मग माझा धनी मला ह्मणाला, 'तुझें शरीर आच्छादिलेलें असो अगर कसेंही असो, त्यासंबंधानें मीं कांहीं ह्मणत नाहीं, पण तुझी बुद्धि आणि वाचाशक्ति पाहून मला मोठें नवल वाटतें. याकरितां होईल तितकी मेहनत करून आमची भाषा तूं लवकर शीक; कारण तूं जे कांहीं विलक्षण चमत्कार मला सांगेन ह्मणून ह्मणाला आहेस, ते ऐकण्याविषयीं मला फार उत्कंठा लागून राहिली आहे.' नंतर

यावेळेपासून तो मला शिकविण्याच्या कामीं पहिल्याही दुप्पट मेहनत घेऊं लागला. जेथें जेथें ह्मणून त्यांची मंडळी जमे, तेथें तेथें तो मला घेऊन जाई, व मला सभ्य रीतीनें वागविण्याविषयीं त्यांस सांगे. कारण तो त्यांस ह्मणे कीं, 'अशा योगानें हा फार खुषींत राहून आपल्याला घटकाभर चांगली करमणूक करील.'

प्रत्येक दिवशीं मी धन्याकडे गेलों ह्मणजे तो मला शिकविण्याचे कामाखेरीज माझ्या स्वतःच्या संबंधानें मला अनेक प्रकारचे प्रश्न विचारी. त्यांचीं उत्तरें मला देतां येत तेवढीं मी देई. या योगानें त्याला माझी हकीकत चांगलीशी समजली नाहीं, तरी तिची साधारण कल्पना त्याच्या मनांत आली. आतां त्याच्याशीं मी कसा संभाषण करावयास लागलों तें सर्व सविस्तर सांगितलें असतां कंटाळवाणें होईल, यास्तव मी आपली हकीकत जी काय प्रथम त्यास शिस्तवार रीतीनें सांगितली तेवढी मात्र येथें सांगतों.

मीं ह्मटलें, 'मीं आपणांला पूर्वी जसें सांगतां आलें त्या रीतीनें सांगितलेंच आहे कीं, मी माझ्या जातीच्या आणखी सुमारें पन्नास प्राण्यांबरोबर एका फार दूरच्या देशाहून मोठ्या थोरल्या लांकडी पात्रांत बसून समुद्रावरून येथें आलों. तें पात्र आपल्या ह्या घरापेक्षांही मोठें होतें.' नंतर मीं त्यास जहाज कसें असतें याची माहिती आपल्याकडून होईल तितकी सांगितली, व तें वाऱ्याच्या जोरानें कसें चालतें हें आपल्या रुमालाच्या साहाय्यानें त्यास दाखवून दिलें. तसेंच, आमच्यात कांहीं तंटा लागून मला बाकीच्या लोकांनीं या तुमच्या देशाच्या किनाऱ्यावर सोडून दिलें तेव्हां मला कांहींएक न सुचून, कोणीकडे तरी जावें ह्मणून मी वेड्यासारखा चाललों असतां, तुह्मी कृपा करून त्या अति द्वाड 'याहू' च्या तडाक्यांतून मला सोडविलें,

वगैरे मजकूर त्यास सांगितला. तेव्हां त्यानें मला विचारिलें, ‘तुझें तें जहाज केलें कोणीं? तसेंच, तुझ्या देशांतील ‘हुं हुं हूं’ नीं त्याची व्यवस्था तुह्मां पशूंच्या हातीं दिली हें झालें तरी कसें?’ मीं उत्तर केलें, ‘मला यापुढें आतां जें काय सांगावयाचें आहे त्या संबंधानें अगोदर आपलें मला जर पूर्ण अभय असेल, व आपल्याला त्यापासून कांहीं वाईट वाटणार नाहीं, तरच मी आपल्याला जे काय चमत्कार सांगावयाचे ते सांगेन.’ माझें ह्मणणें त्यानें कबूल केल्यावर मीं त्यास ह्मटलें, ‘तें जहाज माझ्यासारख्या प्राण्यांनींच बनविलें होतें; व माझ्या देशांत, व मीं जे जे दुसरे देश आजपर्यंत पाहिले त्या सर्व देशांत, माझ्या जातीच्या प्राण्यांच्या हातींच सर्व सत्ता असून बुद्धिमत्तेंत आह्मीच सर्वांत अग्रेसर आहों. आतां, तुह्मी ज्यांना ‘याहू’ ह्मणतां, त्यांच्याशीं माझें सर्वांशीं सादृश्य आहे खरें, परंतु ते इतके नीच व पशुवत् स्थितीस कां पोहोंचले हें मला समजत नाहीं! आणि वास्तविक पुसाल तर मी येथें प्रथम आलों तेव्हां माझ्याठायीं बुद्धीचा कांहीं अंकुर तुह्मांला दिसल्यावरून जसें तुह्मांला आश्चर्य वाटलें, तसेंच तुह्मां ‘हुं हुं हूं’ ना पाहून तुमच्याठायींही बुद्धि आहे हें पाहून मला देखील पराकाष्ठेचें नवल वाटलें. आणि खरोखर, जर सुदैवेंकरून मी परत आपल्या देशीं गेलों, व एथल्या आपल्या प्रवासाचें वृत्त तेथील लोकांस सांगितलें—व योग आल्यास तें सांगण्याचा माझा निश्चयही झाला आहे—तर ते लोक मला ह्मणतील कीं, जी वास्तविक वस्तुस्थिति नाहीं ती आहे असें तूं आह्मांला सांगतोस; तसेंच ते ह्मणतील कीं, त्या देशांत ‘याहू’ हा पशु मानला जात असून ‘हुं हुं हूं’ च्या हातीं सर्व सत्ता आहे असें तूं ह्मणतोस, हेंही अगदीं अशक्य दिसतें.



## प्रकरण ४.

सत्य व असत्य यांविषयीं 'हुं हुं हूं' चे विचार.—गलिव्हर याचें या संबंधाचें ह्मणणें त्याच्या धन्यास नापसंत होतें.—गलिव्हर हा स्वतःविषयीं व आपल्या प्रवासांत घडलेल्या कित्येक गोष्टींविषयीं आणखी जास्त माहिती सांगतो.

मी जें काय बोललों तें ऐकून माझ्या धन्याचें समाधान न होतां त्याचें मन फार अस्वस्थ झालें असें दिसलें. कारण **संशय** अथवा **गैरभरंवसा** या शब्दांची त्या देशांतील लोकांस मुळीं ओळखच नसल्यामुळें, तशा प्रसंगीं काय ह्मणावें व काय करावें हें त्यांस मुळींच सुचत नाहीं. आणि यामुळेंच, जगाच्या इतर भागांतील लोकांच्या संबंधानें मीं आपल्या धन्याशीं बोलत असतां, **असत्य भाषण** व एखादी गोष्ट **बनवून सांगणें** याविषयीं माझ्या बोलण्यांत जो अनेक वेळां संबंध येई, ते-

वढा माझ्या बोलण्याचा भाग माझ्या धन्यास समजावून देण्यास मला फारच पंचाईत पडे. बाकी त्याची बुद्धि ह्मटली ह्मणजे एकंदरीनें अतिशय तीव्र यांत संशय नाहीं. कारण तो मला ह्मणे, 'वाचाशक्तीचा उपयोग ह्मटला ह्मणजे एकमेकांचें मनोगत एकमेकांस समजावणें व अनेक गोष्टींची माहिती एकाकडून दुसऱ्यास कळणें हा जर आहे, तर **जी गोष्ट नाहीं ती आहे** असें जर कोणी ह्मणेल, तर हा उद्देश मुळींच सिद्धीस जात नाहीं असें ह्मटलें पाहिजे! कारण तुझ्याच संबंधानें कसा चमत्कार झाला आहे पहा, तूं जें कांहीं मला सांगतोस तें मला नीट समजत नाहीं इतकेंच नव्हे, तर मला जी काय माहिती सांगण्याचा ह्मणून तूं यत्न करितोस तो सिद्धीस न जातां मी उलटा अधिकच घोटाळ्यांत पडून जातों; कांकीं जें **काळें** आहे तें **पांढरें** व जें **आंखूड** आहे तें **लांब** अशा प्रकारच्या उलट गोष्टी तूं मला समजावून देण्यास पहातोस!' तेव्हां तात्पर्य काय कीं, **असत्य भाषण**—जें लोकांस उत्कृष्ट प्रकारें समजतें व ज्याचा उपयोग जगांतील सर्व मनुष्यमात्र एकसारखा पावलोंपावलीं करीत आहे—त्याविषयीं 'हुं हुं हूं' चें एकंदर असें मत झालें!

असो; आतां हें विषयांतर झालेलें सोडून देऊन मुख्य मुद्याची गोष्ट पुढें चालवितों. मीं जेव्हां आपल्या धन्यास सांगितलें कीं, आमच्या देशांत 'याहू' हेच कायते सत्ताधारी प्राणी आहेत, तेव्हां तो ह्मणाला, 'हें असें व्हावें तरी कसें हें मला समजत नाहीं! बरें, तर मग 'हुं हुं हूं' हे तुमच्या देशांत आहेत कीं नाहींत? व असतील तर त्यांचें काम काय?' मीं उत्तर केलें, 'ते आमच्या देशांत पुष्कळ आहेत. उन्हाळ्यांत ते कुरणांत चरतात आणि हिंवाळ्यांत त्यांना घरांत तबेल्यांत ठेवितात, व वाळलेलें गवत

आणि ओट् धान्य खाऊं घालतात. आणि 'याहू' हे त्यांचे चाकरीकरितां ठेविलेले असतात, ते त्यांना खरारा करितात, त्यांची आयाळें विंचरतात, त्यांचे खूर साफ करितात, व त्यांच्या बाडबिछाइतीची व्यवस्था ठेवितात.' यावरून माझा धनी ह्मणाला, 'आतां मी समजलों; तूं जें काय एवढा वेळ बोललास त्यावरून स्पष्ट दिसतें कीं, तुह्मां 'याहूं' ची बुद्धिमत्ता किती जरी असली, तरी तुमचे धनी 'हुं हुं हूं' हेच आहेत; आणि खरोखर मी ह्मणतों कीं, तुमच्या 'याहू' प्रमाणेंच आमचे येथले 'याहू' ही 'हुं हुं हूं' च्या ताब्यांत गुण्यागोविंदानें राहते तर बरें होतें.' हें ऐकून मीं आपल्या धन्यास ह्मटलें, 'महाराज! आतां ही हकीकत पुढें चालविण्यास मला कृपा करून आग्रह करूं नका; कारण यानंतर जें काय तुह्मी माझ्या तोंडून ऐकाल, त्यापासून तुमच्या मनाला फार वाईट वाटेल!' पण तो ह्मणाला, 'कांहीं चिंता नाहीं. जें कांहीं बरें वाईट जसें असेल तसें तूं मला सांग. कांहीं अंदेशा घेऊं नको.' मीं ह्मटलें, 'जशी महाराजांची आज्ञा.' नंतर मीं पुढें बोलण्यास सुरुवात केली, ती अशी: आमच्यांत जे 'हुं हुं हूं' आहेत, त्यांना आह्मी 'घोडे' असें ह्मणतों, व ते मोठे सुंदर आणि उमदे प्राणी आहेत. त्यांची शक्ति आणि चपलता हीं वर्णनीय आहेत, आणि त्यांपैकीं जे थोरा मोठ्यांच्या पदरीं आहेत, त्यांचा, प्रवासाच्या, शर्यतीच्या, व रथ ओढण्याच्या कामीं उपयोग करितात. त्यांना कांहीं रोगराई होऊन अथवा त्यांच्या पायांना इजा होऊन ते निरुपयोगी होत तोंपर्यंत त्यांच्यावर फार ममता करितात, व त्यांची अतिशय काळजी घेतात. परंतु आतां मीं ह्मटल्याप्रमाणें त्यांना विपत्तिकाळ आला ह्मणजे मग त्यांना त्यांचे धनी विकून टाकतात, व पुढें मरेपर्यंत त्यांना नानाप्रकारच्या हालअप-

ष्टा भोगायला लागतात. मेल्यावर त्यांच्या ह्या यातना सुटतात खऱ्या, पण त्यांच्या शरीराची आणखी फार विलक्षण रीतीनें वाट लागावयाची असते! ती अशी कीं, त्यांच्या अंगाचीं कातडीं काढून तीं विकण्यांत येतात, व राहिलेला भाग कोल्हीं कुतरीं खाऊन टाकितात. परंतु सामान्य प्रतीचे जे घोडे असतात, ते, शेतकरी, गाडीवाले, व दुसरे हलके लोक यांच्या हातीं पडल्यामुळें त्यांच्या नशिबीं ह्या आतां सांगितलेल्या घोड्यांप्रमाणेंही सुख भोगण्याचें नसतें; कांकीं, हे लोक त्यांच्या पोटाला नीट न घालतां त्यांच्यापासून काम मात्र हवें तसें चोपून घेतात.' यानंतर आपले लोक घोड्यावर कसे बसतात, तसेंच लगाम, जीन, कांटा व चाबूक आणि गाडीचीं चाकें व इतर सरंजाम यांचें वर्णन मीं होईल तितकें करून, त्यांची त्यास माहिति सांगितली. शिवाय हेंही मीं आणखी सांगितलें कीं, प्रवास करितांनां रस्त्यावरील दगड वगैरे लागून त्यांच्या खुरांना इजा होऊं नये ह्मणून त्या खुरांना, लोखंड ह्मणून एक कठिण पदार्थ आहे त्याच्या पट्ट्या बसवून टाकितात.

हें सर्व वर्णन ऐकून माझ्या धन्याला फार वाईट वाटलें व रागही आला असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसलें. मग तो ह्मणाला, 'तुह्मी 'हुं हुं हूं' च्या पाठीवर कसें बसूं शकतां याचें मला मोठें नवल वाटतें! कारण आमच्या अनुभवावरून तर मीं ह्मणतों कीं, माझ्या घरांतला एखादा मेषपात्र चाकर देखील अतिशय बळकट 'याहू' ला सहज लाथेनें फेंकून देईल, अथवा त्याला खालीं पाडून व त्याच्या पाठीवर लोळून एका क्षणांत तो होता कां नव्हता असें करून टाकील!' मीं त्यास ह्मटलें, 'आमच्या कडील घोड्यांचें असें असतें कीं, ज्या ज्या कामाकरितां ते तयार करावयाचे असतात त्या त्या कामाला ते योग्य होतील अशा

प्रकारचें शिक्षण, ते तीन चार वर्षांचे असतात तेव्हां पासूनच त्यांना देण्यांत येतें. आणि जर त्यांपैकीं एखादा खव्याळच निघाला, तर त्याची गाडीकडे योजना होते. तसेंच, एकाद्याकडून लहानपणीं इतकीशी खोडी झाली कीं तिजबद्दल त्यास असें शासन करितात कीं, पुढें तशी खोडी पुनः त्यांजकडून बहुधा होतच नाहीं. यांपैकीं ज्या नरांचा उपयोग त्यांजवर बसण्याकडे अथवा ओझ्याकडे करावयाचा असतो, त्यांची रग कमी व्हावी व तें गरीब आणि आज्ञाधारक व्हावें, ह्मणून सुमारें दोन वर्षांच्या वयानंतर त्यांचें अंड बडवून टाकितात. या घोड्यांना बक्षीस व शिक्षा यांतील भेद समजतो हें खरें, तथापि एकंदरीनें त्यांना या देशांतील 'याहू' पेक्षां ह्मणजे जास्त कांहीं बुद्धीचा अंकुर आहे असें मुळींच नाहीं.'

मी जें काय बोललों तें माझ्या धन्याला नीट समजावून देण्यास मला पुष्कळच द्राविडी प्राणायाम करावा लागला; कारण त्या लोकांच्या गरजा व मनोविकार हे फार थोडे असल्यामुळें त्यांच्या भाषेंत शब्दांचा भरणाच मुळीं थोडा आहे. तथापि आपण 'हुं हुं हूं' च्या जातीस किती क्रूरतेनें वागवितों, हें ऐकून त्याच्या त्या उदार व ममताळू स्वभावास अनुरूप असा जो त्याला पराकाष्ठेचा संताप आला त्याचें यथातथ्य वर्णन करणें अशक्य आहे! त्यांत विशेषतः घोड्यांना अगदीं आपल्या अंकित करून टाकण्याकरितां जो उपाय योजितात ह्मणून मीं सांगितलें—कीं ज्याच्या योगानें त्यांच्या संततीस प्रतिबंध होतो—तो ऐकून तर तो पराकाष्ठेचाच संतापून गेला. मग तो ह्मणाला, 'जर एखादा देश असा असूं शकेल, कीं ज्यांत 'याहू' चीच बुद्धिमत्ता सर्वांत प्रबळ आहे, तर मात्र त्या ठिकाणीं सर्व सत्ता त्यांच्या हातीं असली पाहिजे; कांकीं, शक्तिवान् असून

बुद्धीचा ज्यांच्या ठायीं अभाव अशा प्राण्यांवर, ज्यांच्या अंगीं थोडीबहुत बुद्धि आहे अशांचा पगडा केव्हांना केव्हां तरी बसलाच पाहिजे हें उघड आहे. परंतु तुझ्या शरीराची ठेवण पाहून मला असें वाटतें कीं, तुमची बुद्धि केवढीही असली तरी नेहमींच्या साधारण व्यावहारिक कामांना देखील तुह्मी इतके कुचकामाचे दिसतां कीं, तशी कोणत्याही प्राण्यांची कल्पना मला येत नाहीं.' नंतर तो ह्मणाला, 'तुझे जे देशबांधव आहेत ते सर्व तुझ्याच सारखे आहेत, कीं आमच्या येथल्या 'याहू' सारखे आहेत?' मीं उत्तर केलें, 'माझ्या वयाचे जे आहेत त्या बहुतेकांसारखाच मी आहें; पण माझ्यापेक्षां वयानें जे कमी आहेत, ते व आमच्यांतील बायका ह्यांचीं शरीरें माझ्यापेक्षां फारच मृदु व सुकुमार असून, विशेषेंकरून बायकांचा वर्ण तर बहुधा दुधासारखा गोरा असतो.' तो ह्मणाला, 'तूं खरोखरच शुचिर्भूत असून फारसा कुरूप नसल्यामुळें इतर 'याहू' च्यांत आणि तुझ्यांत फरक आहे यांत संशय नाहीं; पण यापासून तुला कांहीं फायदा नसून उलटा तोटाच आहे;— कसा तर, तुझीं नखें तुझ्या मागच्या किंवा पुढच्या पायांना कांहींच उपयोगाचीं नाहींत, आणि तुझे पुढचे पाय हे खरोखर मला इतके निरुपयोगी दिसतात कीं, त्यांना तें नांव देखील शोभत नाहीं! कारण त्यांवर चालतांना मीं तुला कधींच पाहिलें नाहीं. आणि वास्तविक पहातां, जमिनीचा खरबरीतपणा सोसण्यास ते अगदीं अयोग्य आहेत. त्याचप्रमाणें एक तर, तूं बहुधा ते उघडे टाकून वागतोस; व दुसरें, केव्हां केव्हां त्यांना तूं जरी आच्छादन घालतोस, तरी ते पाठीमागच्या पायांच्या आच्छादनासारखें नसून तितकें मजबूदही नाहीं. आणखी, तुला चालतांना फार खबरदारी घेऊन चालावें लागतें; कां कीं, जर कदाचित् मागचा पाय

निसटला, तर तूं लागलाच जमिनीवर आपटल्यावांचून राहणार नाहींस!' नंतर तो माझ्या शरीराच्या इतर भागांच्या उणेपणाविषयीं बोलूं लागला. तो ह्मणाला, 'तुझें तोंड चपटें, नाक पुढें आलेलें असून, तुझे डोळे अगदीं समोर असल्यामुळें तुला डोकें फिरविल्यावांचून कोणत्याही बाजूकडे पहातां येत नाहीं. तसेंच तुला आपला पुढचा पाय तोंडाकडे नेल्यावांचून खातां येणें अशक्य आहे, व ह्मणूनच त्या तुझ्या पायांना सृष्टिकर्त्यानें ठिकठिकाणीं सांध्यांची योजना केलेली आहे. आतां तुझ्या पाठीमागच्या पायांना मात्र जे कित्येक खोलगे व सांधे आहेत, त्यांचा काय उपयोग आहे हें मला समजत नाहीं. हे पायही इतके मऊ आहेत कीं, दुसऱ्या एखाद्या पशूच्या कातड्याच्या आच्छादनावांचून जमिनीचा कठोरपणा त्यांस सहन होणार नाहीं. आणि एकंदरीनें तुझ्या साऱ्याच शरीराला शीत व उष्ण यांच्या निवारणासाठीं एके प्रकारचें उपांग किंवा कवच याची गरज असते. हें लचांड दररोज काढावयाचें व घालावयाचें हा केवढा तरी त्रास आहे बरें! आणि शेवटीं तो ह्मणाला, 'या देशांतील सर्व प्राणी स्वभावतःच 'याहू' चा तिरस्कार करितात—ह्मणजे जे निर्बल आहेत ते त्यांचें सान्निध्य टाळतात, व जे शक्तिवान् आहेत ते त्यांस धुडकावून लावितात. ह्मणून, तुमच्या ठायीं बुद्धि आहे असें जरी धरून चालेल, तरी प्रत्येकाचा तुमच्याशीं स्वभावतःच जो द्वेष आहे तो कसा नाहींसा करितां येईल हें समजत नाहीं! व या कारणास्तव आह्मांला तुह्मी आपल्या संवयीचें व उपयोगाचें कसें कराल याची मला कल्पना होत नाहीं.' तथापि तो ह्मणाला, 'सध्यां या संबंधानें बोलणें पुरें; कांकीं, तुझी स्वतःची हकीकत, तूं ज्या देशांत जन्मलास त्या देशाची हकीकत, व तूं येथें येण्यापूर्वीं तुझ्या प्रवासांत घडलेल्या

गोष्टींची हकीकत, हीं अगोदर ऐकण्याची मला उत्कंठा लागली आहे.'

मीं त्याची खातरजमा करून सांगितलें कीं, या प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें तुमची जिज्ञासा पूर्णपणें तृप्त करावी अशी माझी फार मनीषा आहे. परंतु ज्या गोष्टींच्या संबंधानें मला बोलावयाचें आहे, त्यांशीं साम्य दाखविण्यासारखें या देशांत कांहींच नसल्यामुळें, त्या गोष्टींची तुह्मांला कल्पना येणें अशक्य आहे. यास्तव सर्वच नाहींत तथापि कांहीं गोष्टी मला तुह्मांस कशातरी समजावून देतां येतील. व यांच्या संबंधानें तरी, इकडच्या वस्तूंशीं तिकडच्या वस्तूंचें साम्य दाखवितां येईल तितकें दाखवून मी आपल्याकडून होईल तितकी पराकाष्ठा करीन; परंतु या कामीं मला जेव्हां जेव्हां आपलें मनोगत कळवितांना योग्य शब्द सुचणार नाहींत, तेव्हां तेव्हां तुह्मीं कृपा करून मला साहाय्य केलें पाहिजे.'

वर सांगितल्याप्रमाणें मला हरएक प्रकारें व हरएक वक्तीं साहाय्य करण्याविषयीं माझ्या धन्यानें मोठ्या आनंदानें कबूल केल्यावर त्यास मी आपली हकीकत सांगूं लागलों. मी ह्मणालों, 'इंग्लंड ह्मणून एक बेट आहे, तेथें माझा जन्म झाला. माझे आईबाप मोठे प्रामाणिक होते. इंग्लंड हें बेट येथून फार लांब असून आपल्या अतिशय बळकट नोकरांपैकीं कोणाही एकास तेथें पोहोंचण्यास, पृथ्वीला सूर्याभोंवतीं एकदां फिरून येण्यास जितका वेळ लागतो तितका वेळ लागेल. मी शस्त्रवैद्याचा धंदा शिकलों. याचें काम असें असतें कीं, कांहीं आकस्मिक कारणानें अथवा कोणी जबरदस्ती केल्यानें शरीरास ज्या दुखापती होतात त्या नीट करावयाच्या. माझ्या देशावर राज्य करणारी एक स्त्री असून तिला आह्मी राणी असें

ह्मणतों. मीं आपला देश सोडण्याचा उद्देश, इतर देशांहून पैसा मिळवून घेऊन जावा व आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवावा, हा होय. मी ह्या आतांच्या प्रवासास निघालों त्या वेळीं माझ्या हाताखालीं पन्नास 'याहू' होते. त्यांपैकीं बहुतेक समुद्रावर मरण पावल्यामुळें मला कित्येक देशांहून त्यांच्या बदला दुसरे घ्यावे लागले. आमचें जहाज दोनदां बुडण्याच्या बेतांत आलें होतें—एक वेळ वादळाच्या योगानें; व दुसऱ्यानदां खडकाला आपटल्याच्या योगानें.' इतक्यांत माझा धनी मध्येंच बोलला, 'तुजवर इतकीं संकटें आलीं व तुझें इतकें नुकसान झालें असतां, इतर ठिकाणचे लोक तुजबरोबर येण्यास कसे धजले?' मीं ह्मटलें, 'ते लोक असे होते कीं, ज्यांच्या पदरीं गरिबी फार असल्यामुळें अथवा ज्यांनीं महान् अपराध केले असल्यामुळें ज्यांस आपली जन्मभूमि सोडणें भाग पडलें होतें, व त्या कारणानें जे जिवावर उदार होऊन आपल्या नशिबाची परीक्षा पहाण्याकरितां निघाले होते. शिवाय कित्येक कायद्याच्या जाळ्यांत सांपडून फिर्यादीअर्यादींच्या योगानें भिकेस लागलेले, कित्येक—मद्यपान, परदार व जुगार यांनीं रसातळास मिळालेले, कित्येक राजद्रोह करून पळालेले, कित्येक—खून, चोऱ्या, विषप्रयोग, खोट्या शपथा, खोटे कागदपत्र, खोटीं नाणीं व जबरीचे संभोग अशीं दुष्कर्में केलेले, कित्येक आपल्या पलटणी सोडून फरारी झालेले अथवा शत्रूस जाऊन मिळालेले, आणि कित्येक तुरुंग फोडून पळालेले असे होते. यांपैकीं एकासही स्वदेशीं परत जाऊन तोंड दाखविण्याची सोय नव्हती; कांकीं, तेथें गेलें असतां फांशीं जाण्याची अथवा तुरुंगांत उपाशी मरण्याची त्यांस भीति होती; आणि ह्मणून दुसऱ्या को-

णत्या तरी ठिकाणीं जाऊन पोटाची सोय पहाणें त्यांना भाग पडल्यामुळें त्यांनीं हें जिवावरचें काम पतकरलें होतें.'

वर सांगितलेलें माझें बोलणें चाललें असतां माझ्या धन्यानें मला पुष्कळ वेळां मधून मधून प्रश्न केले. माझ्या जहाजावरच्या लोकांपैकीं बहुतेकांनीं जे अपराध केलेले होते, व ज्यांकरितां त्यांना देशत्याग करावा लागला होता, ते त्यांचे अपराध माझ्या धन्याचे लक्षांत येण्याकरितां मला ते अनेक प्रकारांनीं त्यास समजावून द्यावे लागले. यामुळें माझें ह्मणणें त्याच्या लक्षांत येण्यास मला कित्येक दिवसपर्यंत सतत श्रम करावे लागले. असलीं दुराचाराचीं कृत्यें करण्याचा उपयोग किंवा अवश्यकता काय असावी हें त्यास मुळींच समजेना. तेव्हां याची फोड करण्याकरितां सत्ता व संपत्ति यांच्या इच्छेची कल्पना, तसेंच कामांधता, मद्यपानासक्ति, द्वेषभाव व मत्सर, यांच्या भयंकर परिणामांची कल्पना त्याच्या मनांत भरवून देण्याविषयीं मला मोठाच अट्टहास्य करावा लागला. या सर्व गोष्टींचीं लक्षणें सांगून त्यांचीं वर्णनें करण्याकरितां, कित्येक घडलेल्या व काल्पनिक गोष्टी मला त्यास सांगाव्या लागल्या. हें सर्व ऐकल्यावर, ज्याप्रमाणें एखाद्यानें कांहीं गोष्ट पूर्वीं कधीं ऐकली किंवा पाहिली नसली ह्मणजे तिच्या संबंधानें तो अगदीं आश्चर्यचकित होऊन जातो, त्याप्रमाणें माझ्या धन्याची अवस्था होऊन तो अत्यंत सखेदाश्चर्य होत्साता मजकडे टकमका पाहूं लागला. शिवाय, अधिकार, राजसत्ता, युद्ध, कायदे, शिक्षा व अशा दुसऱ्या शेंकडो गोष्टींना त्यांच्या भाषेंत शब्द नसल्यामुळें, मी काय ह्मणतों याचें माझ्या धन्यास ज्ञान करून देण्यास मला जी अडचण पडली ती तर सांगतां पुरवत नाहीं! परंतु त्याची समजूत फार पोक्त असून विचाराच्या व संभाषणाच्या योगानें त्याची आकल-

ठाणे.



नशक्ति फार वाढून, शेवटीं आपले लोक काय काय करतील आणि काय काय नाहीं, याची अटकल त्याला चांगली करितां आली. नंतर मीं त्यास ह्मटलें, 'आतां, ज्याला युरोपखंड ह्मणतात, त्या विस्तीर्ण महाद्वीपाची, व त्यांत मुख्यत्वेंकरून माझ्या स्वतःच्या देशाची कांहीं विशेष माहिती मी आपल्याला सांगणार आहें.'





# प्रकरण ५.

गलिव्हर हा आपल्या धन्यास इंग्लंडची स्थिति कथन करितो.—युरोपखंडांतील राजांमध्यें युद्धें होण्याचीं कारणें.—गलिव्हर हा इंग्लंडच्या राज्यरीतीचें निरूपण करण्यास आरंभ करितो.



आतां पुढें जें काय मी सांगणार आहें, त्या संबंधानें वाचकांनीं इतकें लक्षांत ठेवावें कीं, माझ्या धन्याशीं जें काय माझें संभाषण झालें, त्यांतील मुख्य-मुख्य मुद्यांचा हा गोषवारा आहे. त्याशीं हें माझें संभाषण एकंदर दोन अडीच वर्षांच्या काळांत अनेक वेळां मिळून झालें होतें; व त्या अवधींत मीं 'हुं हुं हूं' च्या भाषेंत जसजसा जास्त पारंगत होत चाललों, तसतसा माझ्या धन्यानें प्रत्येक गोष्टीचा जास्त जास्त खुलासा विचारीत जावा, असा एकंदर क्रम चालला होता. असो; मीं

आपल्याकडून होईल तितका यत्न करून युरोपखंडाच्या स्थितीचें चित्र त्याजपुढें मांडलें. देशांतील व्यापार व कारागिरीचीं कामें, तसेंच कलाकौशल्यें व शास्त्रें यांचें जें मीं निरूपण केलें, त्या संबंधानें माझ्या धन्यानें मला अनेक प्रश्न केले. त्यांचीं जीं उत्तरें मीं त्यास दिलीं, तीं इतकीं पुष्कळ व लांबलचक होतीं कीं, त्यांविषयीं सविस्तर लिहूं गेलें तर असले दहा ग्रंथ पुरणार नाहींत. यास्तव आम्हां दोघांमध्यें जो काय एकंदर वादविवाद झाला, त्याचा फक्त सारांश तेवढा मी या ठिकाणीं सांगणार आहें; व यांत, सत्याला सोडून बिलकूल न चालण्याविषयीं मात्र मीं फार प्रयत्न केला आहे. बाकी, हीं संभाषणें कसकशीं कोणकोणत्या वेळीं झालीं वगैरे सटरफटर गोष्टींकडे मीं मुळींच लक्ष दिलें नाहीं, तर त्या होतील तितक्या जुळवून संगतवार सांगण्याविषयीं मात्र खटपट केली आहे. या बाबतींत मला दुःख एवढेंच वाटतें कीं, माझा धनी वरील संबंधानें जें काय बोलला, व त्यानें त्याविषयीं जे काय अनुकूळ व प्रतिकूळ अभिप्राय प्रदर्शित केले, ते तसे योग्य रीतीनें व तितक्या गांभीर्यानें मला येथें सांगतां आले नाहींत; कांकीं, त्याच्या मानानें माझी योग्यता फारच कमी असून, आपल्या रानटी भाषेंत त्याच्या भाषणाचा तर्जुमा, जसा हवा, तसा होण्याची सोय नाहीं. तर आतां वरील गोष्टी लक्षांत ठेवून पुढें जें मी सांगणार आहें त्याजकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

मीं प्रथमतः आपल्या धन्यास, ऑरेंजचा राजपुत्र वुइल्यम् याच्या व त्याच्या साथीदारांच्या योगानें इंग्लंडांत जी राज्यक्रांति* झाली तिचा वृत्तांत सांगितला. नंतर तो राजपुत्र इंग्लंडचा राजा झाल्यावर त्यानें फ्रान्स देशाबरोबर

---

* ही राज्यक्रांति इ० स० १६८८ मध्यें झाली.

जी बहुत वर्षे लढाई चालविली होती तिच्या संबंधाची हकीकत, व तीच लढाई त्याच्या पाठीमागून गादीवर बसलेली हल्लींची राणी ऍन हिनें चालविली असून तीमध्यें युरोपांतील मोठमोठीं बलाढ्य राष्ट्रेंही गुंतलीं आहेत व ती लढाई अद्यापिही चालू आहे, वगैरे हकीकत मीं त्यास सांगितली. त्यानंतर त्यानें विचारल्यावरून मीं सांगितलें कीं, 'ह्या एकंदर युद्धांत सुमारें दहा लाख ' याहू ' मारले गेले असून शंभर किंवा त्यांहीपेक्षां अधिक शहरें काबीज केलीं गेलीं, व पांचशेंहून अधिक जहाजें जाळून किंवा बुडवून टाकलीं गेलीं. '

त्यानें मला विचारलें, ' एका देशानें दुसऱ्याशीं युद्ध करण्यास प्रवृत्त व्हावें याचें कारण काय व यांत त्याचा हेतु काय ? ' मीं ह्मटलें, ' तीं कारणें वगैरे पाहूं गेलें असतां असंख्य आहेत; पण त्यांपैकीं मुख्य मुख्य तेवढीं मी सांगतों. पहिलें कारण, राजे लोकांची महत्वाकांक्षा. यांना नेहमीं असें वाटत असतें कीं, आपल्या ताब्यांत जो मुलूख आहे तो आपल्याला पुरेसा नाहीं, याकरितां तो वाढविला पाहिजे, व आपल्या अमलांत जे लोक आहेत तेही थोडे असून आणखी आपल्या अमलाखालीं पुष्कळ लोक आले पाहिजेत. दुसरें कारण, राजाचें प्रधानमंडळ वाईट असलें ह्मणजे त्याच्या कारभाराला रयत त्रासते, तेव्हां तिची ओरड मोडण्यासाठीं अथवा थोडा वेळ तरी बंद करण्यासाठीं ते प्रधान लोक लढाई करण्याकरितां आपल्या राजाची उठावणी करितात. तिसरें कारण मतभेद[1]. या मतभेदाला तर कोट्यावधि प्राणी बळी पडले आहेत. हा मतभेद ह्म-

---

१ धर्मसंबंधी मतभेदावर ग्रंथकाराचा हा कटाक्ष दिसतो; कारण पूर्वी इंग्लंडांत या मतभेदामुळें मोठमोठे अनर्थ घडले आहेत.

णजे असा:—मांसाला भाकर ह्मणावयाची किंवा भाकरीला मांस ह्मणावयाचें; अमुक फळाच्या रसाला रक्त ह्मणावयाचें किंवा दारू ह्मणावयाची; शीळ घालणें हा दुर्गुण आहे कीं सद्गुण; खांबाचें चुंबन करावयाचें किंवा तो वितस्तवांत फेंकून द्यावयाचा; अंगरख्याचा रंग कोणत्या प्रकारचा असावा—काळा, पांढरा, तांबडा, कीं करडा; तसेंच तो लांब असावा कीं आंखूड असावा; अंगासारखा असावा कीं पोकळ असावा अथवा मलीन असावा कीं स्वच्छ असावा; अशा प्रकारचे शेंकडो मतभेद आहेत. एकंदरीनें मतभेदाच्या ज्या गोष्टी आहेत—व विशेषतः ज्या मुळींच महत्वाच्या नाहींत—त्यांच्या संबंधानें कडाकडीचीं युद्धें चालून जे काय अनर्थ गुदरतात व जो भयंकर रक्तस्राव होतो, तसा दुसऱ्या कोणत्याही कारणानें होत नसून तितका वेळ टिकतही नाहीं.

केव्हां केव्हां दोन राजांमध्यें तिसऱ्याच्या राज्यावर यांचा कांहीं एक हक्क नसतां त्याचें राज्य हिसकावून घेण्याच्या संबंधानें वाद लागतो; केव्हां केव्हां एखादा राजा, दुसरा आपल्याशीं हातघाईवर येईल या भीतीनें अगोदरच त्याच्याशीं युद्ध मांडतो; केव्हां केव्हां एखादा राजा, आपला

---

१ ख्रिस्ती धर्मांत बाप्तिस्म्याच्या संस्काराच्या वेळीं थोडी भाकर व मद्य देण्याची रीत आहे. ती भाकर येशूख्रिस्ताचें मांस म्हणून, व मद्य हें त्याचें रक्त समजून देतात; अशाकरितां कीं, प्रभू येशूशीं त्या मनुष्याचें तादात्म्य व्हावें. परंतु हा संस्कार कित्येक मानतात व कित्येक मानीत नाहींत.

२ येशूख्रिस्तास फांशीं दिलें तो खांब (क्रूस) पवित्र मानतात, हें प्रसिद्धच आहे.

३ हेही धर्मखात्यांतील लोकांच्या मतभेदाचेच प्रकार आहेत.

शत्रु फार बलाढ्य आहे ह्मणून अथवा फार दुर्बळ आहे ह्मणून त्याच्याशीं लढाई करितो; व केव्हां केव्हां एकाला दुसऱ्यापाशीं जें असतें तें हिरावून घेण्याची इच्छा होते ह्मणून, अथवा दुसऱ्याला तसेंच पहिल्याचें हिरावून घेण्याची इच्छा होते ह्मणून, त्या उभयतांची लढाई जुंपते, आणि ती उभयतांचेही हेतु पूर्ण होत तोंपर्यंत चालते. जेव्हां एखाद्या देशावर दुष्काळ पडून तेथील लोक अगदीं भिकेस लागतात, अथवा तेथें एखादी रोगाची सांथ उत्पन्न होऊन जिकडे तिकडे हाहाकार उडतो, अथवा त्या देशांतील लोकांमध्यें आपसांत वाद लागून ते एकमेकांस जेरीस आणतात, तेव्हां त्या देशावर हल्ला करणें ही न्याय्य गोष्ट मानलेली आहे; तसेंच आपल्या एखाद्या साथी राजाचें शहर आपल्या फार सोईचें असेल, किंवा त्याच्या राज्याचा एखादा प्रांत आपल्याला मिळाला असतां आपल्या राज्याची मर्यादा 'शास्त्रोक्त' होऊन त्याला अधिक मजबुती येईल असें असेल, तेव्हां त्याचें तें शहर अथवा प्रांत घेण्यासाठीं त्याच्याशींही युद्ध मांडणें अगदीं न्यायाचें असें मानलें आहे; त्याचप्रमाणें, जेथले लोक रानटी व गरीब आहेत अशा देशावर कोणी राजानें स्वारी केली असतां त्यानें त्या देशांत चोहोंकडे सुधारणा करण्यासाठीं तेथल्या अर्ध्या लोकांस खुशाल ठार मारावें, व बाकीच्यांस गुलाम करावें: कारण हें त्याचें करणें कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीनें अगदीं योग्य असें मानलें आहे; तसेंच एखाद्या राजावर दुसरा कोणी स्वारी करूं लागला असतां त्यानें त्याचे विरुद्ध तिसऱ्याचें साहाय्य घेतलें, तर तो साहाय्यकारी ज्याच्या उपयोगीं पडला असेल, त्यास त्यानें कैद करावें, हद्दपार करावें, व पाहिजे तर ठारही मारावें असें आहे: कांकीं, तें करणें त्याच्या पदवीस योग्य, व थोरवीस भूषणास्पद, असें मानलें आहे; शिवाय

दोघां राजांत सोयरिकीचें अथवा दुसरें कांहीं नातें असलें तर तेंही त्यांच्यांत वाद उत्पन्न होण्यास अनेक वेळां कारण होतें. त्यांत हा संबंध जितका जवळचा असेल तितका त्यांचा एकमेकांशीं वाद करण्याविषयीं कल जास्त असावयाचा. जीं राष्ट्रं दरिद्री आहेत तीं 'खा खा' करीत असतात, व जीं संपत्तिमान् आहेत त्यांच्यांत ताठा भरलेला असतो आणि गर्व व क्षुधा यांचें एकमेकांशीं सख्य असावयाचें नाहीं हें उघडच आहे! सारांश, या सर्व कारणांकरितां, ज्यांनीं कोणत्याही प्रकारें कोणास कधींही दुखविलेलें नसतें, अशा आपल्या जातीच्या प्राण्यांचा होईल तितका सप्पा उडविण्याकरितां तयार केलेला जो भाडेकरी 'याहू' ह्मणजे 'शिपाई' त्याचा धंदा सर्वांत मोठा सन्माननीय असा मानलेला आहे.

याचप्रमाणें युरोपामध्यें कांहीं भिकारी राजे आहेत—ह्मणजे ज्यांना कोणाशीं स्वतः लढण्याचें सामर्थ्य नाहीं—ते, जे संपत्तिमान् राजे आहेत त्यांना आपलें सैन्य लढाई करितां भाड्यानें देतात, व त्याबद्दल दरएक मनुष्याकरितां अमुक घ्यावयाचें असें ठरवितात. यापैकीं तीन चतुर्थांश भाग यांना स्वतःला मिळतो, व या योगानेंच त्यांचा चरितार्थ चांगला चालतो. असे राजे युरोपच्या उत्तरभागांत बरेच आहेत.'

हें ऐकून माझा धनी ह्मणाला, 'तूं जें काय लढाईच्या संबंधानें सांगितलेंस, त्यावरून बुद्धीविषयीं जी काय तूं शेखी मिरवितोस तीप्रमाणें तुमच्यांमध्यें कर्तबगारी आहे खरी बोवा! तथापि इतकें बरें आहे कीं, तुमच्या हातून फारसा अनर्थ व्हावा अशी तुमच्या शरीराची रचनाच सृष्टिकर्त्यानें केली नाहीं. कारण पहा, तुमचीं तोंडें चपटीं असल्यामुळें तुह्मी एकमेकांस चावलां असतां त्याचा कांहींएक उपयोग व्हावयाचा

नाहीं. आतां तुह्मी तें एकमेकांच्या संमतीनें केल्यास गोष्ट निराळी. तसेंच, तुमच्या मागल्या व पुढल्या पायांचीं नखें हीं इतकीं आंखूड व नाजूक आहेत कीं, आमच्याकडचा एकच 'याहू' तुमच्या कडच्या दहा बारा 'याहूं' ची सहज भंबेरी उडवून टाकील; आणि ह्मणून, युद्धांत पडलेल्या लोकांची संख्या जी तूं सांगितलीस तिच्या संबंधानें मला असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं कीं, ती गोष्ट तशी घडलेली **नसून घडली** आहे असें तूं सांगितलेंस.'

हें माझ्या धन्याचें अज्ञान पाहून मला हंसूं आलें, व मीं डोकें हालविलें. मग युद्धकौशल्याच्या कामाची मला माहिती असल्यामुळें, तोफा, बंदुका, पिस्तुलें, दारूगोळा, तरवारी, संगिनी, इत्यादि कशीं असतात व त्यांचा काय उपयोग हें मीं त्यास सांगितलें; तसेंच, वेढे, हल्ले, सुरुंग, गोळीबार, जमिनीवरील व समुद्रावरील लढाया, हजारों लोकांनीं भरलेलीं जहाजें बुडविणें, एकेका पक्षाकडील पंचवीस पंचवीस हजार लोक रणभूमीवर पडणें, त्या मरणाच्या वेदना, शरीरें छिन्नभिन्न होऊन त्यांचे तुकडे हवेंत उडणें, धूर, तोफा व बंदुकींचे आवाज, एकदम सर्वच गर्दी होणें, जखमी झालेले लोक घोड्यांच्या पायाखालीं मरणें, पळापळी, पाठलाग, जय, इत्यादिकांचेंही वर्णन होईल तितकें करून सांगितलें; त्याचप्रमाणें रणभूमीवर जिकडे तिकडे प्रेतें पडलीं आहेत, त्यांना लांडगे कोल्हीं कुत्रीं खात आहेत," तसेंच लुटालूट, स्त्रीहरण, जाळणें पोळणें, वगैरे हीं कशीं चालतात हेंही विस्तारेंकरून सांगितलें. खेरीज मीं आपल्या प्रियदेश बांधवांच्या अतुल शौर्याची कल्पना त्याच्या मनांत पूर्णपणें भरण्याकरितां त्याची अशी खात्री करून दिली कीं, त्यांनीं वेढ्यांत सांपडलेल्या शंभर शत्रूंस एकदम तोफेच्या गोळ्यानें हवेंत उडवून दिलेलें, व जहाजांतील

शेंकडों लोकांची अशीच दशा केलेली मीं स्वतः पाहिलेली आहे; आणि ते उडून गेलेले प्रेतांचे तुकडे आकाशांतून गाराप्रमाणें खालीं पडतात तें पाहून लोकांना गंमत वाटते, हेंही पण मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे.

मी या लढाईचें वर्णन आणखी पुष्कळच लांबविणार होतों, पण इतक्यांत माझ्या धन्यानें मला गप्प रहा ह्मणून सांगितलें. तो ह्मणाला, ' ज्याला ज्याला ह्मणून ' याहू ' चा दुष्ट स्वभाव ठाऊक आहे, त्या प्रत्येकाला असें ह्मटल्यावांचून राहवणार नाहीं कीं, त्यांच्या अंगांत जेवढी ह्मणून द्वेषबुद्धि भरलेली आहे तितक्याच मानानें जर त्यांच्या अंगांत शक्ति असती, तर तूं आतां सांगितलेल्यांपैकीं कोणतीही गोष्ट करायला ते खचीत चुकले नसते. ' हा संवाद जसजसा लांबत चालला, तसतसा सर्व ' याहू ' जातीविषयीं त्याच्या मनांत अत्यंत तिरस्कार येऊं लागला, व त्या योगानें, त्याच्या मनाला जो कधींच त्रास झालेला माहीत नव्हता, तो होऊं लागला. तथापि तो ह्मणाला, ' असल्या दुष्ट कृत्यांचें वर्णन ऐकण्याची मला हळू हळू संवय झाल्यावर त्यांचा मला याहून कमी तिटकारा वाटूं लागेल यांत संशय नाहीं. आतां जरी या देशांतील ' याहू ' चा मला मोठा कंटाळा आहे, तरी माझ्या खुराला एखादी कपरी लागून तो कापला गेला असतां त्या कपरीच्या खोडसाळपणाबद्दल तीस, अथवा एखाद्या मांसहारी पक्ष्याच्या निर्दयतेबद्दल त्यास, जसा मला दोष देतां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच या ' याहू ' ना मी कांहीं दोष देत नाहीं. परंतु जो प्राणी बुद्धिमत्तेचा गर्व वाहतो, त्याच्या हातून जर असलीं अंगावर शहारे येण्यासारखीं कृत्यें घडतील, तर त्याच्या त्या बुद्धीचा दुष्टपणा पशूच्या क्रौर्यापेक्षांही जास्त होय असें ह्मटलें पाहिजे ! यावरून मला असें दिसतें कीं, तुमच्या अंगीं

'बुद्धि' ह्मणून जी कांहीं आहे असा तुह्मांला मोठा अभिमान वाटतो, ती खरोखर 'बुद्धि' नसून, तुमच्यांत येवढाच कांहीं एक विशेष गुण आहे कीं, ज्याच्या योगानें तुमचे स्वाभाविक दुर्गुण मात्र हवे तितके वाढावे; दुसरें कांहीं नाहीं ! उदाहरणार्थ पहा, एखाद्या प्रवाहाचें पाणी खवळलेलें असलें ह्मणजे त्यांत पोहणाऱ्याचा चेहरा वाईट दिसतो इतकेंच नाहीं, तर तो वास्तविक असतो त्यापेक्षां जास्त मोठा व वेडाविद्रा मात्र आणखी दिसतो !'

माझा धनी आणखी ह्मणाला, 'तुझ्या ह्यापूर्वींच्या संभाषणांत लढायांच्या संबंधानें मला पुष्कळच माहिती ऐकावयास सांपडली. सबब आतां सध्यां दुसऱ्या एका गोष्टीच्या संबंधानें माझी नीटशी समजूत झाली नाहीं, तेवढी मला समजावून सांग. तूं पूर्वीं मला सांगितलेंस कीं, तुझ्या गलबतावरच्या लोकांपैकीं कांहीं कायद्याच्या योगानें भिकेस लागल्यामुळें त्यांना आपला देश सोडावा लागला होता; पण कायदा ह्मणजे लोकसंरक्षणासाठीं केलेले नियम, असें त्याचें लक्षण तुझ्याच सांगण्यांत एके वेळीं आलें होतें; तर असा लोकसंरक्षणाच्या हेतूनें केलेला जो तुझा कायदा, तोच लोकांच्या नाशास कारणीभूत व्हावा हें कसें, हें मला समजलें नाहीं; ह्मणून त्या कायद्याच्या व्याख्येची जरा मला जास्त फोड करून सांग; आणि त्या कायद्याची अंमलबजावणी करणारे तुझ्या देशाच्या हल्लींच्या रीतीप्रमाणें जे कोणी असतील, त्यांजविषयींही माहिती मला सांग. कारण वास्तविक पाहिलें तर बुद्धिमान् प्राण्याला त्याची स्वाभाविक जी बुद्धि तीच कोणत्याही कामांत मार्गदर्शक असली ह्मणजे पुरे आहे; असें असतां तुह्मी स्वतः बुद्धिमान् असल्याचा डौल मिरवितां, तर तुह्मांला काय करावें आणि काय करूं

नये हें समजण्याला स्वतःच्या बुद्धीखेरीज आणखी कायद्याचें लोढणें तें कशाला लागतें?'

मीं त्यास सांगितलें, 'महाराज, कायदा ह्मणजे कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. तें एक शास्त्रच आहे. त्या शास्त्रांत मी फारसा पारंगत नाहीं. फक्त माझ्या कांहीं हक्कांच्या वगैरे संबंधानें ज्या कोणी आगळिकी केलेल्या होत्या, त्या आगळिकींविषयीं न्याय होऊन त्या अगळिकी करणारास योग्य शासन व्हावें ह्मणून मी मोठमोठे वकील करून व्यर्थ खर्चाच्या पेचांत पडलों होतों, यामुळेंच त्यांतली कांहीं माहिती मला झालेली आहे. तथापि एकंदरीनें या विषयाच्या संबंधानें मजकडून होईल तितकी फोड मी करून दाखविण्यास तयार आहें.'

मीं ह्मटलें, 'आमच्यामध्यें असे कांहीं लोक आहेत कीं, त्यांना लहानपणापासून कांहींएक प्रकारचें शिक्षण मिळत असतें; व त्यांच्या त्या शिक्षणाचा उपयोग हा कीं, एका शब्दांत जें काम व्हावयाचें त्या ठिकाणीं शेंकडो किंवा हजारो शब्दांची योजना करून खूब पांडित्य करावयाचें: अशाकरितां कीं जें **पांढरें** आहे तें **काळें** ह्मणून सिद्ध करून दाखवावयाचें, व जें **काळें** आहे तें **पांढरें** ह्मणून सिद्ध करून दाखवावयाचें. हें काम, त्यांना ज्या मानानें पैसे द्यावे त्या मानानें कमी अधिक रीतीनें ते चोख बठवून देतात. या लोकांची जी एकंदर जमात आहे, तिचे, देशांतील सर्व लोक हे केवळ बंदे झालेले आहेत. उदाहरणार्थ, जर माझ्या एखाद्या शेजाऱ्याच्या मनांत आलें कीं, माझी जी गाय आहे ती आपल्याला असावी, तर तो या कायदे पंडितांपैकीं एखाद्याला भाड्यानें आपल्या तर्फेनें उभा करून, ही गाय आपल्याला मिळाली पाहिजे हें सिद्ध करण्याची तजवीज करितो. तेव्हां मलाही मग आपला हक्क शाबीत कर-

ण्याकरितां दुसरा तसाच भाडेकरी तयार करावा लागतो; कारण कायद्याचा असा नियम आहे कीं, कोणाही मनुष्यानें आपला स्वतःचा पक्ष सिद्ध करण्याकरितां स्वतः बोलतां कामा नये, तर जें काय बोलावयाचें असेल तें अशा भाडेकऱ्यांपैकीं एकाद्याच्या तोंडून बोललें पाहिजे. आतां या खटल्यांत मीं जो या गाईचा मालक, त्याला दोन प्रकारचे तोटे सोसावे लागतात. एक तोटा असा कीं, माझ्या तर्फेचा तो भाडेकरी ह्मणजे वकील, त्याचा पहिल्यापासून खोटा पक्ष खरा करून दाखविण्यांत हातखंडा असल्यामुळें, न्याय्य गोष्टीची तरफदारी करण्याला त्याला इतकें जड जातें कीं, त्यानें आपल्याकडून जरी मोठी खटपट करून ती केली, तरी त्या कामीं त्याचा अर्थात सर्व घोटाळा व फजिती होऊन जाते. दुसरा तोटा असा असतो कीं, माझ्या वकिलाला जें काय बोलावयाचें तें फार जपून बोलावें लागतें; नाहीं तर न्यायाधिशाची मर्जी खपा होऊन तो त्याची चांगली तासनपट्टी काढील, व असें झालें ह्मणजे तो आपल्या धंद्याला कुचकामाचा ठरून त्याचे धंदेभाई त्याला मुळीं विचारणार देखील नाहींत! मग या कामांत मी जो फिर्यादी, त्या मला आपली गाय आपल्यापाशीं रहाण्याकरितां आणखी दोन प्रकारचे इलाज करावे लागतात. एक हा कीं, माझ्या प्रतिपक्ष्याचा जो वकील त्याला दुप्पट फी भरून आपल्या पक्षाकडे वळवावें लागतें. असें मीं केलें ह्मणजे, तो आपलें कूळ जो माझा प्रतिपक्षी, याचा विश्वासघात करून तो आपल्या बाजूकडे न्याय आहे असें प्रतिपादन करितो, व त्या योगानें माझें काम होतें; कांकीं न्यायाच्या बाजूकडचा निकाल न्यायाधीश कधीं करावयाचा नाहीं. दुसरा इलाज हा कीं, माझी गाय माझ्या प्रतिपक्ष्याचीच आहे असें मला आपल्या वकिलाकडून न्यायाधीशास भास-

वून देऊन त्याजकडून मला आपला पक्ष निर्बल करून दाखवावा लागतो. ह्मणजे त्याच्या उलट निवाडा होऊन माझी गाय मला मिळते !

आतां हेंही सांगणें अवश्य आहे कीं, हे जे न्यायाधीश मीं सांगितले—ह्मणजे ज्यांच्या हातीं मालमत्तेचे तंटे निवडण्याचें व अपराध्यांची चवकशी करून त्यांस शिक्षा वगैरे देण्याचें काम असतें—ते अत्यंत कुशल अशा वकिलांपैकींच जे ह्मातारे व आळशी झालेले असतात त्यांतून निवडून नेमिलेले असतात, व त्यांचें बहुतेक आयुष्य सत्य आणि न्याय यांस विरुद्ध जे पक्ष त्यांची तरफदारी करण्यांत गेलेलें असल्यामुळें, दगलबाजी, खोटी प्रतिज्ञा, जुलूम, यांचाच पक्षपात करण्याकडे त्यांच्या मनाचा स्वाभाविक कल असतो; तो इतका कीं, जो पक्ष उघड• उघड न्यायाचा असतो, त्याच्या तर्फेनें निकाल करण्याकरितां त्यांस मोठा लांच दिला तरी तो ते बेलाशक घेण्याचें नाकारितात; कारण त्यांना असें वाटत असतें कीं, आपला धंदा व आपला अधिकार यांस न शोभणारी अशी ही गोष्ट करून आपल्या ब्रीदास बट्टा आणला तर त्यांत मग आपला बोज काय रहाणार ?

'या वकील लोकांत असा एक ठरीव प्रकार होऊन गेला आहे कीं, जी कोणतीही गोष्ट पूर्वी कधीं एकदां होऊन गेली• असेल, तीच पुनः **कायदेशीर रीतीनें** करितां येते; आणि ह्मणून, धडधडीत अन्यायाचे व मनुष्यमात्राच्या बुद्धीस केवळ विपरीत वाटणारे असे जेवढे जेवढे ह्मणून ठराव न्यायाधिशांच्या हातून झालेले असतात, ते सर्व **पूर्वींचे दाखले** ह्मणून हे वकील लोक मोठ्या काळजीनें लिहून ठेवितात, आणि पुढें प्रसंग पडेल त्या वेळेस अन्यायाच्या पक्षसमर्थनार्थ न्यायाधीशापुढें या दाखल्यांचा

आधार सांगून त्याच्या जोरावर मोठें पांडित्य करितात, व त्या दाखल्याच्या आधाराप्रमाणें न्यायाधीशही हरएक कामांत वागण्यास कमी करीत नाहींत.

'हे वकील लोक आपापल्या पक्षकारांच्या तर्फे न्यायाधीशापुढें काम चालवीत असतां, खटल्याचें मुख्य स्वरूप काय आहे त्याजकडे मुद्दाम बिलकूल लक्ष न देतां, खटल्याच्या संबंधांत ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं अशा इकडच्या तिकडच्या गोष्टी आणून मोठ्या जोराचें, दांडगाईचें, व त्रासदायक असें पाल्हाळिक भाषण करितात. उदाहरणार्थ, मागचा गाईचाच खटला घ्या. त्यांत माझ्या प्रतिपक्षाचा माझ्या गाईवर कसा हक्क पोहोंचतो हें ते पहावयाचे नाहींत, तर ती गाय काळी आहे का तांबडी आहे, तिचीं शिंगें लांब आहेत का आंखूड आहेत, ती ज्यांत चरते त्या कुरणाचा आकार वाटोळा आहे कीं चौकोनी आहे, तिचें दूध घरीं काढितात कीं रानांत काढितात, तिला कधीं कधीं अमुक अमुक रोग असतो कीं नाहीं, असली चर्पटपंजरी ते चालवितात. हें झालें ह्मणजे, मागें सांगितलेले **पूर्वीचे दाखले** ते पहातात, आणि नंतर आजचा आठ दिवसांवर, आठ दिवसांचा पुढें महिन्यावर, महिन्याचा पुढें बारा महिन्यांवर, असा तो खटला तहकूब होत जातो, व पंचवीस तीस वर्षांनीं त्याचा एकदांचा निकाल लागतो!

'दुसरें असें आहे कीं, हे वकील लोक ज्या कायद्यांचा अभ्यास करून त्यावर मोठे धंदेवाले बनतात, त्या कायद्यांची भाषा अशी कांहीं सांकेतिक व घेडगुजरी असते कीं, ती त्यांच्या धंद्यांतल्या मनुष्यावांचून दुसऱ्या कोणासही समजावयाची नाहीं. बरें, हे कायदे तरी थोडेथोडके असतात असें नाहीं. वर्षानुवर्षे त्यांची संख्या वाढतच असते. अशा या कायद्यांच्या घोटाळ्याच्या योगानें खरें आणि खोटें, न्याय



आणि अन्याय, यांचा चुथाडा उडून जातो. उदाहरणार्थ, एक शेत आहे, तें सहा पिढ्यांपासून माझ्या घराण्याकडे चालत असून तें माझ्या बापाच्या पश्चात् मला मिळावयाचें आहे. पण तें खरोखर माझेंच का दोनशें कोस दूर राहणाऱ्या एखाद्या गोमाजीचें, याचा निकाल लागण्यास पंचवीस तीस वर्षें लागतात ! राजद्रोही लोकांची चवकशी करण्याची रीत ही मात्र ह्यापेक्षां फारच थोडक्यांत असून वाखाणण्यासारखी आहे. ती अशी कीं, अशा कोणा अपराध्याची चवकशी करावयाची असली ह्मणजे न्यायाधीश हा, अधिकारी लोकांच्या मनाचा त्या अपराध्याच्या संबंधानें कसा काय कल आहे त्याची अगोदर गुप्त रीतीनें माहिती आणतो; नंतर कायद्याचा सर्व संस्कार बाह्यात्कारीं यथास्थित करून, तो त्या अपराध्यास सोडून देतो अथवा त्यास फांशीची शिक्षा देतो ! '

इतकें बोलणें झाल्यावर माझा धनी मध्येंच बोलूं लागला. तो ह्मणाला, ' तूं जें काय सांगितलेंस त्यावरून असें दिसतें कीं, हे वकील लोक ह्मणजे केवळ बुद्धीचे सागर असले पाहिजेत; तर ते असल्या धंद्यांत न शिरतां लोकांस नीति व ज्ञान ह्यांचें शिक्षण देण्यांत आपलें आयुष्य खर्चितील अशी तजवीज होत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे ! ' मीं ह्मटलें, ' महाराज ! त्या लोकांच्या वर्णनावरून ते केवळ बुद्धीचे सागर असावे असें आपणास वाटलें खरें, परंतु त्यांच्या धंद्याच्या बाहेरच्या ज्या गोष्टी असतात त्यांच्या संबंधानें पाहूं गेलें तर ते अगदीं अज्ञानी व मूर्ख असतात—इतके कीं, साधारण चार लोकांत त्यांना दोन शब्द देखील नीट बोलतां येण्याची मारामार असते; व ते, ज्ञान आणि नीति ह्यांचे अगदीं उघड शत्रु असून, आपल्या धंद्याच्या संबंधानें ज्याप्रमाणें पांढऱ्याचें काळें

भासविण्यांत मोठे पटाईत असतात, त्याचप्रमाणें मनुष्यमात्राच्या ज्ञानाचा जेणेंकरून विपर्यास होईल अशा प्रकारचे उपाय योजण्यांत मोठे निष्णात असतात.





## प्रकरण ६.

ॲन राणीच्या कारकीर्दींत इंग्लंड देशांत असलेल्या स्थितीचें वर्णन पुढें चालू.—युरोपांतील राजांच्या मुख्य प्रधानांचें आचरण.



मागील प्रकरणांत वकील लोकांच्या संबंधानें जें काय मीं आपल्या धन्यास सांगितलें, त्याविषयीं त्याची समजूत कांहीं बरोबर झाली नाहीं. तो ह्मणाला, 'या वकील लोकांनीं स्वतः इतकी मेहनत व त्रास सोसून आपल्या बांधवांना दुःख देण्याकारितां अन्यायाच्या मार्गाचें अवलंबन करावें यांत त्यांचा हेतु तरी काय? तसेंच, हें काम ते भाड्यानें करतात ह्मणून जें तूं ह्मणालास, तें तर मला मुळींच समजलें नाहीं.' त्यावरून पैसा ह्मणजे काय, त्याचा उपयोग कोणता, वगैरे गोष्टी मीं त्यास मोठ्या मेहनतीनें समजावून सांगितल्या. मीं ह्मटलें, 'ज्या कोणा 'याहू' पाशीं या मौ-

ल्यवान् पदार्थांचा मोठा संचय असतो, त्याला जें काय पाहिजे तें मिळूं शकतें. ह्मणजे, उंची वस्त्रें, मोठमोठाल्या हवेल्या, जमीन जुमला, चैनीचे खाण्यापिण्याचे पदार्थ, किंवा जें काय तो चाहील तें त्याला पैशाच्या साधनानें मिळूं शकतें. अशी या पैशाच्या अंगीं मोठी अतुल शक्ति असल्यामुळें, आह्मां 'याहूं' ना तो कितीही मिळाला तरी तो मनाप्रमाणें खर्च करण्यास अथवा संग्रहीं ठेवण्यास पुरा पडतच नाहीं. तसेंच, देशांत श्रीमंत मनुष्य हजारांत एक असून त्याची सर्व चैन गरीब मनुष्यांच्या मेहनतीवर चाललेली असते. खेरीज, या थोड्याशा श्रीमंत लोकांची अशी चैन चालण्याकरितां, जे हजारों गरीब लोक असतात त्यांना फार थोड्या मजुरीवर सारा दिवस मेहनत करून शिवाय अर्धपोटीं रहावें लागतें.' या विषयाच्या संबंधानें मीं आपल्या धन्यास पुष्कळ प्रकारची माहिती अनेक उदाहरणें देऊन खुलासेवार सांगितली. परंतु त्याची नीटशी समजूत पडली नाहीं. कारण तो असें गृहीत धेऊन चालला कीं, पृथ्वीवर जे जे पदार्थ उत्पन्न होतात त्यांजवर सर्व प्राण्यांचा हक्क आहे, व त्यांत विशेषतः जे सर्वांत बुद्धीनें श्रेष्ठ आहेत त्यांचा तर आहेच आहे. ह्मणून तो ह्मणाला, 'ज्यांना अतिशय खर्च लागतो असे जे चैनीचे खाण्याचे पदार्थ ते कोणते, व त्यांची तुह्मांला काय ह्मणून गरज लागते, तें सांग.' त्यावरून तशा पदार्थांचे ( पक्वान्नांचे ) जितके ह्मणून प्रकार माझ्या लक्षांत आले तितके मीं त्यास सांगून ते करण्याच्या ज्या अनेक रीती आहेत त्या सांगितल्या. तसेंच, ते बनवण्यासाठीं देशोदेशीं गलबतें पाठवून नानाप्रकारचे जिन्नस आणावे लागतात, व त्यांच्याबरोबर लागणारीं पेयें आणण्यासाठींही इतकीच मोठी खटपट करावी लागते, वगैरे मजकूर सांगितला. आणखी मीं ह्मटलें कीं, 'आ-

मच्यांतील थोरांच्या स्त्रियांपैकीं एखादीच्या फराळाच्या पदार्थांतील जिनसांचा विचार केला असतां, ते सर्व जिन्नस मिळण्याला कित्येक लोकांची तीन तीन वेळ पृथ्वीप्रदक्षिणा झालेली असते. आणि ज्या पात्रांत ती ते पदार्थ घेऊन खाते तें पात्रही मिळण्याला अशीच यातायात पडलेली असते.' हें ऐकून माझा धनी ह्मणाला, 'ज्या देशांत तेथील लोकांना पुरेसें अन्नपाणी मिळत नाहीं तो देश अगदीं भिकारी असला पाहिजे. आणि विशेषतः ज्या एवढ्या मोठमोठ्या प्रदेशांचें तूं वर्णन केलेंस, तेथें सर्व लोकांस लागणारें पेय पुरेसें नसावें व तें आणण्याकरितां लोकांना जलपर्यटनें करावयास लागावीं याचें मला मोठें नवल वाटतें!' मीं उत्तर केलें, 'माझी प्रियभूमि जो इंग्लंड देश, त्यांत अन्न, व धान्यापासून आणि कित्येक झाडांच्या फळांपासून काढलेलें उत्कृष्ट मद्य इतकें तयार होतें कीं, तेथें जितके लोक आहेत त्यांच्या तिप्पट लोकांस तें पुरून उरेल. व ही गोष्ट मनुष्यमात्रास लागणाऱ्या इतर वस्तूंसही लागू आहे. परंतु आमच्यांतील पुरुषांचा ऐषआराम व आहारविहार आणि बायकांचा दिमाख इतका कांहीं बेसुमार आहे कीं, त्यासाठीं आह्मांला आमच्या देशांतील बहुतेक जिन्नस दुसऱ्या देशांत पाठवून त्यांच्या बदला रोग, मूर्खपणा, दुराचार, हीं ज्यांहींकरून उत्पन्न होतात असले जिन्नस आणावे लागतात. आणि यामुळेंच आमच्यांतील हजारों लोकांस उदरनिर्वाहाकरितां भीक, चोरी, दगाबाजी, हांजीहांजी, खोट्या शपथा, खोटे दस्तऐवज, जुगार, पुंडाई, विषप्रयोग, लोकांची बेअब्रू करणें, पाखंडवाद, इत्यादिकांचें अवलंबन करावें लागतें.' ह्या शेवटच्या गोष्टींचीं लक्षणें मला आपल्या धन्यास समजावून देण्यास फारच प्रयास पडले.

'मद्याच्या संबंधानें आणखी मीं त्यास असें सांगितलें कीं, 'तें जें आमच्या देशांत आणितात, तें कांहीं पाण्याच्या किंवा दुसऱ्या पेय पदार्थांच्या ऐवजीं उपयोगीं पडावें ह्मणून आणीत नाहींतः तर त्याच्या योगानें मनुष्याची शुद्धि जाऊन तो मजा करायाला लागतो, त्याच्या मनाला खिन्नता आली असली तर ती निघून जाते, नानातऱ्हेच्या कल्पना त्याच्या मनांत येतात, त्याची उमेद वाढते, व भय नाहींसें होतें; आणि शेवटीं, बुद्धीचा सर्व शून्याकार बनून मनुष्यास त्याच्या अवयवांचाही उपयोग नाहींसा होतो, व त्याला गाढ झोंप लागून जाते; (मात्र इतकें खरें कीं, तो पुनः उठल्यावर आजारी व निरुत्साही असा होतो) एकंदरींत काय कीं, या मद्यपानाच्या योगानें आमच्यांत नानाप्रकारचे रोग शिरले आहेत, व आह्मी अल्पायुषी आणि दुःखी झालों आहों.'

'परंतु याखेरीज आमच्यांतील बहुतेक लोक, श्रीमंत लोकांस व एकमेकांस लागणाऱ्या प्रपंचाच्या सोईच्या व जरूरीच्या वस्तूंचा पुरवठा करून आपला निर्वाह करितात. उदाहरणार्थ, माझ्यावरूनच सांगतों, मी स्वदेशीं असलों ह्मणजे शेंकडों कारागिरांनीं तयार केलेल्या जिनसा आपल्या डोक्यावर घेऊन लोकांच्या दारोदार फिरतों, व त्यांस त्या लागतील तशा देतों; तसेंच माझें घर व त्यांतील सामान सुमान हींही तयार करण्याला शेंकडों कारागिरांचे श्रम लागलेले असतात; आणि त्याचप्रमाणें माझ्या बायकोला नटविण्याकरितां याच्या दसपट लोकांचे श्रम लागलेले असतात.'

आमच्या जहाजावरचे पुष्कळ लोक अनेक प्रकारचे रोग होऊन मरण पावले, असा पूर्वी माझ्या बोलण्यांत संबंध आला होता. तेव्हां अशा आजारी लोकांची शुश्रूषा क-

रून उदरनिर्वाह चालविण्याचा ज्या कांहीं लोकांचा धंदा आहे, त्यांच्याविषयीं माहिती मी आपल्या धन्यास सांगू लागलों. परंतु मला आपलें ह्मणणें त्याच्या मनांत भरविण्यास पराकाष्ठेचे आयास पडले. तो ह्मणाला, 'आमच्यांतील 'हुं हुं हूं' हा मरणापूर्वीं कांहीं दिवस अशक्त व उदासीन होतो अथवा कांहीं कारणानें त्याच्या एखाद्या अवयवाला इजा होते हें खरें, तथापि तूं जें काय सांगतोस त्याचा विचार केला ह्मणजे, ज्या सृष्टिकर्त्यानें हरएक वस्तु पूर्णतेस आणिली आहे त्यानेंच तुमच्या शरीरांस अशीं एकसारखीं दुःखें होऊं द्यावीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट दिसते. तर अशीं जीं असंभाव्य--कीं ज्यांना कांहीं आगापिछा दिसत नाहीं—त्या दुःखांचीं कारणें तूं मला सविस्तर सांग.' त्यावरून मीं त्यास सांगितलें, 'आह्मीं हजारों प्रकारच्या अशा कांहीं वस्तु खातों कीं, त्या परस्परांचे आमच्या शरीरांवर उलट परिणाम होत असतात. तसेंच, आह्मांला भूक लागली नसतां आह्मी अन्न खातों, व तहान लागली नसतां पाणी पितों; त्याचप्रमाणें सबंध रात्रीच्या रात्री आह्मी अतिशय अंमल आणणारीं मद्यें एकसारखीं पीत असतों व त्या अवधींत एक घांसभर देखील अन्न खात नाहीं. त्या योगानें आह्मांस मांद्य येतें, आमच्या शरीराचा दाह होतो, व आह्मांस जोराची हागओक लागते, अथवा आमची पचनशक्ति बंद होते. तसेंच, कांहीं स्पर्शजन्य रोग आहेत ते बापापासून लेंकाला, लेंकापासून नातवाला असे पिढ्यानपिढ्या चालत आलेले असतात. सारांश, मनुष्य मात्राच्या शरीरास जे नाना प्रकारचे रोग जडतात, त्यांची गणती करूं लागल्यास कधींच संपावयाची नाहीं. फार काय सांगावें, एकेका अवयवाला आणि एकेका सांध्याला पांच पांचशें सहा सहाशें देखील रोग जडलेले असतात!

ह्मणजे, शरीराच्या बाहेरच्या व आंतील प्रत्येक भागास रोगाची आपली कायमची वसाहतच झालेली असते. या रोगांवर उपाय करण्याचा अथवा उपाय करण्याविषयीं डौल मिरविण्याचा धंदा जे करितात त्यांनाच ‘ वैद्य ’ असें ह्मणतात. या वैद्यविद्येंत मीही थोडासा पारंगत असल्यामुळें, हे लोक कोणत्याप्रकारें आपलें काम करितात, त्या गोष्टीचा बराच उलगडा मला आपणांस करून सांगतां येईल.

‘ या वैद्य लोकांचें मत असें आहे कीं, शरीरांत जेवढे ह्मणून रोग उत्पन्न होतात तेवढे सर्व ओ येई तोंपर्यंत खाऊन अजीर्ण झाल्यानें होतात; आणि ह्मणून, त्या सर्व घाणीचा झाडा होऊन जाणें अवश्य आहे. तेव्हां ते प्रथम असें करितात कीं, कांहीं प्रकारच्या वनस्पति, खनिज द्रव्यें, गोंद, तेलें, शिंपा, क्षार, रस, समुद्रकांठचें एके प्रकारचें गवत, झाडांच्या साली, व मासे आणि दुसरे अनेक प्रकारचे घाणेरडे पदार्थ यांचें एक मिश्रण तयार करितात. त्याचा वास व स्वाद इतका खराब असतो कीं, एकदम त्याची मनुष्याला शिसारी येते; आणि तें पोटांत गेलें कीं लागलेंच उमदळून येऊन ओकून पडतें. याला ते लोक ‘ओकारीचा विधि’ ह्मणतात. अथवा वर सांगितल्या प्रकारचें व आणखी दुसरे कांहीं विषारी वगैरे पदार्थ मिळवून त्यांचें एक असेंच खराब मिश्रण तयार करून पोटांत घ्यावयास देतात. तें घेतलें कीं, पोट मोकळें होऊन सर्व झाडा होऊन जातो. याला ते लोक ‘जुलाब’ ह्मणतात. यांपैकीं एक किंवा दुसरा विधि झाला ह्मणजे त्या लोकांच्या मतानें मनुष्याच्या शरीरांतील रोगाचें मूळ गेलें. बाकी तो बरा होणें किंवा न होणें हें वास्तविक पहातां त्याच्या दैवयोगावरच अवलंबून असतें !

‘ परंतु खरोखरीच्या रोगापेक्षां पुष्कळ काल्पनिक रो-



गच आमच्या लोकांना होत असतात, व त्या रोगांना या वैद्य लोकांनीं तशीं काल्पनिक औषधेंही शोधून काढिलीं आहेत. या रोगांना शेंकडों नांवें आहेत, व ते बरे करण्यास ज्या द्रव्यांची योजना करितात, तींही अनेक आहेत. हे काल्पनिक रोग आह्मां 'याहूं' पैकीं बायकांना नेहमीं फार होत असतात.

'वैद्यकीचा धंदा करणारे हे लोक फारच उत्तम भविष्यसूचक असतात—असे कीं, त्यांचें भविष्य शंभरांतून निदान नव्याण्णव गोष्टींत खरें ठरतें. त्यांतही हें भविष्य, जेव्हां रोग असाध्यसे दिसतात, तेव्हां हटकून अनुभवास येतें; कारण मरण हें त्यांचे हातांत असल्यामुळें, कदाचित् रोगी बरा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तरी, आपलें भविष्य खोटें ठरून आपली फजिती होण्यापेक्षां, वेळेवरच कांहीं औषध देऊन तें भविष्य जिच्या योगानें खरें ठरून आपलें शहाणपण मिरवलें जाईल अशी तजवीज कशी करावी हें त्यांना चांगलें माहीत असतें.

'हे लोक, जीं दादलाबायलें एकमेकांस कंटाळलेलीं असतात त्यांना, त्याचप्रमाणें सर्वांत जें वडील मुलगे असतात त्यांना, राजांच्या मुख्य प्रधानांना, व पुष्कळ वेळां स्वतः राजांना, विशेष उपयोगीं पडतात.'

पूर्वी एके प्रसंगीं माझें आपल्या धन्याशीं सामान्यतः राज्यरीत कशी असते याविषयीं बोलणें झालें होतें. व त्यांत खुद्द आपल्या देशाची जी उत्तम राज्यरीति आहे—कीं जी पाहून पृथ्वीवरच्या सर्व देशांतील लोकांनीं आश्चर्यचकित व्हावें, व जी आपल्याला असण्याविषयीं उत्कट इच्छा करावी—तिचें निरूपण मीं बरेंच सविस्तर केलें होतें. त्यांत सहजगत्या माझ्या बोलण्यांत राजाच्या मुख्य प्रधानाचा संबंध आलेला होता. तें माझ्या धन्याच्या लक्षांत राहून त्यानें, मु-

ख्य प्रधान ह्मणजे कोण असतो, त्याचें काम काय, वगैरे-विषयीं माहिती सांगण्याविषयीं मला हुकूम केला.

मीं त्यास सांगितलें कीं, ‘ मुख्य प्रधान हा मनुष्य असा असतो कीं, आनंद आणि दुःख, प्रीति आणि द्वेष, व दया आणि क्रोध हीं त्यास यत्किंचितही माहीत नसतात. निदान इतकें तरी खरें कीं, संपत्ति, अधिकार व पदव्या यांच्या अनावर इच्छेखेरीज कोणत्याही दुसऱ्या मनोविकारास तो बिलकूल वश नसतो; तसेंच, तो जे शब्द बोलतो, त्यांचा उपयोग, त्याच्या मनांत जें काय बोलावयाचें असतें तें दर्शविण्याकडे तो मुळींच करीत नाहीं—ह्मणजे तो खरें बोलतो तेव्हां तें दुसऱ्यास खोटें भासावें अशा उद्देशानें बोलतो, आणि खोटें बोलतो तेव्हां तें दुसऱ्यास खरें वाटावें अशा उद्देशानें बोलतो. ज्या लोकांच्या परोक्ष तो त्यांची स्तुति करितो त्यांच्यावर त्याची मेहेरबानी खास होणार असें समजावें; आणि ज्यांची स्तुति तो त्यांच्या तोंडावर अथवा दुसऱ्याजवळ करितो त्यांजवर त्याची इतराजी होऊन ते त्या वेळेपासून त्याच्या आश्रयास सर्व प्रकारें मुकणार असें समजावें. त्यानें वचन दिलें, आणि तेंही शपथेवर दिलें असलें, ह्मणजे त्याच्यापासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं असें समजावें; व तसें झालें ह्मणजे त्या वेळेपासून शहाणा व विचारी मनुष्य असेल तो आपलें काम त्याच्याकडून होण्याची आशा अजीबात सोडून देतो.

‘ मुख्य प्रधानाच्या पदवीस चढूं इच्छिणाऱ्यांस कित्येक विशेष गोष्टींचें अवलंबन करावें लागतें. एक, त्या जागेवर असणाऱ्या मनुष्याचा दग्यानें गळा कापणें, अथवा त्याच्या विरुद्ध खटपटी करून तो सर्व लोकांस अप्रिय होईल व त्याला कोणचाही आधार रहाणार नाहीं असें करणें; दुसरा मार्ग असा कीं, राजदरबारीं जे अन्याय व दुराचार चालत

असतील, त्यांच्या विरुद्ध मोठमोठ्या प्रसिद्ध ठिकाणीं भरलेल्या सभांतून जोरानें बोलून सुधारणा करण्याविषयीं आपली भली मोठी जंगी आस्था दाखविणें; शिवाय आणखीही कित्येक प्रकार आहेत. यापैकीं दुसऱ्या प्रकाराचा अवलंब करणारे लोकच राजाला फार पसंत पडतात. कारण हे जे सुधारणेविषयीं जंगी आस्था दाखविणारे असतात, तेच पुढें आपल्या धन्याची लहर आणि त्याचे मनोविकार यांचे पक्के गुलाम बनून जातात! या प्रधान लोकांच्या हातीं कामगारांच्या वगैरे सर्व जागा भरण्याचें असल्यामुळें, दरबारांत ज्यांचें वजन असतें अशा बहुतेक लोकांस त्या जागांच्या रूपानें लांच देऊन आपली स्वतःची जागा ते कायम ठेवितात. आणि शेवटीं, 'शिक्षेच्या बहालीचा कायदा' ह्मणून 'जुक्ती' काढून, पुढें आपणांवर येणारीं किटाळें ते अगोदरच नाहींतशीं करून टाकितात; व अखेरीस राष्ट्राला सर्वस्वीं नागवून व आपली तुंबडी भरून मग आपल्या कामाचा राजीनामा देतात.

'मुख्य प्रधानाचा वाडा हा इतरांस त्याचा धंदा शिकण्याची शाळाच होय. त्याच्या येथले हुजरे, देवडीवाले, हे प्रत्येक कामांत आपल्या धन्याचें अनुकरण करून इतर प्रधानांच्या जागा पटकावतात; आणि उद्दामपणा, असत्य भाषण, व लांच घेणें या तीन कामांत त्याच्यावरही कडी करण्याइतके पटाईत होतात. मग त्यांचें महत्व इतकें वाढतें कीं मोठमोठे लोक देखील त्यांच्या पायांशीं लोळूं लागतात; आणि कधीं कधीं तर ते आपल्या कौशल्याच्या व उद्धटपणाच्या बळावर क्रमाक्रमानें आपल्या धन्याच्याही पदवीस पोहोंचतात.

'खेरीज मुख्य प्रधानाचा एक कोणी तरी 'बगल्या' असतो, व मुख्य प्रधानाची जी काय मेहेरनजर व्हावयाची

असते, तिचें सर्व काम या बगल्याच्या मार्फत चालतें— तें असें कीं, ज्याला आपलें काम करून घ्यावयाचें असेल त्याला बगल्याचा वशिला हाच शेवटचा उपाय होय; त्याच्या पलीकडे उपाय ह्मणून राहिला नाहीं असें समजावें. सारांश, सर्व राज्यसूत्रें वस्तुतः त्याच्याच हातीं असतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं.'

एके दिवशीं, आमच्या देशांतील अमीरउमरावांच्या संबंधानें मी आपल्या धन्याशीं बोलत असतां त्यानें माझी मोठी तारीफ केली होती. पण तिला मी खरोखर पात्र नव्हतों हें मला स्पष्ट सांगितलें पाहिजे. कारण माझ्या धन्याला वाटलें होतें कीं, आपल्या देशांतील 'याहू' पेक्षां ज्याअर्थी याचा शरीराकार, गोरेपणा, आणि स्वच्छता हीं विशेष आहेत, त्याअर्थी हा एखाद्या थोर घराण्यांत जन्मलेला असावा. त्यास असें वाटण्याचें कारण, तिकडील 'याहू' च्या पेक्षां मी शक्तींत व चपलतेंत कमी होतों तथापि माझी आणि त्यांची रहाणी निराळी होती, हें असावें असें वाटतें. शिवाय मला वाचाशक्ति असून आणखी माझ्याठायीं बुद्धीचाही थोडाबहुत अंकुर पाहून, 'याहू' जातींतला हा सर्वांत उत्तम प्राणी आहे असें त्याला वाटत होतें.

तो ह्मणाला, 'पहा, आमच्या 'हुं हुं हूं' मध्यें असें आहे कीं, पांढरे, तांबूस व काळसर रंगाचे जे आहेत त्यांची व करडे, पंचरंगी व काळेभोर जे आहेत त्यांची ठेवण अगदीं सारखी आहे असें नाहीं. तसेंच, त्यांच्या गुणांत व बुद्धींतही फरक आहे; आणि ह्मणून, ते (पांढरे तांबूस व काळसर रंगाचे) आपला चाकरीचा धंदा सोडून दुसरें कांहींएक काम करावयाचे नाहींत, व त्यांपैकीं कोणाला तशी उमेद देखील कधीं असावयाची नाहीं. फार काय, पण आपला पूर्वापार चालत आलेला धंदा सोडण्याची

कल्पनाच मुळीं रीतीविरुद्ध व विलक्षण अशी ते मानतात.'

असो; माझ्या धन्यानें मजविषयीं मागें सांगितल्याप्रमाणें आपलें चांगलें मत प्रदर्शित केलें, त्याबद्दल मीं त्याचे विनयपूर्वक आभार मानले. पण त्याच वेळीं मला त्यास हेंही सांगावें लागलें कीं, 'मीं कांहीं थोर कुळांत उत्पन्न झालेला नाहीं. माझीं आईबापें साधीं व प्रामाणिक असून मला साधारण दोन अक्षरें शिकविण्यापुरतीच त्यांस ऐपत होती. तसेंच, तुम्हांला आमच्यांतील अमीरउमराव वगैरे सर्व लोक हे जसे असतील असें वाटतें, तसे कांहीं ते नाहींत हें मी खचीत सांगतों. ते आळस व ऐषआराम यांत लहानाचे मोठे झालेले असतात, व जसजसे मोठे होत असतात तसतसे नानाप्रकारच्या वाईट छंदांस लागून आपलें शरीर व संपत्ति यांची माती करून टाकितात; आणि मग पैशाच्या टंचाईकरितां एखाद्या स्त्रीवर आपलें जरी बिलकूल प्रेम नसलें तरी तिच्याशीं विवाह करितात—मग ती हलक्या कुळांतील, कुरूप, रोगी, अशी असली तरी त्यांना चालते; कां कीं, त्यांना उधळायाला तिच्याकडून पैसा मिळण्याला मार्ग होतो! मग तिजपासून पुढें जी संतति होते ती तशीच कुरूप, रोगी, दुर्गुणी व अज्ञान अशी निपजते हें सांगावयास नकोच. आणि थोर कुळाचें व संपत्तीचें लक्षणच मानतात कीं, तीं माणसें गाल बसलेलीं, फिकट, व एकंदरीनें रोगाच्या मूर्तीच अशीं असलीं पाहिजेत. चांगलें लठ्ठ, बळकट, व निरोगी शरीर श्रीमंतीला जणू काय शोभतच नाहीं!'

ह्या कुलीन मानलेल्या लोकांच्या सल्ल्याखेरीज कोणताही कायदा ठरत नाहीं, मोडला जात नाहीं, किंवा त्यांत फेरफारही केला जात नाहीं. तसेंच देशांतील सर्व लोकांची मालमत्ता वगैरेंच्या संबंधाच्या वादांचे निकालही करण्याचें काम याच लोकांच्या हातीं असतें.'



# प्रकरण ७.

गलिव्हर याची स्वदेशाविषयीं अत्यंत प्रीति.—तो 'हुं हुं हूं' च्या देशांतील उदाहरणें घेऊन इंग्लंडच्या राज्यरीतीचें स्वरूप आपल्या धन्यास सांगतो—त्यांवर व एकंदर मनुष्यस्वभावावर त्याच्या धन्याचे विचार.



'हुं हुं हूं' च्या देशांतील 'याहूं' च्या आणि माझ्या मध्यें पूर्ण साम्य असल्यामुळें, व ते 'हुं हुं हूं' 'याहूं' चा पराकाष्ठेचा तिटकारा करीत असल्यामुळें, त्यांचें मनुष्यजातीच्या संबंधानें अत्यंत प्रतिकूळ मत होण्याचा संभव असतां मीं यत्किंचित्‌ही मागें पुढें न पहातां आपल्या सर्व जातीचा चित्रका करून दाखविला, हें माझ्या हातून झालें तरी कसें, याविषयीं वाचकांस मोठें आश्चर्य वाटेल. परंतु मी स्पष्ट सांगतों कीं, त्या चतुष्पादांच्या अंगचे अनेक सद्गुण व तितकेच मनुष्यमात्राच्या अंगचे दुर्गुण माझ्या लक्षांत आल्यावर माझे डो-

ळे पुरते उघडले; आणि माझ्या हृदयांत इतका प्रकाश पडला कीं, मनुष्यमात्राच्या कृत्यांच्या व मनोविकारांच्या संबंधानें माझ्या पूर्वीच्या आणि हल्लींच्या मतांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलें; आणि त्यावरून, आपल्या जातीचा बोज राखण्याचा प्रयत्न करण्यांत कांहींच हंशील नाहीं असें मला वाटायाला लागलें. खेरीज, माझ्या धन्यासारख्या कुशाग्र बुद्धीच्या पुरुषापाशीं तसली कांहीं लटपट चालणें-ही अशक्य होतें; कारण तो एवढा विलक्षण मार्मिक कीं, त्यानें माझ्यांतील हजारों अवगुण दररोज माझ्या नजरेस आणून द्यावे. ते त्या वेळेपर्यंत खरोखर माझे मला देखील दिसत नव्हते, मग आपल्या जातीच्या साधारण चार माणसांना तर ते अवगुण असे वाटतील कीं नाहीं ह्याची देखील जबरदस्त शंका वाटते! आणि त्या वेळेपासून सत्याच्या संबंधानें मला आपल्या धन्याच्या उदाहरणावरून इतका बोध झाला कीं, असत्याचा व कपटाचा मी पराकाष्ठेचा तिरस्कार करूं लागलों; व सत्य हें मला इतकें प्रिय वाटूं लागलें कीं, त्याच्याकरितां मी वाटेल तें नुकसान जरी झालें तरी तें पतकरण्यास तयार झालों.

शिवाय हेंही मला प्रांजलपणें सांगितलें पाहिजे कीं, मीं आपल्या जातीची विचक्षणा जी एवढ्या सढळ रीतीनें केली ती करण्यास मला आणखी दुसरें एक कारण झालें. तें हें कीं, मला त्या 'हुं हुं हूं' च्या देशांत जाऊन एक वर्षही पुरतें झालें नव्हतें तेंव्हांपासूनच माझ्या ठायीं त्यांच्याविषयीं एवढें प्रेम व इतकी पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन गेली कीं, पुनः ह्मणून मनुष्यजातीचा वारा देखील आपल्याला नसावा, व जेथें आपल्याला कोणतेंही दुष्कृत्य करण्याची प्रवृत्ति होण्यास कोणत्याही प्रकारचें उदाहरण अथवा उत्तेजन मिळण्याचा मार्गच नाहीं, अशा त्या अप्रतिम सदा-

चरणी ‘ हुं हुं हूं ’ च्या सहवासांत आपलें बाकीचें आयुष्य घालवावें असा माझा पक्का निश्चय झाला होता. परंतु जन्मभर माझ्या पाठीस हात धुऊन लागलेला माझा हाडवैरी—ह्मणजे माझे दुर्दैवाचा योग—त्याच्या योगानें मी त्या अनुपम सुखास अंतरलों ! असो; तथापि मला आतां थोडेंसें समाधान मानण्यास एवढी तरी जागा आहे कीं, माझा धनी जरी मला प्रत्येक गोष्ट छडून छडून निर्भीडपणें व पूर्ण समाधान होईल अशा रीतीनें विचारण्यांत मोठा वस्ताद होता, तरी मी आपल्या देशबांधवांच्या गुणावगुणांचें वर्णन त्याजपाशीं करीत असतां त्यांच्या दोषांचें आविष्करण आपल्याकडून होईल तितकें थोडें करून, प्रत्येक गोष्ट जेणेंकरून त्यांना अनुकूल अशी दिसेल अशा प्रकारचेंच रूप तिला देण्यास झटलों; कारण, ज्याला आपल्या जन्मभूमीविषयीं पक्षपात करावासा वाटणार नाहीं असा या जगतीवर कोण दुरात्मा असेल बरें ?

मी आपल्या धन्याच्या येथें जितका वेळपर्यंत होतों, तितका वेळपर्यंत त्याशीं झालेल्या माझ्या संभाषणाचा सारांश मीं दिला आहे. पण खरोखर पहातां पाल्हाळ होईल या भीतीनें मीं त्यांतील बराच भाग गाळून टाकिला आहे. असो; जेव्हां मीं त्याच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें दिलीं, व त्याची जिज्ञासा तृप्त झालीसें दिसलें, तेव्हां त्यानें एके दिवशीं सकाळीं मला आपल्याकडे बोलावून नेलें, आणि आपल्यासमोर कांहीं अंतरावर बसावयास सांगितलें. ( हा अशा प्रकारचा मान त्यानें मला पूर्वी कधींच दिला नव्हता. ) मी बसल्यानंतर तो मला ह्मणाला, ‘ तूं जी काय मला आपली हकीकत सांगितलीस तिचा जेवढा भाग विशेषेंकरून तुझ्या व तुझ्या देशाच्या संबंधाचा आहे, त्याविषयीं मीं आजपर्यंत फार विचार केला. त्यावरून

तुह्मी अशा प्रकारचे प्राणी आहां असें दिसतें कीं, ज्यांच्या वांट्यास कोणत्या कारणानें कोण जाणे, बुद्धीचा थोडासा अंश आला आहे; पण त्याच्या साहाय्यानें तुह्मी दुसरें कांहीं करीत नाहीं, तर आपले स्वाभाविक दुर्गुण मात्र वृद्धिंगत करितां; व खेरीज, सृष्टिकर्त्यानें तुमच्या अंगीं जे मूळचे उत्पन्न केलेले नाहींत, असे आणखी नवीन दुर्गुण संपादितां ! तसेंच, तुह्मांला दिलेल्या योग्यतेस तुह्मीं सोडचिठ्ठी देऊन टाकिली असून, तुह्मांस ज्या वस्तूंची आरंभीं गरज नव्हती त्या आपल्याला हव्या अशी तुह्मी हाव धरितां, व त्या वस्तु स्वतःच्या कल्पनेनें प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत तुह्मी आपलीं सर्व आयुष्यें उगीच खर्च करून टाकितां. आतां तुझ्या स्वतःविषयीं ह्मटलें तर, साधारण 'याहू'प्रमाणें तुझ्या अंगीं शक्ति किंवा चापल्य नाहीं; तूं आपल्या मागील पायांवर मळमळीत असा चालतोस, व ज्यांपासून तुला आपलें संरक्षण करितां आलें असतें अशीं आपलीं नखें तूं कांहीं युक्तीनें निरुपयोगी करून टाकिलीं आहेस; आणि ऊन्ह व वारा यांच्या योगानें तोंडास त्रास न व्हावा ह्मणून ज्या केंसांची योजना केलेली असावी असें दिसतें, ते केंसही तूं काढून टाकिले आहेस; आणि या देशांतले तुझे बांधव जे 'याहू' (यांना तो माझे बांधव असें ह्मणत असे), त्यांच्याप्रमाणें तुला पळतां येत नाहीं, व झाडावरही चढतां येत नाहीं!"

आणखी तो ह्मणाला, 'तुमच्या बुद्धींत जो अनेक प्रकारें उणेपणा आहे, त्या योगानें तुमच्या पाठीमागें राज्यप्रकरण व कायदे यांचें रिकामें लोढणें लागलें आहे. कारण, वास्तविक पहातां जो ह्मणून बुद्धिमान् प्राणी आहे, त्याला आळ्यांत ठेवण्यास त्याची बुद्धि हीच फक्त बस आहे. ह्मणून, तूं जी आपल्या लोकांची हकीकत सांगितलीस, व

तींत जरी पुष्कळ मुद्याच्या गोष्टी गाळून, **ज्या गोष्टी नाहींत त्या आहेत व आहेत त्या नाहींत** असें दाखविण्याचा प्रयत्न केलास असें मला स्पष्ट दिसून आलें, तरी तुह्मांला 'बुद्धिमान् प्राणी' ही संज्ञा सर्वांशीं देतां येणें अशक्य आहे असें माझें मत झालें आहे.'

वर सांगितलेलें माझ्या धन्याचें मत ठाम होण्यास आणखी काय कारण झालें हेंही त्यानें मला सांगितलें. तो ह्मणाला, 'तूं आपल्या रीतीभातींच्या संबंधानें जें काय मला सांगितलेंस, त्यावरून शरीराप्रमाणेंच मानसिक स्थितींतही इकडील 'याहू' त व तुझ्यांत सादृश्य आहे असें माझें मत झालें आहे. पहा, इकडील 'याहू' हे इतर जातींच्या प्राण्यांपेक्षां आपल्या जातबांधवांचाच फार द्वेष करितात; आणि याचें कारण काय तर, त्यांच्या शरीराची विद्रूपता ही त्यांच्यापैकीं प्रत्येकास ज्याची त्याला मात्र दिसत नाहीं, इतरांची तेवढी दिसते! ह्मणून प्रथमतः मला वाटलें होतें कीं, तुमच्यांत जी कांहीं अत्यंत तिरस्करणीय विद्रूपता आहे ती दुसऱ्यास न दिसावी ह्मणून तुह्मी आपलीं शरीरें झांकीत असतां यांत कांहीं वाईट नाहीं. परंतु हा माझा समज चुकीचा होता असें मला आतां समजून आलें; व मी असें ह्मणतो कीं, तुमच्यामध्यें आपापसांत जी यादवी चालते तिचें कारण आणि आमच्या ह्या इकडच्या पशूंत जी चालते तिचें कारण हीं अगदीं एकच आहेत. पहा, आमच्या इकडच्या ह्या पन्नास 'याहूं' ना पुरण्याइतकें अन्न पांच 'याहूं' च्या पुढें टाकिलें असतां गुण्यागोविंदानें ते खात नाहींत; तर प्रत्येकास दुसऱ्याचा हेवा उत्पन्न होऊन जो तो तें सर्वच आपल्याला मिळावें ह्मणून भांडाभांडी करूं लागतो. याप्रमाणें त्यांचें मोठें रणतुंबळ माजतें, ह्मणून आह्मी करितों काय कीं, ते घराबाहेर मोकळेपणीं आपलें भ-

क्ष्य खात असतां त्यांनीं भांडाभांडी करूं नये यासाठीं एक नोकर त्यांच्यावर सक्त नजर ठेवण्याकरितां उभा करितों; आणि ते घरांत असतांना त्यांना अशी धिंगामस्ती करितां येऊं नये ह्मणून त्यांना दूर दूर बांधून टाकितों. एखादी गाय ह्मातारी होऊन अथवा अपघातानें मेली असतां कोणी ' हुं हुं हूं ' नें जर ती आपल्या ताब्यांतील ' याहूं ' स मिळण्याची अगोदर तजवीज केली नसली, तर दुसरीकडचे 'याहूं' चे कळपचे कळप येऊन तिजवर हल्ला करितात; व तूं जसें लढाईचें पूर्वी वर्णन केलेंस, तशी लढाई मग त्यांच्यांत होते; आणि तुह्मीं आपल्या ' जुक्ती ' नें जीं प्राणघातक शस्त्रास्त्रें काढिलेलीं आहेत, त्यांचा त्यांच्यांत अभाव असल्यामुळें जरी एकमेकांस ठार मारण्याइतकी त्यांची मजल पोहोंचत नाहीं, तरी ते आपल्या नखांनीं एकमेकांस फार भयंकर जखमा करितात. याचप्रमाणें, कांहीं कारण नसतांही निरनिराळ्या प्रदेशांतील ' याहूं ' च्यामध्यें लढाया होत असतात. अशा प्रसंगीं एक पक्ष गैरसावध असतां दुसरा त्यावर हल्ला करण्याची संधि साधण्याकरितां टपून बसलेला असतो; व ही संधि कदाचित् एखादे वेळेस हातून गेली तर मग अर्थात् सामना करण्याचें सोडून त्या ' याहूं ' स घराचा मार्ग सुधरावा लागतो. परंतु शत्रूशीं मारामारी करून कंडू शमन व्हावयाचा तो अशा प्रकारें शमन न झाल्यामुळें त्यांना मोठा चेव येतो, व मग ते आपआपसांतच 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' माजवितात ! '

आणखी माझा धनी ह्मणाला, ' आमच्या देशांत कित्येक ठिकाणीं चकाकणारे व निरनिराळ्या रंगाचे असें कांहीं पाषाण आहेत. त्यांचा या ' याहू ' जातीस फार शौक आहे. हे पाषाण जमिनींत कधीं कधीं अर्धेमुर्धे गढलेले असतात. असें असलें ह्मणजे ' याहू ' रात्रंदिवस मे-

हनत करून आपल्या नखांनीं ती जमीन खोदितात, व ते बाहेर काढितात; आणि घरीं घेऊन जाऊन एकीकडे ते लपवून ठेवितात. हा आपला खजिना चोरीस न जावा म्हणून ते फार काळजी घेतात. आतां या पाषाणांविषयीं या 'याहू' स एवढी हाव कां असावी, व त्यांचा त्यांस उपयोग तरी काय, याचें मला आजपर्यंत मोठें गूढ पडलें होतें. परंतु सर्व मनुष्य जातीस अशा प्रकारच्या वस्तूंची हाव असतेच असें तूं मला सांगितलेंस ती गोष्ट यांसही लागू आहे हें आतां माझ्या लक्षांत आलें. एकदां मीं मुद्दाम असें केलें कीं, आमच्या एका 'याहू' नें एके ठिकाणीं या पाषाणांचा ढीग लपवून ठेविला होता, तो मीं तेथून उचलून गुप्त रीतीनें दुसऱ्या ठिकाणीं नेऊन टाकिला. त्यावरून तो मूर्ख प्राणी मोठमोठ्यानें रडायला व ओरडायला लागला. हें ऐकून बाकीचे सर्व तेथें जमले तेव्हां तो त्यांस चावूं व मारूं लागला. पुढें त्यानें खाणेंपिणें, निजणें, काम करणें, हीं अगदीं सोडून दिलीं, व तो अगदीं झुरणीस लागला. शेवटीं आमच्या एका चाकरानें पुनः गुप्तपणें तो पाषाणाचा ढीग जेथच्या तेथें नेऊन होता तसा ठेविला. तेव्हां एकदांचा त्या 'याहू' चा जीव भांड्यांत पडला व लागलाच त्याला मोठा आनंद होऊन तो नाचूं उडूं लागला. परंतु पुढें आपला तो खजिना त्यानें तेथून काढून अशा ठिकाणीं नेऊन ठेविला कीं, तो दुसऱ्या कोणाच्या सहसा नजरेस पडूं नये. ही गोष्ट घडल्यापासून तो पशु आमच्या फार उपयोगीं पडूं लागला. असो; ज्या ठिकाणीं ते चकाकणारे पाषाण पुष्कळ सांपडतात, त्या ठिकाणीं चोहोंकडच्या 'याहू' च्या झुंडींच्या झुंडी ते नेण्याकरितां येतात, व त्यामुळें तेथेंही त्यांचीं रणतुंबळें पडतात.' ही शेवटची गोष्ट त्या देशांत मींही प्रत्यक्ष पाहिली आहे.

आणखी माझा धनी ह्मणाला, 'एखाद्या ठिकाणीं तो चकाकणारा पाषाण दोघां 'याहू' च्या एकदम नजरेस पडला, कीं त्या दोघांत त्याकरितां भांडण लागून त्या भांडणांत तिसराच मध्यें शिरतो, आणि तो त्या दोघांच्याही हातावर तुरी देऊन तो पाषाण घेऊन जातो. ही गोष्ट कांहीं अंशीं तुमच्या कडचे जे कायदे व फिर्यादी अर्यादी यांच्या सारखीच आहे.' यावरून मीं मध्येंच ह्मटलें, आपण ह्मणतां तशी गोष्ट खरी, पण आपण सांगितलेल्या या कज्जाचा निकाल आमच्याकडील कज्जांच्या निकालांपेक्षां फारच चांगला असें मी ह्मणतों; कां तर येथला वादी किंवा प्रतिवादी कज्जाचें मूळ जो तो पाषाण तेवढाच गमावून बसतो; पण आमच्याकडचा वादी व प्रतिवादी या दोघांच्याही जवळचें कांहीं असतें नसतें तेवढें हरण करीपर्यंत त्यांस न्यायाचें कोर्ट मुक्त करीत नाहीं!'

माझा धनी पुढें बोलूं लागला. 'तो ह्मणाला, शिवाय आमच्याकडच्या 'याहू' ना कोणतीही वस्तु सांपडो—वनस्पति कंद, फळें, कुजलेलें मांस, यांपैकीं वाटेल तें किंवा हीं सर्व एकत्र करून—खाण्याची अनावर इच्छा असते. यामुळें त्यांचा जितका आह्मांस तिरस्कार वाटतो, तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीमुळें वाटत नाहीं. आणि त्यांच्या स्वभावांत हा एक विशेष आहे कीं, त्यांना घरीं बसल्या चांगलें सुखानें खावयास घातलें तरी तें टाकून चोरी व मारामारी करून दूर ठिकाणाहून खाण्याकरितां आणणें त्यांना फार प्रिय वाटतें. तसेंच, त्यांना जर रगड शिकार सांपडली, तर ते इतकें खातात कीं, त्यांचें पोट देखील फुटायची वेळ येते! नंतर कांहीं एक प्रकारचा कंद त्यांस ठाऊक आहे तो ते त्यावर खातात, ह्मणजे त्या सगळ्याचा झाडा होऊन जातो. खेरीज, दुसऱ्या प्रकारचा बराच दुर्मिळ असा एक कंद

आहे, त्याचा रस पिण्याची त्यांना मोठी गोडी आहे. त्या रसाचा परिणाम, तुमच्या दारूचा परिणाम जो होतो तसाच हुबेहूब होतो. कारण तो रस प्याल्यानंतर तुमच्या प्रमाणें बऱ्याच अंशीं त्यांची स्थिति होते—ह्मणजे केव्हां केव्हां ते एकमेकाला प्रेमानें कडकडून भेटतात, व केव्हां केव्हां एकमेकांवर चवताळून जाऊन मारामारी करितात. तसेंच, त्या प्रसंगीं ते आरोळ्या मारतात, वेडावणें दाखवितात, नाहीं नाहीं तसलें बहकत सुटतात, ठेंचाळतात, पडतात, व नंतर जेथें पडतील तेथें, ह्मणजे चिखलांत किंवा त्याहीपेक्षां घाणेरड्या जागेंत देखील झोंपीं जातात.'

या देशांत 'याहू' खेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास कसल्याही प्रकारचा रोग ह्मणून होत नाहीं असें मला आढळून आलें; व त्या 'याहू' ना तरी जे रोग होतात ते आपल्याकडील घोड्यांना जितके रोग होतात त्यांपेक्षां फारच कमी असतात; आणि ते त्यांस वाईट रीतीनें वागविल्यामुळें मुळींच होत नाहींत, तर त्या ओंगळ प्राण्यांच्या अधाशीपणामुळें व गलिच्छपणामुळेंच होतात. तसेंच, त्यांच्या भाषेंत सर्व रोगांना साधारणपणें एकच नांव असून, त्या नांवाची उत्पत्ति 'पशु' या शब्दापासून झालेली आहे. व त्या नांवाचा वाचक शब्द 'न्ही याहू' ह्मणजे 'याहू'चें दुखणें असा आहे. यावर जें औषध ते योजितात, तें त्यांच्याच विष्ठामूत्राचेंच मिश्रण असून, कारण पडलें ह्मणजे बळजबरी करून तें त्यांच्या घशांत ओततात. आणि त्याचा उपयोगही चांगला होतो. खरोखर, ओ येईपर्यंत खाणारे जे हे अमंगळ प्राणी, त्यांची खोड मोडण्याला यासारखें दुसरें वस्ताद औषधच नाहीं असें मी ह्मणतों!

माझा धनी आणखी ह्मणाला, 'विद्या, कलाकौशल्य, राज्यनियमन, इत्यादिकांच्या संबंधानें तुमच्या व आमच्या देशांतील 'याहू' मध्यें कांहींच सादृश्य मला दिसत नाहीं.

आतां इतकें खरें कीं, आमच्यांतील 'याहू' च्या प्रत्येक कळपांत कोणीतरी 'इतरांचा शास्ता' अशा नात्यानें वागत असतो. तो इतरांपेक्षां कुरूप असून त्याचा स्वभाव फार खोडकर असतो. त्याच्या हाताखालीं त्याच्या मर्जींतला असा दुसरा एक 'याहू' सदोदित असतो. त्याचे आणि त्याच्या धन्याचे गुण बहुतेक समान असून त्याचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे आपल्या धन्याचे पाय चाटीत राहवयाचें. या कामगिरीबद्दल त्यास केव्हां केव्हां गाढवाच्या मांसाचा एखादा तुकडा धन्याकडून मिळतो. हा जो आपल्या धन्याचा अगदीं प्यारा 'याहू' असतो, त्याचा त्या कळपांतील प्रत्येक 'याहू' अत्यंत द्वेष करितो. आणि ह्मणून, त्यांच्याकडून आपल्यावर हल्ला येऊं नये ह्मणून तो अगदीं आपल्या धन्याच्या सन्निध राहतो. याच्या जागीं याच्याहीपेक्षां वाईट काम करणारा असा दुसरा 'याहू' आढळेपर्यंत हा आपल्या कामावर राहतो, व हा कामावरून निघतां क्षणींच याच्या जागीं येणारा जो असतो, तो आपल्या प्रदेशांतील सर्व अबालवृद्ध 'याहूं' स गोळा करून आणितो, आणि या पदच्युत झालेल्या 'याहू' वर सर्वजण आपल्या विष्ठामूत्राची वृष्टि करितात. परंतु ही गोष्ट तरी तुमच्याकडील राजदरबार, राजांच्या मर्जींतले लोक, प्रधान लोक इत्यादिकांना कितपत लागू पडेल हें मला कांहीं सांगतां येत नाहीं; तें तुझें तूंच आपलें पहा.' हा माझ्या धन्यानें मनुष्य जातीच्या ज्ञानावर जो केवळ खुनसानें केलेला आरोप, त्याचें उत्तर देण्याची मला बिलकूल इच्छा नसल्यामुळें मी आपला उगाच राहिलों.

माझा धनी पुढें बोलूं लागला, 'इतर सर्व प्राण्यांना स्वच्छतेची फार आवड असतां ओंगळपणा व घाणेरडेपणा यांकडे या 'याहू' जातीचाच एवढा विशेष कल काय

ह्मणून असावा याचें मला मोठें नवल वाटतें ! ' परंतु त्या देशांत जर डुकरें असतीं तर एकट्या मनुष्य जातीसच हा दोष लावणें रास्त नाहीं हें मीं तेव्हांच सिद्ध करून दाखविलें असतें; कारण डुकरांस ' याहू ' पेक्षां ह्मणजे स्वच्छपणाचा टेंभा जास्त मिरवितां येईल असें मुळींच नाहीं. तेव्हां माझ्या धन्याला जर त्या प्राण्याच्या खाण्यापिण्याचा ओंगळपणा, उकिरड्यावर लोळणें, चिखलांत निजणें, ह्या गोष्टी माहीत असत्या, तर माझें ह्मणणें त्यास कबूल केल्यावांचून गत्यंतरच नव्हतें !

माझा धनी आणखी पुढें बोलला, ' कित्येक ' याहू 'ना कांहीं विशेष प्रकारची संवय असलेली आमच्या नोकराच्या पहाण्यांत आली आहे. ती ही कीं,एखादे वेळीं चांगला तरणा ताठा व लठ्ठ असा 'याहू' उगीच आपला एकीकडे जाऊन पडून राहतो, व कांहीं कारण नसतां आरडायला ओरडायला लागून जें कोणी जवळ येईल त्याच्यावर लाथा झाडीत सुटतो. अशा ' याहू ' ला ताळ्यावर आणण्याला उपाय हाच कीं, त्याला चांगले दहा वीस रट्टे लगावून खूब मेहनतीचें काम करायाला लावावयाचें. तथापि एकंदरीनें त्या 'याहू' ला मध्येंच अशी विलक्षण हुकी कां यावी हें मला समजत नाहीं ! ' यावर उत्तरादाखल कांहीं बोलण्यास मला मुळींच जागा नव्हती. कारण आपल्यांपैकीं कांहीं लोकांतही असले प्रकार पुष्कळ वेळां नजरेस पडतात. ते कोणते तर, घरांत खाण्यापिण्याची व ऐषआरामाची चैन असली ह्मणजे कित्येक लोकांच्या अंगांत आळस शिरून ते असेच सुस्त व त्रासिक होतात, व त्यांना कांहीं प्रकारचे रोगही जडतात. यांनाही खरोखर त्या ' याहू ' प्रमाणेंच जलाल असा उपाय योजिल्यास हेही खासे बरे होऊन यांचा सुस्तपणा वगैरे नाहींसा होईल यांत संशय नाहीं.



## प्रकरण ८.

गलिव्हर हा ‘ याहूंच्या ’ कित्येक विशेष गोष्टी सांगतो.—तो ‘ हुं हुं-हूं ’ च्या गुणांचें वर्णन करितो.—त्यांच्यांतील तरुणांचा विद्याभ्यास व त्या देशांतील प्रतिनिधींची सभा यांविषयींची हकीकत.



या वेळीं मनुष्यस्वभावाचें ज्ञान माझ्या धन्यापेक्षां मला जास्त झालें असावें असें वाचकांस सहज दिसून येईल; आणि ह्मणून, ‘ याहू ’ जातीचे गुण जे त्यानें मला सांगितले ते आपल्या स्वतःला व आपल्या देशबांधवांना लावले असतां सर्वांशीं लागू पडतील असें मला वाटलें यांत कांहीं नवल वाटावयास नको. इतकेंच नव्हे, तर स्वतःच्या अवलोकनानें त्या ‘ याहूं ’ तील आणखीही कांहीं गोष्टी आपणास लागू पडण्यासारिख्या दिसून येतील कीं काय हें पहाण्याकरितां मीं

कित्येक वेळां आपल्या धन्याच्या परवानगीनें ' याहू 'च्या कळपांत जाऊन त्यांच्या स्वभावाचें विशेष ज्ञान करून घेतलें. मी त्यांच्यांत गेलों असतां त्यांच्या सहवासानें बिघडून जाईन अशी शंका प्रथमदर्शनीं माझ्या धन्यास आली; पण मला त्यांचा मनापासून तिटकारा आहे हें त्याच्या लक्षांत येऊन त्याची ती शंका लागलीच दूर झाली. तसेंच मी एकटा त्या अमंगळ प्राण्यांत गेलों असतां ते मला नानाप्रकारें त्रास देतील ह्मणून माझ्या धन्यानें आपला फार प्रामाणिक चाकर तांबूस रंगाचा घोडा, यास अशा प्रसंगीं मजबरोबर नेहमीं असण्याविषयीं ताकीद देऊन ठेविली होती. हें फारच चांगलें झालें, कारण मी त्या देशांत गेल्यावर प्रथमच माझी त्यांनीं कशी दशा करून टाकिली होती हें मीं मागें सांगितलेंच आहे; व पुढेंही तीन चार वेळां मीं एकटाच त्यांच्या तडाक्यांत सांपडलों असतां त्यांनीं मला अगदीं ' दे माय धरणी ठाय ' असें करून सोडिलें होतें. असो; त्या ' याहू ' ची, मी त्यांच्याच जातीचा आहें अशी कल्पना झाली होती, व ती कल्पना दृढ होण्यास मजकडूनच असें कारण झालें कीं, मजबरोबर माझा पालक ह्मणजे तांबूस रंगाचा घोडा असतां मीं कित्येक वेळां आपली बंडी काढून टाकीं, त्यामुळें माझे हात व छाती हीं त्यांच्या नजरेस पडत; तेव्हां ज्याप्रमाणें मोराचीं पिसें लावलेला कावळा डौलानें आपल्या जातबांधवांमध्यें गेला असतां ते त्याला चोहोंकडून येऊन टोंचून त्रास देतात, त्याप्रमाणें ते ' याहू ' होईल तितकें करून माझ्या अगदीं जवळ येत, व तिरस्काराच्या मुद्रेनें माझें अनुकरण करून मला वेडावणें दाखवीत.

' याहू 'ची जात फार चपळ असल्यामुळें ते हातीं सांपडतां सांपडत नाहींत. तथापि एकदां एक तीन वर्षांचें पोर मीं मोठ्या प्रयत्नानें व लाडीगोडी दाखवून कसें

तरी पकडलें; पण त्यानें लागलींच ओरडून ओरडून आकाश पाताळ एक केलें, व तें मला इतकें कडकडून चावलें कीं, मला त्यास सोडून देणें भाग पडलें. त्या वेळीं मजवर मोठा कठिण प्रसंग येणार होता; कां तर त्या पोराचें ओरडणें ऐकल्याबरोबर 'याहूं' चा एक जंगी कळप तेथें धांवून आला; परंतु तें पोर सुरक्षित आहे असें पाहून ( कांकीं तें माझ्या हातून सुटल्याबरोबर तुरतुर धांवत दूर निघून गेलें होतें ), व माझा पालक तांबूस रंगाचा घोडा हा माझ्याजवळ आहे हें पाहून त्यांनीं माझ्यावर हल्ला केला नाहीं.

मला तेथें जो अनुभव आला त्यावरून 'याहूं' च्या अंगीं कोणतीही विद्या शिकण्याची योग्यता नाहीं अशी माझी खात्री झाली. फार झालें तर, ते ओझीं ओढून किंवा वाहून नेण्याच्या उपयोगीं पडतील इतकेंच. तथापि त्यांच्या सुस्त व तुसड्या स्वभावामुळेंच केवळ वरील दोष त्यांच्या अंगीं खिळून गेला आहे असें मला वाटतें. कारण त्यांना समजूत मुळींच नाहीं असें ह्मणावें, तर लुच्चेगिरी, द्वेषभाव, विश्वासघात व खुनशीपणा हीं त्याच्यांत पूर्णपणें वसलेलीं आहेत. तसेंच ते भले धिप्पाड व बळकट आहेत, पण त्यांचें वर्तन अगदीं भागूबाईसारखें असून ते उर्मट व निर्दय असे आहेत. त्यांच्यापैकीं ज्यांना तांबडे केस आहेत, ते इतरांपेक्षां इष्कबाज, खोडकर, परंतु बळकट व चपळ फार आहेत.

'हुं हुं हूं' ह्यांस काम करण्यास जेवढे 'याहू' लागतात, तेवढ्यांस ते आपल्या घरांजवळ झोंपड्यांत ठेवितात, व बाकीच्यांस रानांत लावून देतात. हे त्या ठिकाणीं कंदमुळें, कित्येक प्रकारच्या वनस्पति, व मुर्दाड मांस हीं खातात; व केव्हां केव्हां उंदीर वगैरे प्राणीही मारून खातात. ते उंचवट्याच्या जमिनींत बिळें करून त्यांत रहातात. तीं न-

रांचीं ह्मटलीं ह्मणजे एकेकास रहाण्या पुरतींच असतात, व माद्यांचीं मात्र त्यांस आपल्या दोन तीन पोरांस घेऊन रहाण्याइतकीं मोठीं असतात. त्यांना बेडकांप्रमाणें जन्मतःच पोहतां येत असतें, व ते पाण्याखालीं पुष्कळ वेळ राहूं शकतात. त्या ठिकाणीं ते मासे धरतात, व ते मासे, माद्या आपल्या पोरांकरितां आपल्या बिळांत घेऊन जातात.

याप्रमाणें त्या देशांतील अत्यंत नीच प्राणी जे ‘याहू’ त्यांची थोडक्यांत हकीकत मीं दिली आहे. आतां इतर प्रवाशांच्या रीतीस अनुसरून, तेथील मुख्य रहिवासी जे ‘हुं हुं हूं’ त्यांच्या देशांत सुमारें तीन वर्षें मी राहिलों त्या अवधींत मला त्यांच्या रीतीभाती वगैरे ज्या समजल्या, व ज्या समजून घेण्यासाठीं मीं झटून यत्न केला, त्यांचें थोडेंसें निरूपण करणें मला अवश्य दिसतें.

त्या देशांतील रहिवासी जे महात्मे ‘हुं हुं हूं’ त्यांच्या अंगीं सृष्टिकर्त्यानें सद्गुणाचें बीज सर्वत्र पेरिलें असल्यामुळें, बुद्धिमान् प्राण्याच्या ठायीं दुर्गुण कसा वास करितो, याची त्यांस मुळींच कल्पना नाहीं. यास्तव जन्मतःच त्यांस उत्पन्न झालेली जी सद्बुद्धि तिचें पोषण करणें व तिच्या आळ्यांत रहाणें हाच आपल्या जन्माचा मुख्य हेतु आहे असें ते समजतात. तसेंच आपल्यामध्यें ज्याप्रमाणें बुद्धीचा उपयोग कोणत्याही गोष्टीच्या दोन बाजूंचा उहापोह करण्याकडे करितात तसें त्यांचें नसून, कोणत्याही गोष्टीविषयीं मनाची तावडतोब खातरी होणें हेंच बुद्धीचें चिन्ह असें ते समजतात. आणि खरोखर, जेथें मनोविकार व हिताहित ह्यांच्या संबंधानें बुद्धीस विपरीतपणा येत नाहीं, तेथें अशा प्रकारें मनाची खात्री होणें हें साहजिकच आहे. व ह्मणूनच कोणत्याही गोष्टीविषयीं मतभेद ह्मणून जो ह्मणतात, तो काय असतो हें मला आपल्या धन्यास समजावून देण्यास

इतके महत् प्रयास पडले कीं, त्याचा मला कधींही विसर पडणार नाहीं! कारण तो ह्मणे कीं, 'एखादी **गोष्ट होय कीं नाहीं** ह्मणणें ती आपल्या बुद्धीनें जशी आपल्याला वाटत असेल त्याप्रमाणें ह्मणावी; व जीविषयीं आपली कोणत्याच प्रकारें समजूत होणार नाहीं तिच्यासंबंधानें आपल्याला कांहींच ह्मणतां येणार नाहीं.--झालें!' यास्तव कोणत्याही गोष्टीविषयीं **वादविवाद, हुंबरीतुंबरी, तंटेबखेडे, द्व्यर्थी भाषण,** इत्यादि दुष्ट प्रकार त्या देशांत मुळींच माहीत नाहींत. त्याचप्रमाणें, मीं आपल्या धन्यास पदार्थविज्ञानशास्त्राच्या अनेक शाखांचें विवरण करून सांगितलें तेव्हां त्याला हंसूं आलें, व तो ह्मणाला, 'जो प्राणी बुद्धीचा एवढा डौल मिरवितो, त्यानें इतरांच्या कल्पनांनीं प्राप्त झालेल्या ज्ञानाचें एवढें महत्व मानावें हें मोठें आश्चर्य आहे! इतकेंहीकरून, या ज्ञानाचा वास्तविक उपयोगही पाहूं गेलें असतां काडीइतका देखील नाहीं!' या संबंधानें **साक्रेतीस** या नामांकित तत्ववेत्त्याचे विचार जे **प्लेटोनें** वर्णन केले आहेत, ते माझ्या धन्यास पूर्णपणें संमत झाले, व त्या महान् तत्ववेत्त्याचा अशा रीतीनें जो सन्मान त्याजकडून झाला त्याजबद्दल मला मोठा अभिमान वाटल्यावरूनच मुद्दाम मीं ही गोष्ट येथें सांगितली आहे. असो; तर एकंदरीनें माझ्या धन्याचें जें हें वर सांगितलेलें मत, त्याजविषयीं त्या वेळेपासून माझ्या मनांत जेव्हां जेव्हां विचार आले, तेव्हां तेव्हां मला असें वाटलें कीं, याच मताचा प्रसार जर युरोपखंडांत झाला, तर तेथल्या मोठमोठ्या पुस्तकालयांतील कितीक ग्रंथांचा नाश होऊन जाईल! व तसें झालें ह्मणजे जगांतील सुधारलेल्या देशांतल्या कितीक लोकांचे कीर्तीचे मार्ग अजीबात बंद होतील!!

**मैत्री** आणि **परोपकार बुद्धि** हे 'हुं हुं हूं' चे दोन

मुख्य सद्गुण होत. हे विशेष व्यक्तिमात्रास किंवा वर्गास लागू नसून त्या सर्व जातीचेंच तें ब्रीद आहे. तेथें अतिशय दूर ठिकाणच्या मुशाफराचें आदरातिथ्य अगदीं नजीकच्या शेजाऱ्याप्रमाणेंच होतें, व तो मुशाफर जेथें जेथें जातो तेथें तेथें त्यास अपरिचित असें कांहींच वाटत नाहीं. तसेंच **मर्यादा** व **सभ्यपणा** हीं पाळण्याविषयीं 'हुं हुं हूं' हे फार जपतात; तथापि रिकामा बाह्यात्कारी डामडौल त्यांस बिलकूल ठाऊक नाहीं. त्यांची आपल्या संततीवर विशेष ममता नसून, जी असते तींत स्वतांच्यांत व परक्याच्यांत कांहींच भेद ते ठेवीत नाहींत. आणि संततीस शिक्षण देण्याविषयीं जी काळजी ते घेतात, ती केवळ त्यांच्या अंतःकरणाचा धर्म असून ममतेचा त्यांत कांहीं संबंध नाहीं. सर्वांवर सारखी ममता करणें हें सृष्टिकर्त्यानेंच त्यांना लावून दिलें आहे, व कोणास कमीअधिक मानणें तें त्याच्या ठायीं असणाऱ्या सद्गुणाच्या प्रमाणावरूनच काय तें ते मानितात.

'हुं हुं हूं' च्या जोड्यांस एक नर व एक मादी अशीं अपत्यें झालीं ह्मणजे ते संसारसुखाचा त्याग करितात. आतां कांहीं आकस्मिक कारणानें जर त्यांपैकीं कोणाचें एखादें पोर गमावलें, तर मात्र पुनः तें जोडपें संसारांत शिरतें. पण असें फारकरून घडतच नाहीं. देशांत प्रजा फार वाढून त्याजवर फाजील भार न व्हावा ह्मणून ही सावधगिरी ठेवण्यांत येते, व ती अगदीं अवश्य आहे. परंतु हलक्या प्रतीचे जे 'हुं हुं हूं' असतात, ह्मणजे जे चाकरी करणारे असतात, त्यांच्या वाढीस इतकी कडक मर्यादा ठेविलेली नाहीं; तर थोरा मोठ्यांचे येथें चाकरांचा उणेपणा न पडावा ह्मणून प्रत्येक जोड्यांस तीन तीन नर व तीन तीन माद्या होत तोंपर्यंत संसार सुख भोगण्यास त्यांना मोकळीक असते.



त्यांच्यांत विवाहाचे वेळीं, पुढें संतति जी होणार ती हिडिस होऊं नये अशा बेतानें जोडप्यांचे रंग पसंत करितात. त्यांतही नराच्या अंगीं शक्ति व मादीच्या अंगीं कोमलता हीं असावीं ह्याकडे त्यांचें विशेष लक्ष असतें. यांत कांहीं त्यांच्या प्रीतिसुखाचा संबंध नसतो, तर पुढें विजोड संबंधानें प्रजेची खराबी होऊं नये इतक्याकडेच त्यांचें लक्ष असतें; व याकरितां, एखादे वेळीं मादी जर फार बळकट असेल तर तिच्या जोडीस सुकुमार असा नर पहातात.

लग्नाच्या पूर्वी प्रीति संपादणें, तसेंच हुंडा, स्त्रीधन, इत्यादि गोष्टींची त्यांस ओळखही नाहीं. व त्या त्यांच्या मनांत भरवून देतां येतील असे त्यांच्या भाषेंत शब्दही नाहींत. तरुण जोडप्यांचा संयोग होतो तो एवढ्याचकरितां कीं, त्यांचे आईबाप व इष्टमित्र यांचा तो घडवून आणण्याविषयीं निश्चय झालेला असतो; व बुद्धिमान् प्राण्याच्या नेहमींच्या कृत्यांपैकीं अवश्य असें हें एक कृत्य होय, याहून त्यांत विशेष कांहीं नाहीं, असें ते मानितात. असें आहे तथापि, काडी तोडून देणें अथवा दुसरा कांहीं अमंगळ प्रकार त्यांच्यांत कधींच घडत नाहीं. तसेंच विवाहित दंपत्यें एकमेकांशीं जितक्या प्रेमानें व परोपकारबुद्धीनें वागतात, तितक्याच प्रेमानें व परोपकारबुद्धीनें इतरांशींही तीं वागतात—ह्मणजे कोणाशींही त्यांचा मत्सर, असंतोष, व तंटाबखेडा ह्मणून कधींही नसतो.

मुलांस ( नरांस व माद्यांस ) शिक्षण देण्याची जी त्यांची पद्धत आहे ती फारच वर्णनीय असून आपणांस अनुकरण करण्यास अत्यंत योग्य आहे. त्यांच्यांत मुलांना अठरा वर्षांच्या वयापर्यंत कांहीं नियमित दिवस खेरीजकरून 'ओट्' धान्य खाऊं देत नाहींत, व दूध तर क्वचितच पिऊं देतात. उन्हाळ्यांत तीं सकाळीं व संध्याकाळीं

दोन दोन तास कुरणांत चरतात, व त्यांचे आईबापही तोच नियम पाळितात. परंतु चाकरांना याच्या अर्ध्यापेक्षां जास्त वेळ या कामास मिळत नाहीं, यास्तव त्यांना लागणारें बहुतेक गवत घरींच आणितात, आणि तें कामाच्या वेळाखेरीज जो वेळ सांपडेल त्यावेळीं ते स्वस्थपणें खातात.

आहारविहाराचा नियमितपणा, उद्योग, व्यायाम, शुचिर्भूतता, हीं पाळण्याविषयीं मुलांस सक्त ताकीद असते. या संबंधानें मीं आपल्या धन्यास एकदां सांगितलें होतें कीं, आमच्यांत पुरुषांचें व स्त्रियांचें शिक्षण कांहीं थोड्या गोष्टी खेरीज करून निरनिराळ्या प्रकारचें असतें, तें लक्षांत ठेवून त्यानें ह्या वेळीं मला बोलून दाखविलें कीं, असा प्रकार असणें फारच वाईट आहे. कारण तो ह्मणाला, 'या योगानें वाईट परिणाम असा होतो कीं, तुमच्यांपैकीं अर्ध्या लोकांचा उपयोग केवळ प्रजोत्पादनाखेरीज दुसरा कांहीं होत नाहीं, आणि अशा गैदी व निरुपयोगी प्राण्यांच्या हातीं संततीची जोपासना देणें या सारखी निर्दयता कोणतीही नाहीं.'

असो; 'हुं हुं हूं' हे आपल्या मुलांच्या अंगीं शक्ति, चपलता, कणखरपणा, हीं येण्यासाठीं त्यांच्याकडून डोंगरावर चढण्याच्या व उत्तरण्याच्या शर्यती करवितात, तसेंच त्यांना खडकाळ जमिनीवरही पळावयास लावितात, आणि त्यांना घाम आला ह्मणजे तळ्यांत अथवा नदींत बुड्या मारावयास सांगतात. प्रत्येक प्रांतांतील मुलें, धांवणें, उड्या मारणें, व दुसरीं शक्तीचीं व चपलतेचीं कामें करणें यांत आपली पारंगतता दाखविण्याकरितां वर्षांतून चार वेळां एकत्र जमतात, व त्यावेळीं ज्याची सर्वांत सरशी होते, त्याच्या सन्मानार्थ कांहीं गाणें गातात, अथवा कांहीं संभाषण करितात. या उत्सवाच्या प्रसंगीं 'हुं हुं हूं' चे नोकर हे ज-

मलेल्या मंडळीस मेजवानी देण्याकरितां 'याहू' च्या पाठीवर गवत, 'ओट्' धान्य व दूध हीं लादून घेऊन येतात, व उत्सवांत त्या 'याहूं' नीं लाथाळें माजवूं नये ह्मणून त्यांच्या पाठीवरील जिन्नस उतरून घेऊन त्यांना तेथून लागलेच परत हाकून लावितात.

प्रत्येक चवथ्या वर्षी मेषसंपातीं सूर्य येण्याच्या वेळेस, त्या सर्व राष्ट्राच्या प्रतिनिधींची सभा माझ्या धन्याच्या घरापासून सुमारें दहा कोशांवर एके ठिकाणीं भरत असते. या सभेचें काम पांच सहा दिवस चालतें. त्यावेळीं निरनिराळ्या प्रांतांची एकंदर स्थिति कशी काय आहे याची चवकशी होते—ह्मणजे कोणत्या ठिकाणीं गवत, 'ओट्' धान्य, गाई व 'याहू' हे असावे त्यापेक्षां कमी किंवा जास्त आहेत याविषयीं माहिती आणलेली असते, तिचा विचार होतो. मग चवकशीअंतीं कोठें कांहीं उणीव असेल तर (ही उणीव क्वचितच असते.) ती लागलींच सर्वांच्या संमतीनें व मदतीनें नाहींशी करण्यांत येते. तसेंच यावेळीं मुलांचीही व्यवस्था करण्यांत येते. ती अशी कीं, एखाद्या 'हुं हुं हूं' ला जर दोन नर असले, तर दुसऱ्या कोणास दोन माद्या असतील त्यांपैकीं एक मादी घेऊन तो आपला नर तिच्याबद्दल त्यास देतो. तसेंच, कांहीं आकस्मिक कारणानें पोर गमावलें व त्याच्या आईची संतति होण्याची वेळही निघून गेली असली, तर त्या कुटुंबास आपलें मूल देऊन ती उणीव कोणीं भरून काढावी ह्याचाही ठराव करण्यांत येतो.



## प्रकरण १.

गलिव्हर त्या देशांत असतां 'हुं हुं हूं' च्या सर्व प्रतिनिधींच्या सभेच्या वेळीं एकदां जो मोठा वादविवाद झाला होता त्याची हकीकत.—त्याचा निकाल कसा झाला तो.—'हुं हुं हूं' ची विद्या. त्यांचीं घरें.—त्यांची मूठ माती देण्याची रीति.—त्यांच्या भाषेंतील उणेपणा.

मी त्या देशांत असतां एकेवेळीं 'हुं हुं हूं' च्या सर्व प्रतिनिधींची सभा भरली होती. या सभेचें काम आटपल्यावर सुमारें तीन महिन्यांनीं मीं तो देश सोडला. या सभेस माझा धनी आमच्या प्रांताचा प्रतिनिधि ह्मणून गेलेला होता. त्या वेळीं मोठा वादविवाद झाला, व अशा प्रकारचा तेवढाच काय तो वादविवाद त्यावेळेपर्यंत त्या देशांत झालेला तेथल्या रहिवाशांस माहीत होता. त्याची तपशीलवार हकीकत, माझा धनी घरीं परत आल्यावर त्यानें मला सांगितली.

वादविवादाचा विषय हा होता कीं, 'याहू' हे पृथ्वीच्या पाठीवरून अजीबात नाहींतसे करितां येतील कीं नाहीं. 'होय' पक्षाकडे असणाऱ्या एका सभासदानें आपल्या मताच्या समर्थनार्थ मोठें जोराचें व मुद्देसूद भाषण केलें. तो ह्मणाला, 'सृष्टिकर्त्यानें पृथ्वीवर जेवढे ह्मणून प्राणी उत्पन्न केले आहेत, त्या सर्वांत 'याहू' हे अतिशय घाणेरडे, कटकटी, व कुरूप असून तसेच ते अतिशय सुस्त, रानवट, खोडकर व मत्सरी आहेत। यांना जर मोकळें सोडून दिलें, तर हे आपल्या गाईंचे आंचूळ चोरून पितील, आपलीं मांजरें मारून खाऊन टाकितील, आपल्या कुरणांतलें 'ओट्' धान्य व गवत हें तुडवून नासून टाकितील, व असे आणखी हजारों अनर्थ करितील. हे अनर्थ टाळण्याकरितां आपणांस त्यांजवर सतत सक्त पहारा ठेवण्याचा किती बरें त्रास सोसावा लागतो!' तो आणखी ह्मणाला, 'आपल्या पूर्वापार चालत आलेल्या दंतकथेवरूनही असें दिसतें कीं, 'याहू' हे आपल्या देशांत आरंभीं मुळींच नव्हते; तर बहुत काळापूर्वीं यांपैकीं दोन हैवान एका पर्वतावर दृष्टीस पडले. हे त्याठिकाणीं खराब झालेल्या चिखलापासून सूर्याच्या उष्णतेनें उत्पन्न झाले, किंवा समुद्राचा गाळ व फेंस यापासून उत्पन्न झाले, हें कांहींच समजलेलें नाहीं. पुढें यांना संतति झाली, व ती लवकरच इतकी वाढली कीं, साऱ्या देशभर यांचा सुळसुळाट होऊन गेला. तेव्हां याला उपाय काय करावा याचा विचार सर्व 'हुं हुं हूं' नीं करून, यांच्या त्रासापासून मुक्त होण्याकरितां यांची सर्व झुंडच्या झुंड हांकून आणून एके ठिकाणीं कोंडली. मग जे मोठे होते त्यांचा संहार करून प्रत्येक 'हुं हुं हूं' नें लहानांपैकीं दोन दोन आपल्या संग्रहीं ठेविले, व पशूंस जितकें उपयोगास आणतां येण्याचा संभव आहे तितकें

त्यांनीं त्यांस मारून मुटकून उपयोगीं पडण्यासारखें बनविलें; आणि त्यांजकडून ओंझीं ओढण्याचें व वाहण्याचें काम ते करून घेऊं लागले. अशी यांची ही दंतकथा असून तींत पुष्कळ तथ्यांश आहे यांत संशय नाहीं. तात्पर्य काय कीं, हे ह्या देशाचे मूळचे राहणारे खास नव्हत; कारण तसें असतें तर, जरी त्यांचा स्वभाव फार खराब आहे तरी ' हुं हुं हूं ' ना व इतर प्राण्यांना त्यांचा एवढा पराकाष्ठेचा तिटकारा नसता. शिवाय हे प्रथमपासून येथें राहणारे असते तर, इतरांचा त्यांच्याशीं अत्यंत द्वेष असल्यामुळें त्यांचा यापूर्वीं कधींच येथून नीमोड झाला असता. असो;तर नुकतेंच सांगितल्याप्रमाणें येथील रहिवाशांनीं 'याहू' चा उपयोग करून घेण्याच्या व्यर्थ भरीस पडून गाढवांची वाढ करण्याचे कामीं मात्र हयगय केली, हें फार अविचाराचें काम केलें. कारण गाढवें किती झालीं तरी ' याहू ' पेक्षां खचितच सुबक, गरीब व व्यवस्थित अशीं असून, ' याहू' च्या सारखी त्यांच्या अंगाला दुर्गंधीही येत नाहीं; तसेंच, तीं चपळतेंत कमी आहेत, तथापि काम करण्यास बहादर आहेत. आणि त्यांचें ओरडणें कानाला जरी वाईट लागतें, तरी ' याहू ' च्या राक्षसी ओरडण्यापेक्षां तें पुष्कळच बरें असें ह्मटलें पाहिजे ! '

इतर कित्येक सभासदांनीं याच आशयाचें भाषण केल्यावर माझा धनी उठला, व त्यानें या गोष्टीची तोड योजिलेली होती ती सभेस निवेदन केली. ही तोड माझ्याच सूचनेवरून त्याच्या लक्षांत आली होती. तो ह्मणाला, 'प्रथम ज्या सद्गृहस्थांनीं भाषण केलें, त्यांनीं दोन ' याहू ' डोंगरावर आढळल्याची जी दंतकथा सांगितली ती मला संमत आहे. परंतु त्यांच्या उत्पत्तीविषयीं मात्र वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, ते समुद्राच्या पलीकडून इकडे हां-



कून दिल्यामुळें या देशांत आले, व त्यांना दुसरे कोणी सोबती वगैरे नसल्यामुळें ते डोंगरावर गेले, व मग कालें-करून ते इतक्या नीच स्थितीस येऊन पोहोंचले कीं, मूळ ज्या ठिकाणाहून ते आले तेथल्या 'याहू' च्या आणि यांच्या स्थितींत जमीनअस्मानाचें अंतर पडलें. मी ह्मणतों यास प्रत्यक्ष प्रमाण हें कीं, माझ्या संग्रहास हल्लीं एक वि-लक्षण 'याहू' (ह्मणजे मी) असून त्याची हकीकत बहुतेकांनीं ऐकिली असेल व पुष्कळांनीं त्यास प्रत्यक्ष पाहि-लेंही असेल.' नंतर मी माझ्या धन्यास प्रथम कोठें व क-सा भेटलों ती सर्व हकीकत त्यानें मंडळीस सांगितली, व ह्म-णाला, 'त्याचें शरीर इतर प्राण्यांचें कातडें व केंस यां-च्या कृत्रिम आच्छादनानें झांकलेलें आहे, व त्याची स्वतःची भाषा असून आपलीही तो चांगली शिकला आहे, आणि त्याला येथें येण्याला कोणतीं कारणें झालीं तीं त्यानें मला सर्व सां-गितलीं आहेत. त्याच्या शरीरावर आच्छादन नसतां जे-व्हां मीं त्यास पाहिलें, तेव्हां तो मला सर्वांशीं इतर 'याहूं' प्रमाणें दिसला; मात्र त्याचा रंग अंमळ गोरा असून अंगा-वर केंस कमी आहेत, आणि नखें आंखूड आहेत. त्यानें मला आपली हकीकत सांगतांना असें ह्मटलें कीं, माझ्या व दुसऱ्या कित्येक देशांत, 'याहू' हेच सर्वसत्ताधारी असून 'हुं हुं हूं' हे त्यांचे चाकर आहेत. असो; ह्या 'याहू' च्या अंगीं इतर "याहूं' चे सर्व गुण आहेत; मात्र याला बुद्धी-चा किंचित् अंकुर असल्यामुळें त्यांच्यापेक्षां हा अंमळ सु-धारलेला दिसतो. तथापि इतर 'याहूं' च्या मानानेंच का-य तें त्या बुद्धीस महत्व द्यावयाचें, बाकी आपणां 'हुं हुं हूं' च्या मानानें पाहिलें असतां तिच्यांत कांहींच अर्थ नाहीं असें ह्मटलें पाहिजे! त्यानें आपल्या देशाची हकीकत सांगतांना असेंही ह्मणून दाखविलें कीं, त्या देशामध्यें 'हुं हुं

हूं' कडून हवें तसें काम घेतां यावें ह्मणून त्यांस गरीब करण्याकरितां त्यांचे अंड खच्ची करितात, व तें कृत्य फार सोपें असून त्यापासून त्यांस इजा वगैरे कांहीं होत नाहीं. तसेंच त्या देशांत पशूंपासून कित्येक गोष्टींचें शहाणपण शिकण्यांत कोणास शरम वाटत नाहीं; जसें—मुंग्यांपासून उद्योग कसा करावा हें शिकणें, व पाकोळीपासून घर कसें बांधावें हें शिकणें, वगैरे. मला वाटतें कीं, हा अंड खच्ची करण्याचा वरील प्रकार आपल्या येथील लहान लहान 'याहू' त सुरू केला असतां ते गरीब होऊन काम करण्यास जास्ती उपयोगी होतील; आणि याप्रमाणें केलें असतां त्यांना मारण्याचें कारण न पडतां कांहीं काळानें त्यांची सर्व जात आपोआप अजीबात नाहींशी होईल. मात्र हा प्रकार इकडे चालला असतां आपण गाढवांची जात जितकी वाढवितां येईल तितकी वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे; कारण 'याहू' पेक्षां ते सर्व प्रकारें चांगले पशु आहेत. शिवाय गाढवें पांच वर्षांचीं झालीं ह्मणजे कामाच्या खाशीं उपयोगीं पडतात; आणि हे 'याहू' तर बारा वर्षांचे होत तोंपर्यंत मुळींच कांहीं कामाच्या उपयोगाचे नसतात!'

इतकीच काय ती त्या सभेंत झालेली हकीकत माझ्या धन्यानें मला सांगितली. यांत प्रत्यक्ष माझ्या संबंधाची जी एक गोष्ट होती ती त्यानें मला सांगितली नाहीं. ती गोष्ट मला फार दुःख होण्यास कारण झाली, व तेव्हांपासूनच मला जीं काय पुढें संकटें वगैरे भोगावीं लागलीं त्यांचा आरंभ झाला. ती गोष्ट कोणती हें पुढें वाचकांस समजेल.

'हुं हुं हूं' ना लेखनविद्येची मुळींच माहिती नसल्यामुळें त्यांचें ज्ञान दंतकथांवरूनच काय तें एका पिढीपासून दुसऱ्या पिढीस मिळतें. तथापि ते लोक एका जुटीचे, स्वभावतःच सद्गुणाचे केवळ पुतळे, आणि सद्बुद्धि जो मार्ग दाखवील त्या मार्गा-

नें जाणारे असे असून, इतर राष्ट्रांशीं कोणत्याही प्रकारचा त्यांचा व्यवहार नसल्यामुळें, त्यांच्यांत महत्वाच्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे इतक्या थोड्या घडतात कीं, त्यांना स्वदेशाचा इतिहास ध्यानांत ठेवण्याकरितां आपल्या स्मरणशक्तीस फारसा त्रास देण्याचें कारण पडत नाहीं. त्यांच्यांत रोगाचें बीजच नसल्यामुळें वैद्याची त्यांना मुळीं गरजच पडत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. तथापि कांहीं आकस्मिक कारणानें अंग खरचटलें असतां, अथवा कपरी लागून पाय कापला असतां, अथवा दुसरी कांहीं इजा झाली असतां त्यावर त्यांजपाशीं वनस्पतींचीं फार उत्कृष्ट औषधें आहेत.

पृथ्वीची सूर्याभोंवतीं जी वार्षिक फेरी तीवरून ते आपल्या वर्षाचा हिशेब ठेवितात; बाकी महिने, आठवडे, वगैरे ते कांहींच धरीत नाहींत. तसेंच सूर्य व चंद्र यांच्या संबंधाची त्यांना चांगली माहिती असून ग्रहणें लागण्याचीं कारणेंही त्यांस चांगलीं समजतात. हीच त्यांच्या खगोलविद्येच्या ज्ञानाची मर्यादा होय.

काव्यकलेंत हें राष्ट्र पृथ्वीवरच्या इतर कोणत्याही राष्ट्राच्या वरचढ येईल यांत संशय नाहीं. त्यांच्या काव्यांतील उपमांची यथार्थता, वर्णनांची यथातथ्यता व सूक्ष्मता, हीं खरोखर अनुकरण करण्यासारखीं आहेत. त्यांच्या काव्याचे विषय मैत्री, परोपकारबुद्धि, व शारीरिक व्यायाम ह्मणजे शर्यती वगैरेंत जय पावलेल्या लोकांची स्तुति, हेच बहुतकरून आहेत. त्यांचीं घरें ओबडधोबड व साधीं अशीं जरी आहेत, तरी यांत सोयी फार असून शीत व उष्णता यांच्या निवारणाची व्यवस्था त्यांत उत्तम प्रकारची आहे. त्या देशांत एक प्रकारचें झाड आहे; तें अगदीं सरळ असतें व चाळीस वर्षांचें झालें म्हणजे मुळाशीं ढिलें होतें, आणि नंतर जें

प्रथम वादळ येतें त्यासरसें तें उपटून पडतें. ह्या झाडास धार असलेल्या दगडानें ( कारण ' हुं हुं हूं ' ना लोखंडाचा उपयोग माहीत नाहीं ) शेवटीं मेखेसारखें टोंक करितात, व तिकडून तीं जमिनींत दहा दहा इंचांच्या अंतरानें पुरतात. नंतर ' ओट् ' धान्याच्या भुसकुटाच्या दोऱ्यांनीं तीं मधून ताटयांसारखीं विणून काढितात; व अशाच प्रकारें छपरें व दारें हीं ते तयार करितात.

' हुं हूं हूं ' हे आपल्या पुढील पायांचे खूर व नेवर यांच्या मधील पोकळ भागाचा, आपल्या हातांप्रमाणेंच उपयोग करितात. हा उपयोग त्यांना जितक्या स्वल्प रीतीनें करितां येतो असें मला पूर्वीं वाटलें होतें, त्याहीपेक्षां फार स्वल्प रीतीनें व चातुर्यानें ते करितात. माझ्या धन्याच्या घरांतील एका पांढऱ्या घोडीस मीं एक सुई मुद्दाम देऊन ती ओंवावयास सांगितली असतां तिनें ती वरील साधनानें चटदिशीं ओंवली. सारांश, हातानें करण्यासारखीं जीं कामें, ह्मणजे गाईचें दूध काढणें, ' ओट् ' धान्याचीं शेतें कापणें वगैरे, हीं वरील साधनानें ते फार उत्तम प्रकारें करितात. त्या देशांत एके प्रकारचा गारगोटीसारखा दगड आहे. हे दगड एकमेकांवर घांसून त्यांच्या कुऱ्हाडी, हातोडे वगैरे ते बनवितात. अशा प्रकारें तयार केलेल्या हत्यारांनींच ते गवत व ' ओट् ' धान्याचीं शेतें कापतात. या शेतांची लावणी, पेरणी, कांहींएक करावयाची नसते, तर तीं आपोआपच तयार होतात. असो; हीं शेतें कापून भारे बांधले ह्मणजे ते भारे ' याहू ' कडून घरीं नेववितात, व मग चाकरांकडून नेमिलेल्या ठिकाणीं धान्य मळवून कोठारांत सांठवून ठेवितात. ते मातीचीं व लांकडांचीं ओबडधोबड अशीं भांडीं करितात, व त्यांपैकीं मातीचीं भांडीं उन्हांत वाळवितात.

'हुं हुं हूं' हे बहुधा सर्व ह्मातारपणापर्यंत जगतात. आतां मध्येंच कांहीं आकस्मिक कारण घडून त्यामुळें मृत्यु आला तर ती गोष्ट निराळी. त्यांच्यांतील कोणी मरण पावलें असतां त्यास अगदीं एकीकडच्या जागेंत नेऊन पुरतात, व त्याच्या मरणामुळें त्याच्या आप्तांस व इष्टमित्रांस दुःख वगैरे मुळींच होत नाहीं. त्याचप्रमाणें मरणाऱ्या प्राण्यालाही इहलोक सोडून जातांना यत्किंचित् देखील वाईट वाटत नाहीं— इतकें कीं, जणू काय इहलोकच्या वस्तीस तो कोणाला भेटायाला आलेला होता, व आतां फिरून आपल्या घरीं चालला आहे, अशी त्यांची स्थिति असते. मला आठवतें कीं, एकदां माझ्या धन्यानें आपल्या एका स्नेह्यास त्याच्या परिवारासह भोजनास बोलाविलें असतां त्याची बायको व मुलें यांना येण्यास फार उशीर झाला. याचीं त्या बायकोनें दोन कारणें सांगितलीं. एक कारण तिनें असें सांगितलें कीं, माझ्या पतीस आजच सकाळीं आपल्या **पाहिल्या आईच्या घरीं जावेंसें वाटलें.** ( मरण आलें असें ह्मणण्याचा हा एक त्यांच्यांत प्रकार आहे. ) दुसरें कारण तिनें असें सांगितलें कीं, पति मरण पावला त्या वेळेस बराच दिवस वर आला असून, त्याला कोठें पुरावयाचें याचा विचार करण्यांत माझा बराच वेळ गेला. आणि फार काय सांगावें, तिचें आमच्या येथें जेवणखाण चाललें असतां इतरांप्रमाणेंच तिची उल्हासवृत्ति असून ती खुशाल आनंदांत हांसत खेळत होती. ती पुढें सुमारें तीन महिन्यांनीं वारली.

'हुं हुं हूं' हे साधारणतः सत्तर किंवा पाऊणशें वर्षेंपर्यंत वांचतात; व क्वचित् ऐंशीं वर्षेंही वांचतात. मरणापूर्वी कांहीं आठवडे त्यांना, आपले शरीरधर्म आतां बंद पडत चालले, असें दिसून येतें. तथापि त्यांना इजा कांहींएक होत नाहीं. या अवधींत त्यांचे इष्टमित्र त्यांस वारंवार भे-

टावयास येत असतात. परंतु त्या मरणारांच्या मनाला हुशारी व समाधान नसल्यामुळें, त्यांना आपल्याकडे येणाऱ्यांच्या परत भेटीस जाववत नाहीं; तथापि मरणापूर्वी दहा दिवस, कोणी अगदीं जवळचे शेजारीपाजारी आपल्याला भेटायाला आले असतील तेवढ्यांच्या परत भेटीस ते जातात. या प्रसंगीं ते एका लहानशा गाडीसारख्या वहानांत बसतात, व तें वाहन ओढण्यास 'याहू' लावलेले असतात. अशा वाहनाचा उपयोग केवळ ह्याच वेळेस करितात असें नाहीं, तर कोणी 'हुं हुं हूं' ह्यातारा झाला असतां त्याला लांबचा प्रवास करण्याचा प्रसंग आल्यास, अथवा एकाद्या अपघातानें कोणी लंगडा वगैरे झाल्यास, त्या वेळींही करितात. असो, वर सांगतल्याप्रमाणें जेव्हां एखादा मरणोन्मुख असा 'हुं हुं हूं' परत भेटी घेण्यास जातो, तेव्हां फक्त जणू काय दूर हजार पांचशें कोसांवर जाऊन तेथें बाकीचें आयुष्य घालविण्याचा त्याचा इरादा आहे, इतक्याच बेतानें तो आपल्या इष्टमित्रांचा निरोप घेतो—याहून जास्त गहिंवर किंवा गंभीरपणा त्या निरोप घेण्यांत दिसून येत नाहीं.

येथपावतों जें कांहीं मीं सांगितलें त्यावरून, कोणती एखादी गोष्ट वाईट आहे असें ह्मणून दाखवावयाचें असल्यास त्यास 'हुं हुं हूं' च्या भाषेंत मुळींच शब्द नाहीं असें आणखी येथें सांगितलें असतां वाचक हे मला द्विरुक्ति केल्याचा खास दोष देतील. तथापि इतकें सांगणें अवश्य आहे कीं, 'याहू' चा ओंगळपणा व दुर्गुण यांपासून, वाईट ह्मणून कांहीं असतें याची किंचित् कल्पना त्यांच्या मनांत भरली आहे; आणि ह्मणूनच, चाकरांचा मूर्खपणा, मुलांच्या हातून झालेल्या चुक्या, कपरीनें पायांस झालेल्या जखमा, दुर्दिन, इत्यादि अनिष्ट गोष्टी व्यक्त करण्याकरितां, त्या

त्या गोष्टींचे वाचक शब्द प्रथम घालून त्यांच्यापुढें वाईट अशा अर्थानें ते ' याहू ' हा शब्द जोडितात.

या सर्वोत्कृष्ट प्राण्यांच्या रीतिभाती व गुण यांचें आणखी पुष्कळ वर्णन मीं मोठ्या खुशीनें केलें असतें, परंतु या संबंधाचा निराळाच एक ग्रंथ थोडक्याच दिवसांनीं प्रसिद्ध करण्याचा माझा विचार असल्यामुळें या ठिकाणीं मीं आतां जास्त न लिहितां, येथून पुढें दुर्दैवानें मजवर जे कठिण प्रसंग गुदरले त्यांची हकीकत सांगतों.





## प्रकरण १०.

गलिव्हर याची त्या देशांत राहण्याची वगैरे व्यवस्था.—'हुं हुं हू' शीं सहवास घडल्यानें त्याच्या नीतींत सुधारणा झाली ती.—त्यांचीं व याचीं संभाषणें.—गलिव्हर यानें आपला देश सोडून जावें अशी त्याच्या धन्याकडून त्यास सूचना मिळते.—त्यावरून त्याला मोठें दुःख होतें, व तो मूर्छित पडतो; परंतु आलेल्या प्रसंगास सादर होतो.—तो आपल्या धन्याच्या एका चाकराच्या मदतीनें एक पडाव तयार करितो, आणि मोठ्या संकटानें त्यांत बसून तेथून निघतो.

त्या देशांत माझी सर्व व्यवस्था माझ्या इच्छेप्रमाणें उत्तम प्रकारें लागली होती. माझ्या धन्यानें तिकडच्या रीतीप्रमाणें मला रहाण्याकरितां एक जागा आपल्या घरापासून सुमारें सहा यार्डांच्या अंतरावर तयार करविली होती. त्या जागेच्या चोहों बाजूंस व जमिनीस मीं गिलावा केला होता, व स्वतः तयार केलेल्या व्हाळ्याच्या चटयांनीं ती आच्छादिली होती. त्या

देशांत ताग आपोआपच पुष्कळ होतो, त्याचा मीं सरासरी कसा तरी एक कपडा बनवून व त्यांत पक्ष्यांचे पर भरून त्याची गोदडीसारखी एक गादी केली होती. हे पक्षी मी ‘ याहू ’ च्या केंसांचे फांस करून त्यांनीं धरीत असें, व त्या देशांत मला ती केवळ मेजवानीच होत असे. मीं आपल्या चाकूनें दोन खुर्च्या तयार केल्या होत्या. त्या करण्याचे कामीं जास्त खटपटीचे व ऌमसाताशीचें जें काम होतें, त्यांत माझ्या धन्याचा चाकर, तांबूस रंगाचा घोडा, यानें मला फार मदत केली होती. माझे कपडे फाटून त्यांच्या चिंध्या झाल्यावर, सशांच्या व ‘ नुन्हो ’ या नांवाचे त्यांच्यासारखे दुसरे प्राणी त्या देशांत आहेत त्यांच्या कातड्यांचे मीं दुसरे कपडे तयार केले होते.' या दुसऱ्या प्राण्यांच्या अंगावर फारच मऊ लोंकर असते, त्या लोंकरीचे मीं पायमोजे केले होते. मीं आपल्या जोड्याला लांकडाचे तळ घालून तो बरेच दिवस टिकविला होता, परंतु तो अगदींच फाटून गेल्यावर मीं ‘ याहूंचें ’ कातडें उन्हांत वाळवून त्याचा जोडा तयार केला होता. मला अनेक वेळां झाडांच्या ढोलींत मध सांपडत असे, तो मी पाण्यांत मिसळून पीत असें, अथवा तसाच भाकरीबरोबर खात असें. सारांश, आपल्यांत ज्या दोन ह्मणी आहेत कीं, ‘ वास्तविक गरज ही अगदीं थोड्यानें भागली जाते, ’ व ‘ गरज पडली ह्मणजे युक्ति सुचते, ’ त्यांच्या खरेपणाचा अनुभव मला या प्रसंगीं जितका आला, तितका दुसऱ्या कोणासही आला नसेल.

असो; त्या देशांत माझी शरीरप्रकृति अगदीं निरोगी असून माझ्या मनास पराकाष्ठेची शांतता होती. कारण तेथें मला कांहीं, एखाद्या दोस्त ह्मणविणाऱ्या मनुष्याच्या विश्वासघाताचें किंवा वचनभंगाचें भय नव्हतें, अथवा

एखादा गुप्त किंवा उघड शत्रु आपला केव्हां गळा कापील याचीही धास्ती नव्हती; तसेंच, एकाद्या मोठ्या धेंडाची मर्जी संपादण्याकरितां त्याची किंवा त्याच्या बगल्याची हांजीहांजी करण्याचें कारण नव्हतें, अथवा आपणाला कोणी ठकवील अगर आपल्यावर कोणी जुलूम करील ह्मणून बंदोबस्त करण्याचेंही कारण नव्हतें; त्याचप्रमाणें, माझ्या शरीराचा नाश करणारे वैद्य तेथें नव्हते, अथवा माझ्या जिंदगीची व पैशाची राखरांगोळी करणारे वकील नव्हते; तसेंच, मी काय बोलतों व काय करितों याची गुप्त बातमी ठेवणारे हेर नव्हते, अथवा पैशाच्या लालचीनें खोटे दस्तऐवज करून माझ्या विरुद्ध कुभांड रचणारेही कोणी नव्हते; त्याचप्रमाणें, त्या ठिकाणीं व्यर्थ दोषारोप करणारे, पाठीमागून फुसकुल्या सोडणारे, खिसेकापे, दरवडेखोर, घरफोडे, तोंडपुजे, कारस्थानें कुटीत बसणारे, शीघ्रकोपी, रिकामी वटवट करणारे, वितंडवादी, कामांध, खुनी, व व्यर्थ चिकित्सा करणारे असेही कोणी नव्हते; त्याचप्रमाणें, कोणता तरी एखादा पक्ष घेऊन रिकामे भांडत बसणारे, व लालूच अथवा उदाहरण दाखवून दुराचारास उत्तेजन देणारेही कोणी नव्हते; तसेंच, तेथें तुरुंग, बरच्या, वधस्तंभ, फटके मारण्याचे खांब, व सूळ हेही नव्हते; त्याचप्रमाणें तेथें खोटें वजनमाप देणारे व्यापारी अथवा लबाड कारागीरही नव्हते; तसेंच, गर्व, बढाई व रिकामा ताठा यांचाही कोणाच्या ठायीं गंध नव्हता; त्याचप्रमाणें, कुर्रेबाज, दारूबाज, व जुलमी लोक नव्हते, रिकामा दिमाख मिरविणाऱ्या स्त्रिया नव्हत्या, लघाळपणा करणारे, उर्मट, तंटेखोर, उगीच प्रत्येक कामांत गिड्डा करून सोडणारे, व मित्रघात करणारेही कोणी नव्हते; तसेंच, केवळ दुराचाराच्या योगानें अत्यंत नीच अ-

वस्थेपासून मोठ्या पदास चढलेले, अथवा प्राण गेला तरी नीति सोडावयाची नाहीं असा बाणा बाळगून राहिल्यानें दीन दशेस पावलेलेही लोक नव्हते; आणि आपल्या क्षणिक संपत्तीचा, वैभवाचा व अधिकाराचा ताठा मिरविणारे अमीरउमराव व न्यायाधीशही नव्हते !

माझ्या धन्याच्या घरीं त्याचे स्नेही कित्येक 'हुं हुं हूं' भोजनास किंवा एरव्हीं त्याच्या भेटीस येत असत, त्या वेळीं माझा धनी, त्यांचें संभाषण मला ऐकावयास सांपडावें ह्मणून, त्या मंडळींत मला येण्यास परवानगी देत असे. त्या प्रसंगीं खुद्द तो व इतर मंडळी मला कित्येक प्रश्न विचारीत व त्यांचीं उत्तरें मी त्यांस देईं. शिवाय कित्येक वेळां माझा धनी इतर लोकांच्या भेटीस वगैरे जात असे तेव्हांही आपल्याबरोबर मला नेत असे. त्या वेळींही वरीलप्रमाणेंच सवालजबाब होत असत. परंतु मीं स्वतः होऊन बोलण्याचा हिय्या कधींच केला नाहीं, तर कोणी प्रश्न विचारला असतां त्यास जबाब मात्र द्यावयाचा तो देत असें; व तो जबाब देण्यांतही जो कांहीं थोडा वेळ जाई, त्याचें मला फार वाईट वाटे; कारण, त्या योगानें एके प्रकारें माझी सुधारणा होण्यांत अडथळाच येत असे; आणि ह्मणून, त्यांचीं जीं काय संभाषणें चालत तीं लक्षपूर्वक ऐकून घेण्यांतच विशेष आनंद मला वाटत असे. असो; या एकंदर संभाषणांत जें कांहीं ह्मणून उपयुक्त तेवढ्याचाच काय तो उहापोह होत असून, तो फारच थोड्या व स्पष्ट अशा शब्दांनीं होत असे. या संभाषणांत कोणी केव्हांही रिकामा डौल दाखवीत नसे, तर प्रत्येकजण मोठ्या सभ्यतेनें व गंभीरपणानें जें काय बोलावयाचें तें बोलत असे. त्या बोलण्यानें बोलणाऱ्याच्या स्वतःच्या व इतरांच्या अंतःकरणास परमानंद होत असे, व एकाचें बोलणें चाललें असतां दुसरा

कधींही मध्येंच बोलत नसे. तसेंच कोणाच्या बोलण्यांत रिकामा पाल्हाळिकपणा, आवेश, अथवा मतभेदाचा प्रकार कधींही दृष्टीस पडत नसे. त्यांचें असें एक ठरीव मत आहे कीं, जेव्हां कांहीं लोक एके ठिकाणीं जमतात, तेव्हां तेथें शांतता असली ह्मणजे त्यांच्यांत होणाऱ्या संभाषणापासून फार उपयोग होतो. ही गोष्ट शब्दशः खरी आहे असें माझ्या अनुभवास आलें. कारण मला जीं त्यांचीं थोडथोडींच पण साधीं व मनोहर भाषणें ऐकावयास सांपडलीं, त्यांत अशा प्रकारचा शांतपणा असल्यामुळें, त्या मंडळीच्या मनांत नवीन नवीन कल्पना येऊन तीं भाषणें जास्तच मनोवेधक झालीं असें मला दिसून आलें. त्यांच्या संभापणाचे विषय सामान्यतः मैत्री, परोपकारबुद्धि, व्यवस्थितपणा व काटकसर हे असतात; क्वचित् प्रसंगीं सृष्टपदार्थांत सृष्टिकर्त्याचें जें अगाध चातुर्य नजरेस पडतें तें, अथवा जुन्या दंतकथा यांवरही भाषण चालतें; अथवा सद्गुणाच्या मर्यादा, अगर बुद्धीचे अबाधित नियम, किंवा सर्व प्रतिनिधींची दुसरी सभा भरण्याचे वेळीं काय काय ठराव करावयाचे, हेही त्या भाषणांचे विषय असतात; खेरीज पुष्कळ वेळां काव्याच्या अनेक गुणांवरही सुरेख टीका होत असते. तसेंच, मी त्यांच्या मंडळींत असें त्या प्रसंगीं माझ्या संबंधानेंही पुष्कळ वेळां त्यांच्यांत संभाषण चालत असे; कारण माझी व माझ्या देशाची हकीकत आपल्या स्नेह्यांस वगैरे सांगण्याची अर्थातच माझ्या धन्यास ती संधि येत असे. हा मला त्यांच्यांत एके प्रकारें मोठेपणाच मिळतो हें पाहून मला मोठा आनंद व अभिमान वाटत असे. तथापि त्या संभाषणाचें पर्यवसान एकंदरीनें मनुष्यमात्रास विरुद्ध असें होत असे, याबद्दल मला अर्थातच फार वाईट वाटे; व ह्मणून, ते माझ्या संबंधानें काय बोलत याचा माझ्यानें येथें उल्लेख करवत नाहीं.

तथापि इतकें मला सांगणें अवश्य आहे कीं, आपल्या एकंदर 'याहू' जातीचा स्वभाव माझ्यापेक्षांही माझ्या धन्यास चांगला समजत असे हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटे. त्यानें आपणांतील सर्व दुर्गुण व मूर्खपणाचीं कृत्यें हीं बोलून दाखवावीं, व ज्यांविषयीं मी त्याजपाशीं कधींच बोललों नव्हतों असेही दुर्गुण आपल्या लोकांत आणखी असलेले त्यानें मला अचूक दाखवून द्यावे. ते त्यानें आपल्या देशांतील 'याहू' च्या अनुभवावरूनच अर्थात् सिद्ध करून दाखवावे; आणि शेवटीं ह्मणावें कीं, 'अशा प्रकारचा जो प्राणी 'याहू' ह्मणजे ( मनुष्य ) तो किती दुष्ट व नादान असावा याची कल्पना पूर्णपणें होणें अशक्य आहे !'

मी हें स्पष्ट सांगतों कीं, मला जें काय- थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें आहे तें माझ्या धन्याच्या व इतरांच्या संभाषणापासूनच प्राप्त झालें आहे. तीं संभाषणें फक्त **ऐकून घेण्याचा** मला एवढा आनंद व अभिमान वाटे कीं, तसा आनंद व अभिमान युरोपांतील मोठमोठ्या शहाण्या व धुरंधर अशा राजसभांना **हुकूम फरमावण्यापासूनही** मला वाटणार नाहीं ! तेथल्या रहिवाशांचें आरोग्य, सुबकपणा, व चपलता हीं पाहून मला मोठें आश्चर्य वाटे; तसेंच, त्यांच्या अंगच्या सद्गुणांच्या योगानें तर माझ्या हृदयांत आनंदोदकाचा केवळ सागरच उचंबळत असे ! त्या देशांतील 'याहू' व इतर प्राणी यांच्याठायीं त्यांच्याविषयीं जी पूज्यबुद्धि आहे, तितकी माझ्या मनांत ती पहिल्यानें उत्पन्न झाली नाहीं; परंतु पुढें ती वाढतां वाढतां इतकी वाढली कीं, त्याचें माझें मलाच आश्चर्य वाटूं लागलें ! त्यांतही माझ्या जातीच्या इतर प्राण्यांहून ते मला निराळा मानीत हें पाहून तर त्यांजविषयींची माझी पूज्यबुद्धि व कृतज्ञता' ही केवळ शिखरास पोहोंचली !

जेव्हां मी आपल्या कुटुंबांतील माणसें, आपले इष्टमित्र, आपले देशबांधव, व एकंदर मनुष्यजात, यांविषयीं विचार करीं, तेव्हां त्या सर्वांचा आकार व स्वभाव वास्तविक पहातां 'याहू' प्रमाणेंच आहे अशी माझी पूर्ण खात्री होई. त्यांच्यांत आणि 'हुं हुं हूं' च्या देशांतील 'याहू' त किंचित् फरक ह्मणून एवढाच माझ्या लक्षांत येई कीं, ते अंमळ सुधारलेले असून त्यांना वाचाशक्ति आहे; बाकी बुद्धीविषयीं ह्मटलें तर, त्यांच्याठायीं जी कांय थोडीबहुत ती आहे, तिचा उपयोग ते दुर्गुणांची वृद्धि करण्याकडेच करितात, व इकडच्या 'हुं हुं हूं' च्या देशांतील 'याहूं' ची गोष्ट तशी नसून त्यांच्या अंगचे जे मूळचे अवगुण तेच त्यांच्यांत कायम आहेत, असें मला दिसून येई. फार॰ कशाला ? मी जेव्हां एखादे वेळेस आपलें स्वतःचें प्रतिबिंब एखाद्या तळ्यांत अथवा प्रवाहांत पाहीं, तेव्हां माझ्या स्वतःविषयींच मला अत्यंत तिरस्कार उत्पन्न होऊन मी लागलाच आपलें तोंड फिरवून घेई,—इतकेंच नव्हे, तर स्वतःचें प्रतिबिंब पाहून जितके माझ्या अंगावर शहारे येत, तितके तिकडचा एखादा ' याहू ' प्रत्यक्ष पाहूनही येत नसत !

असो; ' हुं हुं हूं ' शीं संभाषण करण्यांत माझे बरेच दिवस गेल्यामुळें व त्यांना पाहून माझ्या अंतःकरणांत सदोदित आनंद झाल्यामुळें अर्थातच त्यांची चालचलणूक व हावभाव यांचें अनुकरण करावेंसें मला वाटूं लागलें; व तें करितां करितां संवयीनें तेवढ्यापुरता मी या वेळीं त्यांच्यासारखाच झालों आहें. त्यावरून माझे मित्र माझी थट्टा करितात कीं, तूं घोड्यासारखा हुडक्या चालीनें चालतोस. ते अशी माझी थट्टा करितात खरी, पण मी तर आपल्याला त्यांजकडून हा मोठा मानच मिळतो असें समजतों ! त्याचप्रमाणें, माझा आवाज व बोलण्याची ढब ही देखील ' हुं-

हुं हूं' सारखी झाली असून त्याबद्दलही माझा उपहास होतो हें मी जाणून आहें, तथापि मला त्याबद्दल बिलकूल वाईट वाटत नाहीं !

असो; तर याप्रमाणें त्या देशामध्यें मीं अत्यंत सुखकर स्थितींत राहून आयुष्य घालवीत असतां, एके दिवशीं सकाळीं माझ्या धन्यानें नेहमींपेक्षां लवकर मला बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें मी गेल्यावर त्याच्या मुद्रेवरून मला दिसून आलें कीं, हा अगदीं गोंधळून गेला असून माझ्याशीं जें काय आतां बोलावयाचें त्याला आरंभ कसा करावा हें याला सुचत नाहीं. मग थोडासा वेळ गेल्यावर त्यानें हळूच बोलण्यास सुरुवात केली. तो ह्मणाला, 'मी जें काय आतां तुला सांगणार त्याबद्दल तुला काय वाटेल कोण जाणे. सांगावयाचें इतकेंच कीं, आमच्या देशाच्या सर्व प्रतिनिधींच्या गेल्या सभेंत जेव्हां 'याहू' च्या संबंधाचा विचार झाला, तेव्हां सर्व मंडळीची अशी तकरार पडली कीं, 'तुह्मीं आपल्या येथें जो एक 'याहू' ठेविला आहे त्यास तुह्मी इतर पशूं ('याहूं') प्रमाणें वागवीत नसून 'हुं हुं हूं' प्रमाणें सन्मानानें वागवितां, व पुष्कळ वेळां त्याच्याशीं संभाषणही करीत असतां—जणू काय त्याच्या सहवासापासून आपल्याला फायदा व आनंद होतो असें तुह्मास वाटतें! तर हा एकंदर प्रकार अगदीं विपरीत असून या देशांत घडलेला कधींच कोणास ठाऊक नाहीं. यास्तव मंडळीचें असें मत आहे कीं, त्या 'याहू' स तुह्मीं इतर 'याहूं' प्रमाणेंच कामास लावावें, नाहींपेक्षां तो जेथून आला आहे त्या ठिकाणीं त्यास परत लावून द्यावें.' परंतु यांपैकीं पहिली गोष्ट, ज्या 'हुं हुं हूं' नीं तुला माझ्या अगर आपल्या स्वतःच्या घरीं पाहिलें आहे, त्यांना अगदीं नापसंत झाली; कारण ते ह्मणाले कीं, 'याच्याठायीं बुद्धी-

चा थोडासा अंकुर असल्यामुळें, अशी गोष्ट केली असतां तो आपल्या जातीवर गेल्यावांचून खास रहाणार नाहीं. तो असें करील कीं, सर्व ' याहू ' स रानांत अथवा डोंगरावर एकत्र जमा करून नेईल, आणि रात्रीच्या वेळीं त्यांच्या झुंडींच्या झुंडी घेऊन येऊन सर्व ' हुं हुं हूं ' चीं जनावरें वगैरे यांचा फडशा उडवून टाकील. सबब दुसरी गोष्ट—ह्मणजे तूं आलास तसाच तुला परत घालवून देण्याची—मीं केली पाहिजे असा सदरहू सभेंत ठराव झालेला आहे. हा ठराव होईल तितका लवकर अमलांत आणण्याविषयीं मला चोहोंकडून एकसारखी तसदी लागलेली आहे, सबब हें काम मला आतां यापुढें लांबणीवर टाकणें मुष्किलीचें झालें आहे. तर आतां तुला येथून निघून तर गेलें पाहिजेच; मात्र तें सुरक्षितपणें कसें जातां येईल याचा काय तो विचार राहिला. मला वाटतें, तुला एवढ्या मोठ्या अफाट समुद्रांतून पोहून जातां येणें तर अशक्य आहे. यास्तव त्यावरून तरून जाण्याच्या ज्या पात्राविषयीं तूं पूर्वीं मला सांगितलेंस, तसें एखादें पात्र तूं तयार कर. या कामीं माझे स्वतःचे व शेजाऱ्यापाजाऱ्यांचे नोकर यांची तुला मदत मिळेल. आतां माझ्या स्वतःविषयीं ह्मणशील तर, तुझ्या जिवांत जीव असेपर्यंत तुला मीं खुशीनें आपल्या पदरीं ठेविलें असतें. कारण तुझ्या अकलेच्या मगदुराप्रमाणें तूं ' हुं हुं हूं ' चें होईल तितकें अनुकरण करून आपल्या अंगचे बरेच दुर्गुण नाहींतसे केले आहेस. परंतु देशाच्या सर्व प्रतिनिधींच्या सभेंत झालेला ठराव मला अमान्य करितां येत नाहीं, सबब माझा निरुपाय आहे. '

या ठिकाणीं हें मला सांगणें अवश्य आहे कीं, त्या देशांत प्रतिनिधींच्या सभेचा जो ठराव होतो त्या ठरावास ' व्होयन् ' ह्मणजे **बुद्धिवाद** असें ह्मणतात. कारण कोणती

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.



एखादी गोष्ट करण्याविषयीं कोणास भाग पाडणें हें त्या लोकांस मुळींच माहीत नसून, अशा प्रसंगीं कोणास जें कांहीं करावयास सांगणें तें हुकुमाच्या रीतीनें नव्हे, तर उपदेशाच्या अथवा बुद्धिवादाच्या रीतीनें सांगावयाचें असा त्यांचा शिरस्ता आहे; कां तर ते असें ह्मणतात कीं, 'सर्वांच्या बुद्धीस जें योग्य वाटेल तें प्रत्येकजण केल्यावांचून रहावयाचा नाहीं; तेव्हां त्याला भाग पाडण्याचें मुळींच कारण नाहीं; व जो कोणी तसें करणार नाहीं, तो बुद्धिवानांत मुळींच गणला जाणार नाहीं!'

माझ्या धन्याचें वर सांगितलेलें बोलणें ऐकून मी दुःखानें व निराशेनें पराकाष्ठेचा व्याप्त झालों, आणि माझ्या अंतःकरणाला ज्या वेदना होऊं लागल्या त्या मला असह्य होऊन मी धन्याच्या पायांशीं मूर्छा येऊन पडलों. मग अंमळशानें जेव्हां मी शुद्धीवर आलों तेव्हां तो मला ह्मणाला, 'तुझी ही स्थिति पाहून तुला मरण आलें असा माझा तर्क झाला.' (कारण अशा प्रकारें मध्येंच बेशुद्धि वगैरे येणें हें त्या लोकांस मुळींच माहीत नाहीं; तर प्राण्याला जी बेशुद्धि यावयाची ती शेवटीं महानिद्रेच्या रूपानें एकदांच यावयाची येवढेंच त्यांस माहीत आहे.) मीं सद्गदित होऊन त्यास उत्तर केलें, 'महाराज, मला मरण आलें असतें तर फारच चांगलें झालें असतें. कारण जो प्रसंग आतां मजवर गुदरणार आहे तो इतका कठिण आहे कीं, त्याची मला मरणापेक्षां शतपट धास्ती वाटत आहे! आतां मी ह्मणजे प्रतिनिधींच्या या ठरावाबद्दल त्यांस दोष देतों असें मुळींच नाहीं; तरी पण माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें मला वाटतें कीं, त्यांचा हा ठराव याहून कमी कडक असता तरी चाललें असतें; कां तर मला येथून समुद्रपार पोहून जाणें तर अशक्य आहेच; कारण माझी शक्ति ती किती? फार

झालें तर कोस दीड कोस मी पोहून जाईन; आणि समुद्राच्या पलीकडचा अतिशय जवळचा देश घेतला तरी तो येथून तीनचारशें कोसांपेक्षां कमी खास असूं शकणार नाहीं. तेव्हां ही गोष्ट तर बोलायालाच नको. आतां समुद्रावरून तरून जाण्याचें पात्र तयार करण्याविषयीं आपण ह्मटलें, पण तें करण्याचीं साधनें या देशांत मुळींच नसल्यामुळें तीही गोष्ट मला अशक्यच दिसत आहे. तथापि आपल्या हुकुमाप्रमाणें मी यत्न करून पहावयाचा तो आपला पाहीन. परंतु एकंदरीनें आतां माझा विनाशकाल आला हें मी खास समजतों. यांत मी ह्मणंजे, आपल्यावर कांहीं एकाएकीं प्रसंग गुदरून अपमृत्यु येईल ह्मणून भितों, असें मुळींच नाहीं—उलटें तसें कांहीं झालें तर फार बरें असेंच मी ह्मणतों;. कारण पहा कीं, मी कसाबसा समुद्रपार होऊन भलत्या एखाद्या देशांत गेलों, तर तेथल्या 'याहू' च्या सहवासांत राहून आयुष्य घालविण्याचें माझ्या किती जिवावर येणार आहे बरें! कां कीं, तेथें माझ्या मनाचें आकलन करून मला सद्गुणाच्या मार्गास लावणारें असें 'हुं हुं हूं' सारखें कोणाचेंच उदाहरण सांपडण्याचा बिलकूल संभव नाहीं. असें जरी आहे, तरी 'हुं हुं हूं' हे जीं कृत्यें करितात, तीं पूर्ण व योग्य विचाराअंतीं करितात हें मला पकें ठाऊक आहे. यास्तव यासंबंधानें वादविवाद करण्याची मजसारख्या पामराची बिलकूल प्राज्ञा नाहीं. असो; तर सध्यां आपण व आपल्या शेजाऱ्यांनीं मला समुद्रावरून तरून जाण्याचें पात्र तयार करण्याकरितां नोकरांची मदत दिली याबद्दल आपणां सर्वांचे मी मोठे आभार मानितों, व हरप्रयत्न करून मी आपला जीव—जरी तो वास्तविक महत्वाचा नाहीं तरी—वांचविण्याचा यत्न करतों. आणि हा माझा यत्न सिद्धीस जाऊन मी जर स्वदेशीं सुखरूप पोहोंचलों, तर

त्या ठिकाणीं 'हुं हुं हूं' च्या गुणांचें वर्णन करून, सर्व मनुष्यजात त्यांचें अनुकरण करील अशी होईल तितकी तजवीज करीन, व अशा प्रकारें आपल्या जातीच्या उपयोगीं पडेन. मात्र आतां शेवटीं एवढीच प्रार्थना आहे कीं, मला निघण्याची तयारी करण्यास दोन महिन्यांचा अवकाश द्यावा.'

यावर माझ्या धन्यानें मला दयार्द्र अंतःकरणानें समाधानकारक असें थोडक्यांत उत्तर देऊन मला तयारीसाठीं दोन महिन्यांचा अवकाश मीं मागितल्याप्रमाणें दिला, आणि आपला फार विश्वासू नोकर, तांबूस रंगाचा घोडा, यास माझ्या सांगण्याप्रमाणें मला मदत करण्याविषयीं हुकूम केला. या संबंधानें मीं धन्यास सांगितलें कीं, 'त्यास आपण मला मदत करण्यास दिलें ही फारच चांगली गोष्ट झाली. कारण त्याची मजवर पहिल्यापासूनच मोठी ममता आहे. शिवाय त्याच्या एकट्याच्या मदतीनेंच माझें काम होणार आहे, यास्तव दुसऱ्या कोणाचीही मला आतां गरज नाहीं.'

मीं प्रथमतः असें केलें कीं, त्या तांबूस रंगाच्या घोड्यास बरोबर घेऊन, ज्या समुद्रकिनाऱ्यावर मला माझ्या जहाजावरच्या बंडखोर लोकांनीं उतरविलें होतें, तिकडे गेलों. तेथें मीं एका टेंकाडावर चढून चोहोंकडून समुद्र नीट पाहिला. तों मला ईशान्य दिशेकडे एक लहानसें बेट दिसल्याचा भास झाला. त्यावरून मीं आपली धाकटी दुर्बीण खिशांतून काढली, व तींतून पहातांच मला स्पष्ट दिसलें कीं, त्या बाजूस खरोखरच एक बेट असून तें जवळच म्हणजे सुमारें सात आठ कोसांच्या अंतरावर असावें. परंतु त्या तांबूस रंगाच्या घोड्यास, तें बेट नसून एखादा ढगच असावा, असें वाटलें. तें ठीकच; कां कीं, त्याला स्वतःच्या देशाखेरीज दुसरा कोण-

ताही देश जगांत असावा ही कल्पनाच मुळीं नव्हती. शिवाय त्याला समुद्राची विशेष प्रकारची माहिती असण्याचा अर्थातच संभव नव्हता, यास्तव या बाबतींत त्याचा निर्णय माझ्या कांहीं कामाचा नव्हता हें उघड आहे.

या बेटाचा मला शोध लागल्यावर मीं जास्त कांहीं एक विचार न करितां असा निश्चय केला कीं, आपण प्रथम येथून जें निघावें तें आपलें याच बेटांत जावें. मग पुढें नशिबानें जें काय होणार असेल तें होईल.

मग आह्मी घरीं आलों, व मी, आपल्या त्या सोबत्यास ह्मणजे तांबूस रंगाच्या घोड्यास बरोबर घेऊन कांहीं अंतरावर लहानशी झाडी होती तेथें गेलों. तेथें मीं आपल्या चाकूनें व त्यानें आपल्या गारगोटीच्या कुऱ्हाडीसारख्या बनविलेल्या हत्यारानें ओक झाडाचीं लहान मोठीं लांकडें तोडलीं. आतां यापुढच्या माझ्या कारागिरीच्या संबंधानें तपशीलवार हकीकत सांगून मी वाचकांस तसदी देत नाहीं. फक्त इतकेंच सांगतों कीं, सुमारें सहा आठवड्यांत तांबूस रंगाच्या घोड्याच्या मदतीनें मीं, इंदियन लोकांचे पडाव जसे असतात त्याप्रमाणें, पण त्यापेक्षां बराच मोठा असा एक पडाव तयार केला. यांत मोठ्या श्रमाचें जेवढें काम होतें तेवढें सर्व अर्थातच त्या घोड्यानें केलें. असो, तो पडाव तागाच्या दोऱ्यांनीं ' याहू ' चीं कातडीं एकत्र शिवून मीं मढवून टाकिला; त्याचप्रमाणें शीडही त्याच कातड्याचें बनविलें; खेरीज चार हातवल्हींही तयार केलीं; आणि ससे व कित्येक पक्षी यांचें शिजविलेलें मांस व पाण्यानें व दुधानें भरलेलें एकेक भांडें, इतकी सामग्री त्या पडावांत भरली.

याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर तो पडाव मीं आपल्या धन्याच्या घरापासून जवळच एक मोठा तलाव होता त्यांत चालवून पाहिला, व त्यांत जें कांहीं कमजास्त दिसलें तें

दुरुस्त केलें. मग मी तो पडाव, तांबूस रंगाचा घोडा व दुसरा एक चाकर यांच्या देखरेखीखालीं 'याहू' कडून गाडीवर घालून समुद्रकिनाऱ्यावर नेवविला.

जेव्हां माझी सर्व तयारी झाली व माझा निघण्याचा दिवस आला, तेव्हां मीं आपला धनी व धनीण आणि कुटुंबांतील इतर सर्वजण यांचा शेवटचा निरोप घेतला. त्या वेळीं माझ्या नेत्रांतून खळखळ अश्रु चालले, व माझें हृदय दुःखानें भरून आलें. मीं आपल्या धन्याचा शेवटचा निरोप घेतला ह्मणून सांगितलें, तथापि तो मला होडींत बसेपर्यंत पोहोंचवावयास आला. हें त्यानें सहजवृत्त्या केलें असावें किंवा कदाचित् मजवर त्याची ममता होती ह्मणून केलें असावें. असो; त्यानें आपले कित्येक शेंजारीपाजारी इष्टमित्रही आपल्याबरोबर घेतले होते. किनाऱ्यावर पोहोंचल्यावर मला भरतीची वाट पहात एक तासभर थांबावें लागलें. नंतर भरती आल्यावर, ज्या बेटाकडे जाण्याचा माझा इरादा होता, तिकडच्याच दिशेचा वारा सुदैवेंकरून वाहूं लागल्यामुळें, आतां जलदी करून निघावें असें वाटून मीं पुनः एकवार आपल्या धन्याचा शेवटचा निरोप घेतला. त्या वेळीं मी त्याच्या पायाचें चुंबन करण्याकरितां त्याजपुढें आडवा पडत होतों, इतक्यांत त्यानें मला तसें करूं न देतां आपला खूरच माझ्या तोंडाकडे केला. ही गोष्ट मीं कित्येकांपाशीं बोलून दाखविल्यावरून त्यांनीं माझी किती टर उडविली हें माझ्या पुरतें लक्षांत आहे! त्यांना तरी मी फारसा दोष लावीत नाहीं, कारण कित्येक प्रवासी आपला एखाद्या ठिकाणीं जो काय मानसन्मान झाला असेल त्याची हकीकत दसपट फुगवून सांगतात असें पुष्कळ वेळां अनुभवास आलें आहे; व त्याप्रमाणेंच मजविषयींही कदाचित् लोकांना वाटून, एवढा मोठ्या दर्ज्याचा 'हुं हुं हूं' याला कसला इतका

मान देतो अशी त्यांस शंका आली असावी हें साहजिकच आहे. तथापि मी खचीत सांगतों कीं, असे जे दोषदृष्टि लोक आहेत, त्यांना 'हुं हुं हूं' च्या थोर व मर्यादशील स्वभावाचा परिचय झाल्यास त्यांचा हा ग्रह फिरल्यावांचून कदापि रहाणार नाहीं.

असो; मीं आपल्या धन्याचा दुसऱ्यानदां आणखी निरोप घेतला हें वर सांगितलेंच आहे. खेरीज त्याच्याबरोबर आलेल्या मंडळींचाही त्याच वेळेस निरोप घेऊन मी आपल्या पडावांत जाऊन बसलों, व तो समुद्रांत हांकारून चालता झालों.





# प्रकरण ११.

गलिव्हर याची जिवावरची सफर.—तो न्यूहालंड येथें येऊन पोहोंचतो, व त्या ठिकाणीं राहाण्याचा बेत करितो.—तेथला कोणी रहिवासी त्यास तीर मारून जखम करितो.—त्यास कैद करून एका पोर्तुगीज जहाजांत घेऊन जातात.—त्या जहाजाच्या कप्तानाचा सभ्यपणा.—शेवटीं गलिव्हर हा इंग्लंडास येऊन पोहोंचतो.



तारीख १५ फेब्रुआरी सन १७१४ रोजीं सकाळीं नऊ वाजतां मागील प्रकरणांत सांगितलेल्या माझ्या जिवावरच्या सफरीस आरंभ झाला. त्या वेळीं वारा फार अनुकूल लागला होता. तथापि मीं प्रथम आपल्या हातवल्ह्यांचाच उपयोग केला. परंतु या योगानें मी लौकर दमून जाईन, व वाऱ्याचीही कदाचित् चलबिचल होऊं लागेल, असें जाणून मीं आपलें तें लहानसें शीड उभारलें, व लाटेच्या मदतीनें अदमासें दर

तासास दोनअडीच कोसप्रमाणें चाललों. माझा धनी व त्याचे स्नेही हे मी दिसेनासा होईपर्यंत किनाऱ्यावर उभे होते, व मजवर अतिशय ममता करणारा माझ्या धन्याचा चाकर, तांबूस रंगाचा घोडा, हा वारंवार मोठ्यानें ओरडून मला ह्मणत होता कीं, ' गरीब बिचाऱ्या ' याहू! ' संभाळून जा बरें ! '

माझा असा बेत होता कीं, एखाद्या बिनवस्तीच्या बेटांत जाऊन रहावें, व तेथें आपल्या श्रमानें आपला चरितार्थ चालवून आयुष्याचे दिवस घालवावे. याप्रमाणें मला करितां आलें असतें तर युरोपांतल्या मोठ्या बलाढ्य राजाच्या मुख्य प्रधानाच्या दसपटीनें मला सौख्य झालें असतें. हें सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, पुनः ' याहू ' च्या राज्यांत जाऊन त्यांच्या सहवासांत रहाण्याचा मला अगदीं पराकाष्ठेचा कंटाळा येऊन गेलेला होता. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें एकांतांत रहावयास मला सांपडलें असतें, तर निदान मला आपल्या जातबांधवांच्या दुर्गुणांत फिरून शिरण्याचा प्रसंग न येतां निवांतपणें विचारांत निमग्न राहून ' हुं हुं हूं ' च्या अमोलिक गुणांचें अभिनंदन तरी करितां आलें असतें !

मी या शेवटच्या प्रवासास निघाल्यावर माझ्या जहाजावरच्या खलाशांनीं माझ्याविरुद्ध कट करून मला आपल्या खोलीमध्यें कैद करून ठेविलें होतें, व पुढें कित्येक दिवसांनंतर मला त्यांनीं ' हुं हुं हूं ' च्या देशाच्या किनाऱ्यावर आणून सोडलें वगैरे हकीकत या भागाच्या आरंभीं मीं सांगितलेली वाचकांस आठवतच असेल. त्या वेळीं जगाच्या कोणत्या भागांत आपण आहों हें मीं त्या खलाशांस विचारिलें असतां, आह्मांला कांहीं ठाऊक नाहीं असें त्यांनीं शपथेवर सांगितलें. तें खरें कीं खोटें हें त्यांचें त्यांना माहीत;

पण माझा त्या वेळीं असा अजमास झाला कीं, आपण दक्षिण अक्षांश ४५ च्या सुमारास ह्मणजे केप् ऑफ् गुड् होप्च्या नजीक कोठें तरी आहों. हें अनुमान, त्यांचें जें आपसांत बोलणें चाललेलें मला ऐकूं आलें, त्यावरून मीं केलें होतें, व तेथून ईशान्येकडे वळून मादागास्कर बेटाकडे जाण्याचा त्यांचा इरादा होता हेंही पण माझ्या लक्षांत होतें. आतां हा आपला तर्क उगीच कांहीं तरी झाला असला तरी चिंता नाहीं, तथापि त्याच अदमासानें आपण पूर्वेकडे रोंख वळवावा असा मीं निश्चय केला. कारण असें केलें असतां न्यूहॉलंड बेटाच्या नैर्ऋत्य किनाऱ्यास अथवा कदाचित् त्याच्या पश्चिम बाजूच्या एखाद्या विनवस्तीच्या बेटास आपल्या इच्छेप्रमाणें आपण जाऊन लागूं असें मला वाटलें. वारा पश्चिमेकडचा होता यामुळें संध्याकाळचे सहा वाजण्याचे सुमारास अदमासें मी पंचवीस तीस कोस पूर्वेकडे आलों असें मला दिसून आलें. त्या वेळीं मला छोट्याशा बेटासारखें कांहीं दिसलें, व त्याला मी लवकरच जाऊन पोहोंचलों. पण तें बेटबीट कांहीं नसून नुसता खडक होता, व वादळाच्या जोरानें कमानीसारखें एक त्याला बांकण किंवा खाडी झालेली होती. या ठिकाणीं मीं आपला पडाव उभा केला, व तो खडक अर्धामुर्धा चढून चोहोंकडे नजर फेंकली, तों पूर्वेकडचे बाजूस दक्षिणोत्तर जमिनीची पट्टी स्पष्ट माझ्या नजरेस पडली. नंतर मी पुनः आपल्या पडावाकडे आलों, व रात्रभर त्यांतच निजून राहिलों. मग सकाळीं उठून पुनः पडाव चालू केला, व सात तासांमध्यें न्यूहॉलंडच्या आग्नेय टोंकास जाऊन लागलों. यावरून हें बेट वास्तविक ज्या ठिकाणीं आहे, त्याहून नकाशांत निदान तीन अंशांनीं तरी तें पूर्वेकडे जास्त दाखविण्यांत आलें आहे असें जें माझें पूर्वीपासून मत होतें तें या वेळीं जास्त

दृढ झालें. हें माझें मत मीं कित्येक वर्षांपूर्वी आपला मित्र मिस्तर हार्मन मोल यास कळवून त्याचीं कारणेंही त्यास सांगितलीं होतीं, तथापि त्यानें त्याकडे लक्ष न देतां इतर ग्रंथकारांचेच आधार प्रमाणभूत धरले!

ज्या ठिकाणीं मी उतरलों त्या ठिकाणीं भरती वगैरे कांहीं मला दिसली नाहीं, व ह्मणून जवळ हत्यारपात्यार कांहीं नसल्यामुळें त्या प्रदेशाच्या आंत फारसा जाण्याचा हिय्या मला होईना. किनाऱ्या नजीक मला 'शेल-फिश' या जातीचे कांहीं मासे सांपडले, परंतु ते भाजण्याकरितां विस्तव पेटवावा तर आंतील लोकांस आपला सुगावा लागून कदाचित् आपणावर अनर्थ गुदरेल, असें जाणून मीं ते मासे भाजण्याच्या भरीस न पडतां तसे हिरवेच खाल्ले. पुढें तीन दिवसपर्यंत मीं कालवें वगैरेंवरच आपला निर्वाह केला; कां कीं, मला आपल्याजवळची सामग्री जितकी जास्त दिवस पुरेल तितकी पुरवणें भाग होतें. पुढें सुदैवेंकरून त्या ठिकाणीं गोड्या पाण्याचा एक ओढाही मला आढळला, त्यामुळें माझी पुष्कळच गैरसोय कमी झाली.

चवथे दिवशीं सकाळच्या प्रहरीं मीं त्या प्रदेशांत बराच प्रवेश केला. तों मला सुमारें पांचशें यार्डांच्या अंतरावर पंचवीस तीस मनुष्यें एका टेंकाडावर असलेलीं आढळलीं. तीं सर्व—पुरुष, बायका, मुलें सुद्धां—केवळ दिगंबर असून मोठा विस्तव पेटवून त्याभोंवतीं बसलेलीं होतीं. त्यांपैकीं एकानें मला पाहून बाकीच्यांस त्याबद्दल इशारा केला. तेव्हां त्यांच्यांतून पांच असामी मजकडे यावयास निघाले. सबब मीं होईल तितकी त्वरा करून किनाऱ्याकडे पळ काढला, व आपल्या पडावांत बसून झट्दिशीं चालता झालों. ते रानवट लोक मीं चाललों असें पाहून माझ्यामागें धांवत सुटले, व मी समुद्रांत बराच लांब जाण्यापूर्वी त्यांपैकीं

एकानें मजवर एक तीर सोडला. तो माझ्या डाव्या गुडघ्यांत खोल शिरून त्यानें मला मोठी जखम केली. या जखमेची खूण मी मरेपर्यंत तशीच रहाणार आहे. असो, त्या तीराच्या टोंकाला कदाचित् विष असेल अशी मला धास्ती वाटून, मीं त्या लोकांच्या आटोक्याच्या अंमळ पार गेल्याबरोबर लागलीच ती जखम चोखून व बांधून टाकिली.

पुढें आतां काय करावें हें मला सुचेना; कारण पुनः त्याच ठिकाणीं जाऊन उतरण्याचा धीर मला मुळींच होईना; ह्मणून मीं उत्तरेकडचा रोंख धरिला, व त्यामुळें मला हातवल्ह्यांचा उपयोग करणें भाग पडलें; कारण वारा जोराचा नव्हता, तथापि तो माझ्या समोरून येत असल्यामुळें मला तसें केल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. पुढें मी उतरण्याकरितां सुरक्षित जागा पहात असतां, ईशान्येकडे एक शीड दिसत आहेसें मला वाटलें, व तें प्रत्येक मिनिटामिनिटानें जास्तच स्पष्टच दिसूं लागलें. परंतु त्याची आपण वाट पहावी कीं न पहावी याबद्दल माझ्या मनांत शंका आली. शेवटीं 'याहू' जातीविषयीं माझ्या मनांत जो पराकाष्ठेचा तिटकारा बसून गेलेला होता, त्याचा पगडा माझ्या विचारांवर जास्त बसून मीं आपला पडाव फिरवून दक्षिणेकडे चालविला, व सकाळीं जेथून निघालों होतों त्या खाडीपाशीं जाऊन दाखल झालों. कारण सुधारलेल्या युरोपियन 'याहू' च्या सहवासापेक्षां या ठिकाणच्या रानटी लोकांवरच विश्वास ठेवणें बरें असें मला वाटलें. मग खाडींतून मीं आपला पडाव किनाऱ्यानजीक जितका नेववेल तितका नेऊन पूर्वी सांगितलेल्या त्या ओढ्यानजीकच्या एका दगडामागें लपून बसलों.

इकडे तें जहाज खाडीपासून सुमारें कोसा दीड कोसाच्या अंतरावर येऊन थडकलें, व त्यांतील कांहीं खलाशी

एका होडींत बसून गोडें पाणी घेण्याकरितां, मी जेथें बसलों होतों त्या ओव्याकडे येण्याकरितां निघाले; व यावरून हें ठिकाण प्रसिद्ध असावें असें मला वाटलें. परंतु त्यांची ती होडी किनाऱ्याच्या अगदीं नजीक येईपर्यंत माझ्या नजरेस पडली नाहीं. याप्रमाणें ते लोक एकदम त्या ठिकाणीं आल्यामुळें मला दुसरीकडे जाऊन लपण्यास अवधि राहिला नाहीं. होडींतील खलाशांनीं उतरल्याबरोबर माझा पडाव सर्व धुंडाळून पाहिला, व त्यावरून, याचा मालक येथें कोठें तरी जवळच असला पाहिजे, असें त्यांनीं सहजच अनुमान केलें. त्यांपैकीं चारजण हत्यारबंद होते, त्यांनीं प्रत्येक फट व आडऊड जागा पहाण्यास सुरुवात केली, व शेवटीं ज्या ठिकाणीं दगडामागें मी लपून राहिलों होतों तेथें ते आले. त्यांनीं माझा चमत्कारिक व ओबडधोबड पोषाख—ह्मणजे माझा तो कातड्याचा आंगरखा, लांकडाच्या तळव्यांचा जोडा, व लोंकरीचे पायमोजे—पाहून त्यांस फार आश्चर्य वाटलें. तथापि त्या बेटांतले सर्व लोक अगदीं नग्न रहात असल्यामुळें, मी त्या ठिकाणचा रहाणारा नव्हें हें त्यांनीं ताडलें. त्यांपैकीं एका खलाशानें मला पोर्तुगिज भाषेंत, उठून उभा रहा असें सांगून, तूं कोण व कोठून आलास ह्मणून विचारलें. ती भाषा मला चांगली येत होती, सबब मी लागलाच उठून उभा राहिलों, आणि ह्मटलें, 'मी आपला एक गरीब ' याहू ' असून ' हुं हुं हूं ' च्या देशांतून हद्दपार झालेलों आहें, व माझी एवढीच इच्छा आहे कीं, आपण मला जसें पाहिलें तसेंच सोडून द्यावें.' त्यांच्या स्वतःच्या भाषेंत त्यांना मीं उत्तर दिलें हें पाहून त्यांना मोठें नवल वाटलें, व माझ्या वर्णावरून मी इंग्रज असावा, असें त्यांस दिसून आलें. परंतु मीं ' याहू ' व ' हुं हुं हूं ' ह्मणून जें काय ह्मटलें त्याचा अर्थ त्यांस



कळला नाहीं. तसेंच घोड्याच्या खिंकाळण्याप्रमाणें माझी बोलण्याची चमत्कारिक तऱ्हा पाहून तर ते हंसायालाच लागले. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत भीति व तिरस्कार उत्पन्न होऊन मीं थरथर कांपूं लागलों, व मला जाऊं द्या, असें त्यांस विनयपूर्वक ह्मणून मी हळूच आपल्या पडावाकडे चाललों. परंतु त्यांनीं मला धरून ठेविलें, व तूं कोठचा रहाणारा, आलास कोठून, वगैरे कित्येक प्रश्न विचारले. मीं त्यांस उत्तर केलें, ' माझा जन्मदेश इंग्लंड असून तेथून सुमारें पांच वर्षांपूर्वीं मी प्रवासास निघालों, व त्या वेळीं तुमचा व आमचा देश यांमध्यें पूर्ण सख्य होतें. यास्तव मला अशी उमेद आहे कीं, आपण मला शत्रु असें समजून माझ्याशीं वागणार नाहीं. शिवाय मी 'आपला गरीब व निराश्रित ' याहू ' असून आपणांस कांहीं इजा करण्याचाही माझा इरादा मुळींच नव्हता, व हल्लीं नाहीं. माझा हेतु इतकाच आहे कीं, एखाद्या बिनवस्तीच्या ठिकाणीं जाऊन आपलें आयुष्य तेथें कंठावें; तर तसें करण्यासाठीं मला सोडून द्या एवढेंच माझें मागणें आहे. '

ते खलाशी जेव्हां बोलायाला लागले तेव्हां मला असें वाटलें कीं, अशी विपरीत गोष्ट आपण कधींच ऐकिली किंवा पाहिली नाहीं. कारण ' हुं हुं हूं ' च्या देशांत तेथला एखादा ' याहू ' अथवा इंग्लंडांत एखादी गाय किंवा कुत्रा हीं बोलायाला लागलीं असतां तें जसें विलक्षण वाटेल, त्याचप्रमाणें हें मला वाटलें ! त्याचप्रमाणें त्या बिचाऱ्या पोर्तुगीज खलाशांसही माझा तो चमत्कारिक पेहराव व माझी बोलण्याची ढब यांचेंही आश्चर्य वाटलें. तथापि माझें बोलणें त्यांना सर्व चांगलें समजलें. ते मोठ्या दयार्द्र अंतःकरणानें ह्मणाले कीं, ' आमचे कप्तानसाहेब तुझी स्थिति लक्षांत आणून तुला जहाजामध्यें फुकट बसवून लिस्बन् येथें

घेऊन जातील अशी आमची खात्री आहे; व मग तेथून तूं आपला इंग्लंडास निघून जा ह्मणजे झालें. आतां आह्मांपैकीं दोन असामी परत जहाजावर जाऊन कप्तानसाहेबांस ही सर्व हकीकत सांगतील, व त्यांचा काय हुकूम होतो तो घेऊन इकडे येतील. तोंपर्यंत आह्मांस तुला धरून ठेवणें भाग आहे. मात्र, मी पळून जाणार नाहीं असें तूं शपथपूर्वक सांगशील, तर आह्मी तुला खुला ठेवूं.' त्यांचें हें ह्मणणें कबूल करावें हेंच बरें असें मला वाटलें. त्यांना माझी हकीकत ऐकण्याची फार इच्छा होती, परंतु मीं जें काय सांगितलें त्यावरून त्यांचें मुळींच समाधान झालें नाहीं; व त्यामुळें त्यांना असें वाटलें कीं, याजवर मोठमोठीं संकटें आल्यामुळें याच्या बुद्धीस भ्रंश झाला असावा. असो; पुढें दोन तासांनीं, जे दोन खलाशी गोड्या पाण्याचीं भांडीं होडींत भरून तीं घेऊन जहाजावर गेले होते, ते परत आले, व तुला जहाजावर घेऊन जाण्याविषयीं कप्तानसाहेबांचा हुकूम झाला आहे, असें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां आतां आपली स्वतंत्रता जाणार हें पाहून मला फार वाईट वाटलें, व मला नेऊं नका अशी मीं त्यास गुडघे टेंकून विनंति केली. परंतु त्याचा कांहींएक उपयोग न होतां त्या लोकांनीं माझ्या मुसक्या बांधल्या, व मला खेंचीत नेऊन होडींत बसविलें. नंतर तेथून त्यांनीं मला जहाजावर नेऊन कप्तानाच्या खोलींत त्याच्या समोर उभें केलें.

कप्तानाचें नांव डॉन् पेड्रो डि मेंडेज् असें होतें. तो मोठा सभ्य व उदार मनाचा गृहस्थ होता. त्यानें मला आपली हकीकत थोडक्यांत सांगण्याविषयीं विनंति केली, व तुह्मी खाणार पिणार काय तें सांगा असें ह्मटलें. खेरीज तो ह्मणाला, 'तुह्मी येथें कांहीं एक अंदेशा मनांत आणूं नका. जसा मी तसेच तुह्मी या ठिकाणीं आहां असें सम-

जा. व याखेरीज आणखीही ममतेच्या गोष्टी तो इतक्या बोलला कीं, 'याहू' कडून असें उत्तम वर्तन होणें ही फार आश्चर्याची गोष्ट आहे असें मला वाटलें. तथापि मी कांहीं एक न बोलतां जसा उदासीन होतों तसाच राहिलों, व 'याहू' जातीविषयीं मला अतिशय कंटाळा येऊन गेला असल्यामुळें कप्तानाच्या अंगाचा वास सुद्धां मला सहन होईनासा होऊन मी घेरी येऊन पडायाला लागलों. शेवटीं, मला आपल्या पडावांतील सामानापैकीं कांहीं खाण्याविषयीं परवानगी असावी, असें मीं ह्मटलें; पण त्यानें मजकरितां एक कोंबडें व उत्तम प्रकारची दारू आणविली. मग माझें खाणेंपिणें झाल्यावर मला चांगल्या स्वच्छ बिछान्यावर अगदीं निराळ्या खोलींत निजविण्याविषयीं त्यानें हुकूम केला. मी आपले कपडे न काढतां तसाच बिछान्यावर पडून राहिलों, व सुमारें अर्ध्या तासानें हळूच उठून खलाशी खाना खाण्यास बसले असतां जहाजाच्या कडेशीं आलों, आणि 'याहूं' च्या सहवासांत रहाण्यापेक्षां समुद्रांत उडी टाकून मग पोहून जीव वांचवितां आला तर पहावा, असें मीं मनांत आणलें. परंतु मी उडी टाकणार इतक्यांत एका खलाशानें येऊन मला प्रतिबंध केला, व लागलीच कप्तानास याबद्दल वर्दी दिली. तेव्हां त्याच्या हुकूमावरून तत्काळ मला खोलीमध्यें मुसक्या बांधून कोंडून ठेविलें.

जेवण झाल्यावर कप्तान मजकडे आला, व असलें जिवावरचें कृत्य करण्यास तुह्मी कां प्रवृत्त झाला असें त्यानें मला विचारलें. नंतर त्यानें माझी खातरजमा करून सांगितलें कीं, तुम्हांस मीं जहाजावर येवढ्याचकरितां घेतलें कीं, मजकडून तुह्मांस होईल तितकी मदत व्हावी. व आणखीही तो कित्येक गोष्टी मजशीं एवढ्या प्रेमानें व

सद्गदित अंतःकरणानें बोलला कीं, ज्याच्या ठायीं बुद्धीचा थोडासा अंश आहे अशा प्रकारचा हा प्राणी आहे, असें त्याच्याविषयीं माझें मत होऊन त्याप्रमाणें मी त्याशीं वागूं लागलों. मग मीं आपल्या प्रवासाची हकीकत थोडक्यांत त्यास सांगितली, व ती सांगतांना, माझ्या जहाजावरच्या लोकांनीं माझ्या विरुद्ध कसा बंडावा करून मला त्या 'हुं हुं हूं' च्या देशाच्या किनाऱ्यावर कसें नेऊन सोडलें, आणि मी त्या देशांत पांच वर्षें कशा रीतीनें राहिलों या गोष्टी बऱ्याच विस्तारपूर्वक सांगितल्या. ही हकीकत ऐकून, हा स्वप्नांत असून उगीच आपलें भलतेंच कांहीं बरळतो आहे असें कप्तानास वाटलें. याबद्दल मला फार राग आला; कारण 'याहू' हे जेथें सर्वांत श्रेष्ठ आहेत अशा एकून एक देशांत असत्य भाषण करण्याचा प्रकार ज्यारी असून, आपल्या जातीच्या सर्व प्राण्यांच्या अंगीं सत्याचा अभाव आहे असें मानण्याची त्यांना खोडच लागून गेलेली आहे हें खरें, तथापि मजविषयीं म्हणाल तर, 'हुं हुं हूं' च्या सहवासानें असत्य भाषण करण्याची बुद्धि माझ्यांतून नाहींशी झालेली होती. व त्यावरून मीं कप्तानास विचारलें कीं, 'कायहो, जी गोष्ट नाहीं ती आहे असें ह्मणण्याचा तुमच्या देशांत प्रघातच आहे कीं काय?' मग मीं त्यास सांगितलें कीं, 'असत्य भाषण म्हणजे काय असतें याचा मला अगदीं विसर पडून गेला आहे, म्हणून मी तुम्हांस असें विचारतों; आणि खरोखर सांगतों कीं, 'हुं हुं हूं' च्या देशांत जरी मी हजार वर्षें राहिलों असतों, तरी तेथल्या एखाद्या अगदीं हलक्या चाकराच्या तोंडूनही मला असत्य भाषण ऐकण्याचा प्रसंग कधीं आला नसता, अशी माझी पक्की खातरी आहे. आतां मी काय म्हणतों याजवर तुमचा भरंवसा बसो अगर न बसो, त्याची फिकीर मी

मुळींच करीत नाहीं. तथापि मजवर तुमचे फार उपकार झाले आहेत, यासाठीं तुमच्या स्वभावांतील दोषांकडे मीं फारसें लक्ष न देतां तुम्ही ज्या कांहीं शंका घ्याल त्यांचीं उत्तरें मी समर्पक तुम्हांस देईन, व त्यानंतर माझ्या म्हणण्याच्या सत्यतेविषयीं सहज तुमची खातरी होईल.

कप्तान हा मोठा शहाणा व विचारी मनुष्य होता. तथापि त्यानें माझी हकीकत ऐकत असतां ती सांगण्यांत कांहीं लटपट आहे असें दाखविण्याचा कित्येक वेळां यत्न केला, परंतु तो फुकट गेला. तेव्हां शेवटीं माझ्या खरेपणाविषयीं त्याच्या मनाची खात्री होऊं लागली. तो ह्मणाला, 'पण ज्याअर्थीं तुह्मी अत्यंत सत्यप्रिय असण्याविषयीं बाणा बाळगितां, त्याअर्थीं, आतां पुढें जो आपणास प्रवास करावयाचा आहे, त्यांत, तुमच्या विरुद्ध मी कोणतीही गोष्ट न करितां लिस्बनूपर्यंत तुमच्या संगतीं येईन असें तुह्मी मला वचन द्या; नाहींपेक्षां तुह्मांस मला तेथपर्यंत बंदीवान करून नेलें पाहिजे.' मीं त्याच्या म्हणण्याप्रमाणें लागलाच त्याच्या हातावर हात दिला. परंतु त्याच वेळीं असें ह्मटलें कीं, 'पुनः 'याहू' मध्यें जाऊन त्यांच्या सहवासांत रहाण्यापेक्षां मी आपला एकटा जिवावर उदार होऊन कोणीकडे जाईन तर तें मला सातां वाव्यांनीं पुरवेल!'

या प्रवासांत आह्मांस संकटें वगैरे विशेष कांहीं भोगावीं लागलीं नाहींत. मी कप्तानास आपली कृतज्ञता दर्शविण्याकरितां कित्येक वेळां त्याच्या विनंतीवरून त्याजपाशीं जाऊन बसें, व मनुष्यजातीविषयींचा आपला द्वेष बाहेर दाखवीत नसें; तथापि कांहीं प्रसंगीं चुकून तसा प्रकार माझ्या बोलण्यांत येई; पण त्याकडे तो थोर मनाचा गृहस्थ लक्ष देत नसे. परंतु खलाशांपैकीं कोणीही आपल्या नजरेस पडूं नये ह्मणून मी बहुतेक वेळ आपल्या खोलींतच जाऊन

बसें. कप्तानानें मला तो आपला रानटी ओबडधोबड पोषाख काढून टाकण्याविषयीं कित्येक वेळां सांगितलें, व आपल्याजवळचा चांगला पोषाख घेण्याविषयीं विनंति केली. परंतु 'याहू' चें ह्मणून जेवढें तेवढ्याचा मला पराकाष्टेचा तिरस्कार येऊन गेला असल्यामुळें, त्याचा तो पोषाख घेण्याचें मीं नाकारिलें. फक्त त्याच्याजवळून मीं दोन कमीज तेवढे घेतले, व ते त्यानें पूर्वी घातलेले होते तथापि धुतलेले असल्यामुळें, आपण ते घातल्यानें फारसे अपवित्र होणार नाहीं असें मला वाटलें. हे मी एका दिवसाआड बदलीत असें, व स्वतः धुऊन स्वच्छ करीत असें.

आह्मी इ० स० १७१५ च्या नोवेंबर महिन्याच्या १५ व्या तारखेस लिस्बन् येथें येऊन दाखल झालों. तेथें उतरल्यावर कप्तानानें मला आपला आंगरखा देऊन आग्रहपूर्वक ह्मटलें, 'येवढा तरी माझ्याकरितां या वेळेस तुह्मी आंगांत घाला; नाहीं तर, तुमचा हा विलक्षण अवतार पाहून बदमाष लोक तुमच्याभोंवतीं जमून विनाकारण तुह्मांला त्रास देतील.' त्यानें इतकें ह्मटलें तेव्हां तें ऐकणें मला भाग पडलें. नंतर त्यानें मला आपल्या स्वतःच्या घरीं नेलें. तेथें गेल्यावर माझ्या विनंतीवरून घराचे मागचे बाजूस दुसरे मजल्यावर अगदीं एकांताचे खोलींत त्यानें मला नेलें. तेव्हां मीं त्यास सांगितलें कीं, 'हुं हुं हूं' च्याविषयीं जें काय मीं तुमच्यापाशीं बोललों, तेवढें कृपाकरून तुह्मी कोणाला सांगूं नका; कारण, त्या संबंधानें थोडासा जरी पुकारा झाला, तरी तेवढ्यानें हजारों लोक मला पहाण्यास येऊन त्रासवून सोडतील येवढेंच नाहीं, तर कदाचित् मला पाखंडी ह्मणून कैद करतील, व माझा छळ आरंभितील.' कप्तानानें मला कपड्यांचा एक नवा संच करविण्याकरितां शिंप्यास बोलावून आणविलें, परंतु शिंप्याला मी आपल्या अंगाचें मेजच घेऊं



दिले नाहीं. तेव्हां त्यानें आपल्याच अंगावर ते कपडे घेत-विले, व आह्मी दोघे बहुतेक सारखेच असल्यामुळें, ते मला ठीक झाले. दुसऱ्याही मला जरूर लागणाऱ्या सर्व वस्तु त्यानें नव्या घेऊन दिल्या. परंतु त्या मीं वापरण्यापूर्वीं चोवीस तासपर्यंत हवेंत शुद्ध होत ठेविल्या होत्या.

कप्तानास बायको मुळींच नव्हती, व चाकरमाणसेंही तिहींपेक्षां अधिक नसून त्यांपैकीं कोणासही जेवणाचे ठिकाणीं येण्याची परवानगी नव्हती. आणि त्याची स्वतःची चालचलणूक उत्तम असून, मनुष्यास जेवढें ज्ञान असण्याचा संभव आहे. तेवढें त्यास असल्यामुळें, शेवटीं त्याचा सहवास मला बराच आवडूं लागला; व तेणेंकरून, मी जो अगदीं इकडे तिकडे मुळींच पहात नसे, तो मागें वळून खिडकीकडे पाहूं लागलों. पुढें हळूहळू दुसऱ्या एका जागेंत तो मला नेऊं लागला. तेथून रस्त्यावरील सर्व व्यवहार नजरेस पडण्यासारखा होता; परंतु मला त्याची अतिशय शिसारी येऊन मीं आपलें तोंड फिरवून घेत असें. तथापि सुमारें एका आठवड्यानंतर त्यानें तळमजल्यावर येण्याविषयीं माझें मन वळविलें. तेव्हां मनुष्यांच्या सहवासाची मला जी अतिशय शिसारी आलेली होती ती बरीच कमी झाली; परंतु त्यांच्याविषयींचा द्वेष व तिरस्कार हीं अधिकच वाढलीं. असो; तथापि मग मला रस्त्यांतून कप्तानाबरोबर चालण्याविषयीं शंका वाटेनाशी झाली. तरी पण लोकांची घाण नाकांत न भरावी ह्मणून त्या वेळीं मी आपले नाकांत ब्राह्मीचा पाला किंवा तंबाखू भरून ठेवीत असें.

कप्तानास मीं आपल्या घरगुती संबंधाचीही सर्व हकीकत सांगितली होती. तेव्हां त्याचे येथें दहा दिवस मी राहिल्यावर त्यानें मला सांगितलें कीं, 'तुह्मीं लौकिकाच्या व नीतीच्या धर्मास जागून आतां स्वदेशी जावें व आपल्या

मुलांमाणसांत रहावें हें योग्य आहे.' नंतर तो ह्मणाला, 'बंदरांत एक जहाज इंग्लंडास जाण्याकरितां तयार झालेलें आहे; तर तुह्मी आपली निघण्याची तयारी करा, मी तुह्मांला जें काय लागेल तें देण्यास तयार आहे.' मीं त्याच्या ह्मणण्यास पुष्कळ प्रकारें मोडता घातला, व त्यानें त्याविरुद्ध अनेक गोष्टी मला सांगितल्या. त्याबद्दलची सविस्तर हकीकत मी आतां देत बसत नाहीं; कारण त्यापासून वाचकांस कंटाळा येईल. त्याच्या ह्मणण्याचा तात्पर्यार्थ हाच होता कीं, 'तुह्मांला तुमच्या इच्छेप्रमाणें अगदीं एकांतांत राहतां येण्यासारखें विनवस्तीचें ठिकाण सांपडणें अशक्य आहे; तर तुह्मी आपल्या घरींच जा, ह्मणजे तुह्मांला हव्या त्या रीतीनें तेथें रहाण्याची सोय करितां येईल.' शेवटीं विचार करितां त्याचें बोलणें माझ्या मनांत भरलें. कारण असलेल्या स्थितींत आपल्या मनाप्रमाणें यापेक्षां जास्त कांहीं होण्यासारखें नाहीं अशी माझी खात्री झाली.

मी लिस्बन् येथून नोवेंबरच्या २४ व्या तारखेस निघालों. ज्या जहाजांत मी बसलों होतों तें कोणा इंग्लिश व्यापाऱ्याचें होतें. परंतु त्याचा कप्तान कोण याची मीं चौकशी केली नाहीं. डॉन पेड्रो, म्हणजे लिस्बन्पर्यंत ज्यानें मला आपल्या जहाजांत आणिलें होतें तो गृहस्थ, मी या जहाजावर बसेपर्यंत मला पोहोंचविण्यास आला, व त्यानें मला खर्चाकरितां वीस पौंड उसने दिले. त्यानें मोठ्या प्रेमानें माझा निरोप घेतला, व निघण्याचे वेळीं तो मला कडकडून भेटला. ह्या प्रवासांत जहाजाच्या कप्तानाशीं अथवा त्याच्या हाताखालच्या लोकांशीं माझा कोणत्याही प्रकारचा व्यवहार झाला नाहीं. मी आपला आजारी आहें असें मिष करून आपल्या खोलींत एकांतांत एकसारखा बसून राहिलों होतों. आमचें जहाज १७१५ च्या दिसेंबर महि-

त्याच्या ५ व्या तारखेस सकाळीं नऊ वाजण्याचे सुमारास डाउन्स खाडींत जाऊन दाखल झालों, व मी दुपारीं तीन वाजतां आपल्या घरीं सुखरूप पोहोंचलों.

मी आलों हें पाहून माझ्या कुटुंबांतील सर्व माणसांस मोठें आश्चर्य व आनंद झाला; कारण मी आजपर्यंत आलों नाहीं असें पाहून मी मरण पावलों असा त्यांचा तर्क झाला होता. असो; माझ्या अकल्पित भेटीनें त्यांना जरी आनंद झाला, तरी त्यांना पाहून माझ्या मनांत द्वेष व तिरस्कार अतिशय उत्पन्न झाला हें मी स्पष्ट सांगतों. कारण, जरी मी 'हुं हुं हूं' च्या देशांतून हद्दपार झालों होतों, व मला 'याहू' चा सहवास थोडथोडा सहन होऊं लागून डॉन् पेड्रो याच्याशीं मी थोडा वेळ बोलतही असें, तरी त्या अत्यंत सद्गुणी 'हुं हुं हूं' चें स्मरण वारंवार मला झाल्यामुळें माझ्या मनाची अशी स्थिति होणें साहजिक होतें. आणि 'याहू' जातीच्या दुसऱ्या एका प्राण्याशीं आपण संयोग करून आणखी कांहीं 'याहू' उत्पन्न करण्यास कारण झालों हा जेव्हां विचार माझ्या मनांत आला, तेव्हां तर मला जी शरम वाटली व जें दुःख झालें तें किती म्हणून सांगावें !

मी घरांत गेल्याबरोबर माझ्या बायकोनें मला आलिंगन दिलें, व माझें चुंबन घेतलें. परंतु असल्या ओंगळ प्राण्याचा स्पर्श मला इतके दिवस नसल्यामुळें ती घाण मला असह्य होऊन मी एक तासपर्यंत मूर्च्छा येऊन पडलों. तेव्हांपासून आज मी आपला हा वृत्तांत लिहीत आहें या वेळेपर्यंत जरी पांच वर्षें लोटून गेलीं, तरी त्यांत पहिल्या वर्षी तर माझी बायको व मुलें हीं मला दृष्टीसमोर सहन होत नसत;—फार काय, पण त्यांचा वासही मला असह्य होत असे, मग तीं व मी एका जागेंत बसून जेवण्याची तर गोष्ट-

च बोलावयास नको! व आज मितीस तरी इतका काळ लोटून गेला आहे तथापि माझ्या अन्नपाण्यास स्पर्श करण्यासही तीं धजत नाहींत. मी घरीं आल्याबरोबर प्रथम जो माझा पैसा शिलक राहिला, त्याचे मीं दोन वळू घोडे विकत घेतले, व त्यांना एका चांगल्या तबेल्यांत ठेवून दिलें. त्यांजवर माझी फार प्रीति असून त्यांच्या मोतद्दारावर त्यांच्या खालोखाल ती आहे. कारण तबेल्यांत त्याच्या व घोड्यांच्या वासांत जो फरक माझ्या लक्षांत येतो, त्याच्या योगानें माझ्या अंतःकरणास आनंद होतो असें मला वाटतें. माझ्या दोन्ही घोड्यांना माझें बोलणें बरेंच चांगलें समजतें, व मी निदान चार तासपर्यंत दररोज त्यांच्याशीं संभाषण करीत असतों. त्यांना लगाम अथवा जीन हीं कांहींच माहीत नसून ते माझ्याशीं मोठ्या प्रेमानें वागतात; तसेंच त्यांची परपस्परांशींही मैत्री मोठी वाखाणण्यासारखी आहे.





## प्रकरण १२.

गलिव्हर याची सत्यप्रियता.—हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा त्याचा हेतु.—जे प्रवासी लोक आपले वृत्तांत लिहितांना सत्यास सोडून चालतात त्यांस तो दोष देतो.—आपला हा ग्रंथ लिहिण्यांत कांहीं कपटाचा हेतु नव्हता हें तो सिद्ध करून दाखवितो.—तो एका आक्षेपाचें निरसन करितो.—नवीन वसाहती करण्याची तऱ्हा.—तो आपल्या देशाची स्तुति करितो.—वसाहत केलेल्या देशांवर राजाचा वाजवी हक्क आहे, तथापि ते देश जिंकण्याचें अवघड आहे. हें तो सिद्ध करतो.—तो आपल्या वाचकांची शेवटची रजा घेतो.—यापुढें आपण कशा प्रकारें रहाणार हें तो सांगतो.—त्याचा सदुपदेश.—त्याच्या ग्रंथाची समाप्ति.

प्रिय वाचकहो, मीं सुमारें साडेसोळा वर्षें ज्या ज्या सफरी केल्या त्यांचा यथातथ्य वृत्तांत या वेळेपर्यंत मीं तुह्मांस सांगितला. हा आपला वृत्तांत मीं सत्याखेरीज दुसऱ्या कशानेंही अलंकृत करण्याचा त्रिलकूल यत्न केला नाहीं. मला वाटतें तर मीं तुम्हांस इतरांप्रमाणें फारच विलक्षण व असंभाव्य गोष्टी सांगून आश्चर्यचकित करून सोडिलें असतें. परंतु माझा

हेतु तुम्हांस करमणूक करण्याचा नसून, निरनिराळ्या ठिकाणची मिळवून आणलेली माहिती फक्त तुम्हांस सांगावी एवढाच होता; व तो हेतु साधण्याकरितां मीं आपला वृत्तांत होईल तितका सरळ व साध्या रीतीनें सांगितला आहे.

इंग्लिश लोक अथवा युरोपखंडांतील इतर ठिकाणचे लोक हे बहुतकरून ज्या अत्यंत दूर देशच्या प्रवासास कधींही जात नाहींत, तेथें माझ्यासारखे जे कोणी प्रवासी क्वचित् प्रसंगीं जातात, त्यांना समुद्रावर व जमिनीवर अमुक अमुक तऱ्हेचे फार विलक्षण प्राणी आहेत, अशा प्रकारच्या गोष्टी सहज बनवून सांगतां येण्यासारख्या आहेत. पण वास्तविक पाहिलें असतां प्रवाशांनीं परक्या ठिकाणीं जें काय खरोखर पाहिलें असेल त्या चांगल्या वाइटाच्या उदाहरणांवरून मनुष्याची स्थिति सुधारण्याचा यत्न करावा हेंच योग्य आहे. परंतु तसें कोणी करतोसें दिसत नाहीं ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे.

मला वाटतें, असा एक कायदा झाला पाहिजे कीं, जो जो प्रवासी आपल्या प्रवासाचें वृत्त प्रसिद्ध करूं इच्छील, त्या प्रत्येकानें सरकारचा लॉर्ड हाय चान्सेलर ( पंडितराव ) याजपुढें अशी शपथ घेतली पाहिजे कीं, मी जें काय प्रसिद्ध करणार आहें तें माझ्या समजाप्रमाणें अगदीं सत्यास अनुसरून आहे. कारण असा कायदा झाला म्हणजे, हल्लीं प्रवाशांचे वृत्तांत वाचून लोक जे विनाकारण फसतात तसे पुढें फसणार नाहींत. कित्येक प्रवासी, आपला ग्रंथ लोकांस जास्त आवडावा म्हणून त्यांत उगीच नाहीं नाहीं तसल्या खोट्यानाट्या गोष्टी घुसडून देतात, व त्यांच्या योगानें बिचाऱ्या भोळसर वाचकांचें उगीच डोकें पिकवितात. या संबंधानें इतरांचा कशाला, मी आपला स्वतःचाच अनुभव सांगतों. मीं लहान असतां अशा प्रकारचे

कित्येक ग्रंथ वाचले, तेव्हां मला पराकाष्ठेचा आनंद झाला. परंतु तेव्हांपासून आजपर्यंत मीं स्वतः अनेक सफरी करून पृथ्वीचा बहुतेक भाग पाहून सोडला असल्यामुळें, मीं लहानपणीं ज्या गोष्टी वाचल्या त्यांपैकीं शेंकडों निवळ खोट्या अशा मला दिसून आल्या आहेत; व त्यामुळें, असे ग्रंथ वाचण्याचा मला मोठा कंटाळा आलेला असून, अशा रीतीनें मनुष्यमात्रास फसविण्याचें धाडस करणारांविषयीं माझ्या मनांत पराकाष्ठेचा तिरस्कार उत्पन्न झाला आहे. म्हणून, माझ्या इष्टमित्रांनीं माझे ताडकेतोडके लेख वाचनीय होतील असा आपला अभिप्राय दिल्यावरून मीं ते प्रसिद्ध करण्यांत अगदीं सत्याला अनुसरून चालण्याविषयीं जणूं काय शपथ घेतली आहे; व 'हुं हुं हूं' च्या देशांतला माझा धनी व दुसरे महात्मे यांचीं संभाषणें व उदाहरणें जोंपर्यंत माझ्या लक्षांत आहेत, तोंपर्यंत तरी निदान हा माझा निश्चय कदापि ढळणार नाहीं.

असल्या प्रकारचे ग्रंथ लिहिणें—कीं जे लिहिण्यास बुद्धि किंवा विद्वत्ता मुळींच लागत नाहीं, तर चांगली स्मरणशक्ति व टिपणवही असली म्हणजे झालें—त्यापासून कीर्तीचा लाभ कितपत होणार हें मी पूर्णपणें जाणत आहें. त्याचप्रमाणें, एकंदर प्रवासवृत्त लिहिणारांची गत ही कोशकारांसारखीच होते, म्हणजे कालेंकरून त्यांचें विस्मरण लोकांस पडून जातें, व त्यांपैकीं जे सर्वांच्या शेवटीं उत्पन्न होतात त्यांचें मात्र लोकांत नांव होतें व त्यांनाच लोक प्रमाणभूत धरितात, हेंही मी पक्कें जाणून आहें. म्हणून, मीं या ग्रंथांत ज्या देशांचें वर्णन केलें आहे, तेथें यापुढें जे कोणी प्रवासी जातील, ते मीं लिहिलेल्या वृत्तांतांतील चुका (कांहीं असल्या तर) काढितील; व आपल्या मनच्या शेंकडों गोष्टी नवीन घालून देऊन मला माझ्या जागेवरून

धुडकावून लावितील, व ती जागा आपण पटकावून, गलि-व्हर ह्मणून कोणी फलाणा ग्रंथकार होऊन गेला याचा देखील जगास विसर पाडून टाकितील. तथापि माझा हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न कीर्तीकरितां असता तर त्याचें मला एवढें वाईट वाटलें असतें ! माझा हेतु मुळींच तसा नसून लोककल्याण हाच माझ्या ग्रंथलेखनाचा उद्देश आहे; तेव्हां मला ह्या संबंधानें केवळ निराशच होण्याचें कारण आहे असें वाटत नाहीं. आतां ज्या देशांत 'याहू' हेच सर्वांत श्रेष्ठ आहेत, अशा देशांतील लोकांविषयीं जरी मला फारसें बोध घेण्यासारखें सांगतां येणार नाहीं, तरी त्यांपैकीं ब्रॉब्डिंग्नागच्या लोकांचे नीति व राज्य-नियमन यांविषयींचे नियम हे आपणांस घेण्यासारखे आहेत यांत संशय नाहीं; हें एक असो, पण थोडीबहुत बुद्धि असणाऱ्या व सत्ताधारीपणा मिरविणाऱ्या 'याहू' पैकीं जो कोणी, त्या थोर 'हुं हुं हूं' च्या सद्गुणांचें वर्णन वाचील, त्यास आपल्या दुर्गुणांविषयीं शरम वाटणार नाहीं असें मला मुळींच वाटत नाहीं ! पण हें प्रकरण आतां बरेंच लांबलें, यास्तव या संबंधानें विशेष न लिहितां, यावर जास्त विचार करून यांतील तात्पर्य काढण्याचें काम मी सुज्ञ वाचकांवरच सोंपवितों.

माझ्या या ग्रंथावर प्रतिकूल टीका करणारे कोणी फारसे भेटण्याचा संभव नाहीं, याबद्दल मला मोठा अभिमान वाटण्याचें कारण नाहीं; कां कीं, जो ग्रंथकार घडलेल्या गोष्टी अगदीं जशा असतील तशा साध्या रीतीनें सांगतो, त्याच्याविरुद्ध टीका करण्यांत हेतु तरी काय असणार आहे ? तशांत वरील गोष्टींशीं ज्या देशांचा संबंध आहे, ते देश अतिशय दूरचे असून त्यांशीं आपला कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा दळणवळण मुळींच नाहीं, तेव्हां माझ्या

ग्रंथावर टीका करण्याची प्रवृत्ति तरी लोकांस कोणत्या कारणानें होणार आहे? असो; तथापि मीं आपल्या लेखांत, इतर प्रवासी ज्या चुका करितात व ज्यांबद्दल त्यांचा टीकारूपानें खरपूस पण वाजवी समाचार घेतला जातो, तशा चुका न होऊं देण्याविषयीं फार काळजी घेतलेली आहे. खेरीज मीं कोणत्याही पक्षाची तरफदारी किंवा विरुद्धता यांनीं आपलें मन विटाळलें नसल्यामुळें, कोणत्याही व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या संबंधानें कशाही प्रकारें यत्किंचित् देखील पक्षपात माझ्या हातून झालेला नाहीं. सारांश, माझ्या लेखाचा हेतु केवळ लोकांचें बरें करावें एवढाच आहे;—ह्मणजे त्यांस अनेक प्रकारची माहिती व अनेक गोष्टींचें शिक्षण द्यावें एवढाच आहे. पण एवढें तरी करण्याचा वास्तविक तुला काय अधिकार, असा कोणीं आक्षेप घेतला तर त्यास मीं असें उत्तर देणार कीं, यांत मी आपली स्वतांची प्रौढी अर्थात् कांहींच मिरवींत नाहीं, व ती मला मिरवितां येण्यास जागाही नाहीं हें खरें, पण त्या अत्यंत थोर व उदार अंतःकरणाच्या 'हुं हुं हूं' शीं बहुत दिवस संभाषण केल्यानें माझें मन इतरांपेक्षां बरेंच संस्कृत झालें आहे, व त्यामुळें इतरांस, आपल्या शक्तीप्रमाणें, आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा लाभ करून देणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे अशी माझी समजूत झाली आहे हें मी प्रांजलपणें सांगतों. त्याचप्रमाणें आपल्या लेखाबद्दल आपल्याला कांहीं पारितोषिक मिळावें किंवा आपली कोणीं स्तुति करावी हाही माझा हेतु नाहीं. खेरीज मीं आणखी आपल्या लेखांत ही एक विशेष काळजी घेतली आहे कीं, ज्यांची प्रकृति अतिशय गरम—कीं उगीच इतकेंसें ज्यांच्या मनाच्या विरुद्ध झाल्याबरोबर जे डोक्यांत राख घातल्यावांचून रहावयाचेच नाहींत—अशानांही तिळभर देखील वाईट वाटण्यासारखें अप्रत्यक्ष

रीतीनेंही कांहीं एक मीं लिहिलें नाहीं. तात्पर्य, ग्रंथकार या नात्यानें मला कोणत्याही प्रकारें वाजवी रीतीनें कोणास बिलकूल दोष देतां येण्यासरखा नाहीं; तेव्हां अर्थातच माझ्या ग्रंथांतील आक्षेपांस उत्तर देण्यास सरसावणारे, त्यांतील गोष्टींचा विचार करून मजवर हल्ला करूं पहाणारे वगैरे जे अत्यंत दोषदृष्टि लोक, त्यांसही माझा ग्रंथ वाचून अगदीं 'आळीमिळी गुपचिळी' करून बसावें लागेल अशी माझी पूर्ण खात्री आहे!

राजाच्या प्रजेपैकीं कोणीही गैरमाहित असे जे देश शोधून काढील, त्यांवर राजाचा हक्क आहे. यास्तव, इंग्लंडच्या राजाचे प्रजेपैकीं मी एक असल्यामुळें, मी येथें आल्याबरोबर या देशाच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे या नवीन शोधिलेल्या देशांच्या संबंधानें यादी पाठवायाला हवी होती असें कित्येकजण आपआपसांत कुजबुजले असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. परंतु स्पेनचा सरदार कोर्टिज यास रानटी अमेरिकन लोकांवर जसा सहज जय मिळवितां आला, तसें सहज रीतीनें मीं आपल्या ग्रंथांत वर्णन केलेल्या देशांतील लोकांना आपणांस जिंकून घेणें अनेक प्रकारांनीं पंचाइतीचें आहे. पहा, या ग्रंथाच्या पहिल्या भागांत वर्णिलेले जे लिलिपटियन् लोक, त्यांचा पराक्रम म्हटला तर आपल्या लोकांच्या पराक्रमाच्या पासंगासही लागणार नाहीं हें खरें; तथापि तशा जळमाणसांस जिंकण्यांत पुरुषार्थ तो काय आहे बरें? दुसऱ्या भागांतले ब्रॉब्डिंग्नागियन् लोक घेतले तर, तसल्या राक्षसी लोकांवर चालून जाण्याचें धाडस करणें हेंही कितपत शहाणपणाचें व निर्भय होईल हें दिसतेंच आहे! तसेंच, तिसऱ्या भागांतील उडणाऱ्या बेटांतल्या लोकांवरही स्वारी करण्यापासून जय मिळविणें कितपत शक्य आहे हेंही सांगावयास नको.

शेवटीं राहिले 'हुं हुं हूं'. पण त्या बिचाऱ्यांस युद्धकलेची ओळखही नसल्यामुळें, ते आपणांशीं लढण्यास टिकावे तरी कसे? तथापि घटकाभर असें समजा कीं, खुद्द मलाच प्रधानकीची जागा दिली, तर मी ह्मणून कधींही त्या लोकांवर सैन्य पाठविण्याविषयीं सल्ला देणार नाहीं; कारण, त्यांचें शहाणपण, त्यांची एकी, त्यांच्या ठायीं असणारा भीतीचा अभाव, व त्यांची स्वदेशप्रीति इतक्यांचा विचार केला तर, युद्धकलेंत त्यांचा जो उणेपणा, तो कांहींच नाहीं असें दिसून येईल. कल्पना करा कीं, ते हजारों 'हुं हुं हूं' जर एकदा आपल्या सैन्यांत जोरानें शिरले, तर ते काय ह्मणून करणार नाहींत?—ते सैन्याच्या रांगांचा सर्व गोंधळ करून टाकितील, गाड्या उपड्या करून टाकितील, व शिपायांस तुडवून त्यांचा चेंदामेंदा करून टाकितील, असा एकच अनर्थ करून सोडितील; व त्या वेळीं त्यांस, 'आपणांशीं युद्धांत टिकणारे नव्हत' असें न ह्मणतां, 'सर्वत्र विजयी' जो पहिला रोमन बादशहा आगस्टस, त्याची पदवी देणें आपणांस भाग पडेल! इतकेंही करून समजा कीं, त्या राष्ट्राला जिंकण्याची कांहीं तोंड निघालीच, तथापि मीं असें ह्मणतों कीं, त्यांना आपण जिंकण्यापेक्षां, आपल्यालाच अब्रू, न्याय, सत्य, मिताहार व मितविहार, लोककल्याणाची आस्था, धैर्य, धार्मिकता, मैत्री, परोपकारबुद्धि व प्रमाणिकपणा, यांचीं मूलतत्वें शिकविण्यास त्यांचे कांहीं लोक या देशांत आणवितां येतील तर फार बरें. कारण वरील सर्व गुणांचा आपल्या ठायीं जरी अगदीं बीमोड झाला आहे, तरी त्यांचीं नांवें आपल्या सर्व नव्या जुन्या भाषांत अद्यापि कायम आहेत; तेव्हां तीं नाहींतशीं होत तोंपर्यंत तरी त्या गुणांचें पुनरुज्जीवन होण्यास असें कांहीं साधन मिळालें असतां फार चांगलें होईल!

परंतु मीं शोधिलेल्या देशांच्या योगानें आमच्या राजाच्या अमलाखालील मुलूख आणखी वाढविण्याची मला फारशी इच्छा झाली नाहीं याचें दुसरें एक कारण आहे; तें असें कीं, एकंदरीनें अशा प्रसंगीं राजांचें वर्तन कितपत न्याय्य असतें याची मला थोडी शंका आली. कारण वास्तविक पहातां देश ताब्यांत घेण्याचा हा प्रकार असा घडतो कीं, एखादे वेळीं कांहीं चांचे लोकांचें जहाज वादळांत सांपडून कोणीकडच्या कोणीकडे चाललें असतें; शेवटीं त्यावरील एखाद्या खलाशाच्या दृष्टीस कोठें तरी जमीन पडते; मग ते सर्वजण त्या देशाच्या किनाऱ्यावर जातांच जबरदस्ती आणि लुटालूट करण्यास आरंभ करितात. तेव्हां तेथले गरीब बिचारे लोक त्यांना शरण जाऊन त्यांची सर्व प्रकारची बरदास्त ठेवितात; मग हे भुरटेचोर त्या देशाला एखादें नवीन नांव देतात; व एखादा कुचका तक्ता अथवा दगड घेऊन आपल्या राजाच्या नांवाचा बावटा ह्मणून तो तेथें उभा करितात; आणि या समारंभानें तो देश आपल्या ताब्यांत घेतात. मग तेथल्या वीस पंचवीस लोकांस ते ठार मारतात, व एकदोघांस नमुन्याकरितां बरोबर घेऊन स्वदेशीं येतात. नंतर तेथें त्यांस आपल्या **सर्व अपराधांची माफी** ही आपली ठेविलेलीच असते! नंतर ईश्वरकृपेनें मिळालेल्या या देशावर नवीन राज्याचा पाया सुरू होतो, तो असा; तेथें प्रथम एक आरमार पाठवून तेथल्या रहिवाशांस मारून टाकितात, अथवा हांकून लावितात; त्यांच्या राजांपासून द्रव्य उपटण्याकरितां त्यांचा नानाप्रकारें छळ करितात; व जे कोणी हीं दुष्ट व नीच कृत्यें करितात, त्यांस त्यांच्या **पराक्रमाबद्दल शाबासकीची सनद** देतात! अशा प्रसंगीं तेथल्या जमिनीवर तेथल्या रहिवाशांच्या रक्ताचे पूर वाहतात! तात्पर्य काय कीं, अ-

ज्ञान, मूर्तिपूजक, व रानटी लोकांस सद्धर्माचें ज्ञान करून देण्यासाठीं व त्यांच्यांत सुधारणेचा प्रकाश पाडण्यासाठीं म्हणून गेलेले जे हे केवळ कसई लोक, ते अशा प्रकारें तेथें नवीन वसाहत करून तो देश रंगारूपास आणितात!

परंतु या वरील गोष्टी आमच्या ब्रिटिश राष्ट्रास कोणत्याही प्रकारें लागू नाहींत हें मी स्पष्ट सांगतों. कारण हें राष्ट्र वसाहती करण्याचे कामीं इतकें उत्तम रीतीनें वागतें कीं, याचा कित्ता साऱ्या जगानें घ्यावा अशी याची योग्यता आहे. या राष्ट्राचा शहाणपणा, व्यवस्थितपणा, व न्यायीपणा; तसेंच धर्मशिक्षणाचे कामीं मोठमोठ्या देणग्या; धर्माच्या प्रसारासाठीं अत्यंत भक्तिमान् असे उपदेशक निवडण्याचे कामीं आस्था; नवीन वसाहतींत भरती करण्यासाठीं चांगले सभ्य चालीरीतींचे लोक पाठविण्याविषयीं पराकाष्ठेची काळजी; वसाहतीच्या ठिकाणीं राज्यकारभार चालविण्याकरितां मोठ्या सचोटीचे व योग्यतेचे लोक पाठवून, ज्या योगानें न्याय निष्पक्षपात होईल अशी तजवीज करण्याविषयीं अतिशय कळकळ; व या सर्व गोष्टी पूर्णपणें फळद्रूप होण्यासाठीं फारच हुशार व सद्गुणी अशा सुभेदारांची त्या प्रांतांवर योजना करणें—कीं ज्या सुभेदारांच्या मनांत, आपल्या अमलाखालील लोकांच्या सुखाची, व आपला धनी जो राजा त्याच्या थोरवीची, वृद्धि कोणत्या प्रकारें होईल ह्याच विचार रात्रंदिवस घोळत असतो;—अशा अनेक गोष्टींच्या संबंधानें या राष्ट्राचें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे!

परंतु ज्या अर्थी मीं वर्णिलेल्या देशांतील लोकांस पादाक्रांत होऊन गुलाम बनण्याची व मारले जाण्याची इच्छा आहे असें मला दिसलें नाहीं, तसेंच, त्या देशांत सोनें, रुपें, साखर, तंबाखू वगैरे व्यापारोपयोगी जिनसांची ही रगाडी

नाहीं, त्या अर्थी आपल्या लोकांनीं ते देश जिंकून तेथें वसाहती करण्यांत आपली आस्था, शौर्य, व वित्त खर्चावें अशी कांहीं त्यांची योग्यता नाहीं असें मला वाटलें. तथापि कोणाचें मत जर याच्या उलट पडलें, तर अद्यापिही मला कायदेशीर रीतीनें बोलावणें झाल्यास मीं शपथेवर जबानी देण्यास तयार आहें कीं, 'सदहू देशांच्या रहिवाशांच्या सांगण्यावर आपणांस भरंवसा ठेवणें योग्य वाटेल तर, तसेंच ' हुं हुं हू ' च्या देशांतील डोंगरावर फार प्राचीन काळीं दोन ' याहू ' जे दृष्टीस पडले ह्मणून ह्मणतात त्या संबंधानें कांहीं वाद नसेल तर, माझ्यापूर्वी सदरील देशांत कोणीही युरोपियन् गेलेला नाहीं हें खचीत आहे. परंतु आपल्या राजाच्या नावानें ते देश ताब्यांत घेण्याच्या संबंधाचा विचार कधींही माझ्या मनांत आला नाहीं, व यदाकदाचित् आलाही असता, तरी त्या वेळीं मीं ज्या स्थितींत होतों त्या स्थितीवरून पहातां मी दूरवर दृष्टि देऊन, व स्वसंरक्षणास ती गोष्ट किती बाधक आहे हें मनांत आणून, तो विचार पुढें चांगली संधि येईपर्यंत तहकूब ठेविला असता.'

तेव्हां मुशाफर या नात्यानें मजविरुद्ध जी काय तकरार कदाचित् निघण्याचा संभव आहे, तिजवर माझें काय ह्मणणें आहे तें याप्रमाणें सांगून मी आतां आपल्या प्रिय वाचकांची शेवटची रजा घेतों. यापुढें, रेड्रिफ येथें जाऊन आपल्या लहानशा बागेंत आपल्या इच्छेप्रमाणें कांहीं उद्योग करावा; ' हुं हुं हूं ' च्या सहवासानें ज्या सद्गुणांचा लाभ आपल्याला झाला आहे त्यांचा उपयोग करावा; आपल्या कुटुंबांतल्या ' याहू ' च्या योग्यतेप्रमाणें त्यांस शिक्षण द्यावें; अनेक वेळां आरशांत आपला चेहरा पाहून ' होईल तितकें मानवी प्राण्यांचें दर्शन सहन करण्यास शिकावें;

आपल्या देशांतील 'हुं हुं हूं' चा रानटीपणा पाहून दुःख करावें; परंतु ते कितीही नीच स्थितीस पावले असले तरी, माझा थोर व उदार मनाचा धनी, त्याचे परिवार, इष्टमित्र व एकंदर 'हुं हुं हूं' ची सर्व जात, यांच्याकरितां त्यांस सन्मानानें वागवावें; असा माझा बेत आहे.

गेल्याच आठवड्यांत मीं आपल्या बायकोस थोरल्या टेबलाच्या अगदीं शेवटीं बसून आपल्याबरोबर जेवण्यास व आपल्या प्रश्नांचीं थोडक्यांत उत्तरें देण्यास परवानगी दिली. परंतु 'याहू' जातीचा वास माझ्या नाकाला सहन न होऊन मी अद्यापि त्यांत ब्राह्मीचा अथवा तंबाखूचा पाला भरीत असतों; आणि यद्यपि वयातीत झालेल्या मनुष्यास लागलेल्या फारा दिवसांच्या संवयी नाहींतशा होणें फार कठिण आहे, तथापि कांहीं काळानें मला आपला एखादा शेजारी 'याहू' जवळ घेऊन बसतां येण्याची उमेद नाहीं असें नाहीं; तसेंच, त्याच्या दांतांचें व नखांचें या वेळेस जरी मला भय वाटतें, तरी तेंही त्या वेळीं नाहींसें होणार नाहीं असेंही माझ्यानें ह्मणवत नाहीं.

वास्तविक पहातां 'याहू' हे आपल्या ठायीं स्वभावतःच असलेल्या दुर्गुणांनींच युक्त राहून ते जास्त न वाढविण्याचा यत्न करितील तर त्यांच्याशीं माझा समेट पुनः होणें फारसें कांहीं कठिण नाहीं; आणि खरोखर पुसाल तर, वकील, अमीरउमराव, राजकारस्थानी पुरुष, वैद्य, सेनाधिपति, खुषमस्करे, खिसेकापे, जुगार खेळणारे, साक्षी देणारे, विश्वासघात करणारे, हे पाहिल्याबरोबरच माझ्या तळव्याची आग मस्तकास जाते असें बिलकूल नाहीं; कां कीं, सृष्टिक्रमाप्रमाणें जगांत या प्रकारचे सर्व लोक असावयाचेच. परंतु शरीरानें व मनानें शतशः प्रकारांनीं दूषित असे जे हे प्राणी, ते रिकामा ताठा मिरवितांना मा-

ह्या दृष्टीस पडले ह्मणजे मात्र तत्क्षणीं माझ्या संतापाला अगदीं पारावार नाहींसा होतो. तसेंच अशा प्रकारचा प्राणी, आणि त्याच्या अंगीं या दुर्गुणाचा वास असावा, या दोन गोष्टींचा कसा मेळ पडतो हेंही मला समजत नाहीं! आतां याच्या उलट पहा. बुद्धिमान् प्राण्याचे अंगीं जे गुण असल्यानें तो शोभतो, ते सर्व गुण त्या महात्म्या 'हुं हुं हूं' च्या अंगीं असून, हा दोष ह्मणजे **रिकामा ताठा** जो मीं वर सांगितला, त्याला त्यांच्या भाषेंत तर शब्दही नाहीं! तसेंच, त्यांच्या देशांतील 'याहू' चा खोडसाळपणा माहीत असल्यामुळेंच **वाईट ह्मणून कांहीं असतें** याची किंचित् कल्पना त्यांच्या मनांत भरलेली आहे. बाकी (त्यांना मनुष्य स्वभावाचें चांगलेसें ज्ञान नसल्यामुळें) त्यांच्या देशांतील पशुवत् 'याहू' च्या अंगीं असलेला **ताठा** मुळींच त्यांच्या लक्षांत आलेला नाहीं; परंतु मला त्याचा नेहमींचा अनुभव, यामुळें त्या 'याहू' च्यामध्यें ह्याचें बीज आहे असें माझ्या स्पष्ट नजरेस पडलें.

ह्याचप्रमाणें एखाद्या मनुष्याला पाय किंवा हात नसले तर त्याची स्थिति जरी शोचनीय होईल हें खरें आहे, तरी हातपाय शाबूत असलेला मनुष्य शुद्धीवर असल्यास त्याबद्दल ज्याप्रमाणें त्याला कांहीं दिमाख मिरविण्याचें कारण नाहीं, त्याप्रमाणेंच सद्विचार हाच ज्यांचा शास्ता असे जे 'हुं हुं हूं' त्यांना आपल्या अंगच्या अमोलिक गुणाबद्दल यत्किंचित् देखील **गर्व** नाहीं! या संबंधानें मीं बरेंच पाल्हाळ केलें याचें कारण हें कीं, इंग्लिश 'याहू' चा सहवास आपल्याला असह्य होऊं नये अशी माझी फार इच्छा आहे; आणि ह्मणून, ज्यांच्या ठायीं या दुर्गुणांचा यत्किंचितही वास असेल, त्यांनीं बिलकूल माझ्या नजरेस पडूं नये अशी माझी त्यांस हात जोडून प्रार्थना आहे!